# पुणे शहरातील बालगुन्हेगारी समस्येच्या बदलत्या कारणांचा शोध

**टिळक महाराष्ट्र विद्यापीठ**

**पुणे**

समाजशास्त्र या विषयात एम.फिल पदवीकरीता सादर करण्यात आलेला

लघु-शोध प्रबंध


**संशोधक**

**सौ.दिपाली उदय रायकर**

**मार्गदर्शक**

**डॉ.सुधांशु गोरे**

प्रपाठक व विभागप्रमुख

समाजशास्त्र विभाग

सर परशुरामभाऊ महाविद्यालय, पुणे ३०.



नेहरू इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्स, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,

पुणे

ऑगस्ट २०१२

# अर्पण

. . . . . मी पाहिलेल्या स्वप्नांना सत्यात उतरविणारे व जीवनातील अनेक संकटांना सामोरे जाऊन मला आज इथपर्यंत पोहचविणारे माझे आई वडिल सौ.वासंती नारखेडे व श्री.सतिश नारखेडे यांस तसेच माझ्या संशोधन कार्यात वेळोवेळी मला साथ देणारे माझे पती श्री.उदय रायकर यांस हा शोधप्रबंध अर्पण. . . . .

# प्रमाणपत्र

सौ.दिपाली उदय रायकर यांनी "पुणे शहरातील बालगुन्हेगारी समस्येच्या बदलत्या कारणांचा शोध" हा लघुशोध प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या कला शाखेअंतर्गत समाजशास्त्र विषयातील एम.फिल. पदवीसाठी अभ्यासाचा व परिक्षेचा एक भाग म्हणून सादर केला आहे.

त्यांनी हा लघुशोधप्रबंध माझ्या मार्गदर्शनाखाली स्वतंत्ररित्या लिहिला असून तो इतर कोणत्याही विद्यापीठातील अन्य पदवीसाठी सादर केलेला नाही.

ठिकाण ः पुणे

दिनांक ः

डॉ.सुधांशु गोरे

प्रपाठक व विभाग प्रमुख

समाजशास्त्र विभाग,

सर परशुरामभाऊ महाविद्यालय

पुणे ३०.

# प्रतिज्ञापत्र

मी प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की, ''पुणे शहरातील बालगुन्हेगारी समस्येच्या बदलत्या कारणांचा शोध'' या विषयांतर्गत टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील एम.फिल. पदवीसाठी लघुशोध प्रबंध सादर केलेला आहे. हा लघुशोध प्रबंध कोणत्याही विद्यापीठात या स्वरूपात कोणीही सादर केलेला नाही. तसेच मी देखील अन्य विद्यापीठात कोणत्याही पदवीसाठी सादर केलेला नाही.

ठिकाण ः पुणे

दिनांक ः

(सौ. दिपाली उदय रायकर)

संशोधक विद्यार्थीनी

# ऋणनिर्देश

आज ''पुणे शहरातील बालगुन्हेगारी समस्येच्या बदलत्या कारणांचा शोध'' हा शोधप्रबंध सादर करताना मला अनेकांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले आहे. त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानणे हे मी माझे कर्तव्य समजते.


प्रथमतः विद्यानिष्णात (एम.फिल.) अभ्यासक्रमासाठी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने मला जी संधी उपलब्ध करून दिली त्याबद्दल मी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.उमेश केसकर तसेच नेहरू सामाजिक शास्त्र विभागाचे अधिष्ठाता श्री.विजय कारेकर व समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ.विशाल जाधव यांचे अत्यंत आभार मानते.

माझे मार्गदर्शक डॉ.सुधांशु गोरे यांनी सतत मला प्रोत्साहन दिले व माझ्या प्रबंधाला योग्य दिशा देणारे मार्गदर्शन केले. त्याबद्दल मी त्यांची अत्यंत ऋणी आहे.

पुणे जिल्ह्याचे महिला व बालविकास अधिकारी यांनी मला सुधारगृहातील बालकांच्या मुलाखती घेण्यास परवानगी दिल्याने त्यांचीही मी आभारी आहे. तसेच येरवडा व मुंढवा येथील सुधारगृहातील परीविक्षा अधिकाऱ्यांनी मला जे सहकार्य केले त्यांची मी आभारी आहे. तसेच सर्वात महत्त्वाचे म्हणजे सुधारगृहातील ज्या बालकांनी मला सविस्तर माहिती देऊन मुलाखती घेण्यास सहकार्य दिले त्याबद्दल त्यांची मी आभारी आहे.

प्रबंधाची देखणी प्रत सिद्ध करणारे दुर्गा कॉपीयर्स यांचीही मी आभारी आहे.


## Map of India



महाराष्ट्र राज्य

**Source : www.mapsofindia.com**

**Map of Maharashtra State**




पुणे जिल्हा

**Source : www.mapsofindia.com**

## Map of Pune City

## Hilighted Research Area




**Source : www.mapsofindia.com**

| प्रकरण क्र | अनुक्रमणिका | पृष्ठ क्र |
| --- | --- | --- |
| प्रकरण १ | विषयप्रवेश आणि समस्यासूत्रण | ०१ |
| प्रकरण २ | अगोदरच्या स्त्रोतांचा आढावा | ३६ |
| प्रकरण ३ | सिध्दांन्तकल्पना व अभ्यासपध्दती | ७६ |
| प्रकरण ४ | तथ्य संकलन व प्रत्यक्ष कामाचा अनुभव | ८८ |
| प्रकरण ५ | जमा केलेल्या माहितीचे सादरीकरण | ९५ |
| प्रकरण ६ | निष्कर्ष व सूचना | १४५ |
| प्रकरण ७ | संदर्भ सूची | १६० |
| | परिशिष्ट | १६२ |

| सारणी क्र. | शीर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ५.१ | निवडलेल्या नमुन्यातील मुलामुलींचे वयोगटानुसार विभाजन | ९६ |
| ५.२ | निवडलेल्या नमुन्यातील मुलामुलींचे शिक्षण पातळी नुसार विभाजन | ९७ |
| ५.३ | शिक्षणाची पातळी व मुलामुलींचे वयोगटानुसार विभाजन | ९८ |
| ५.४ | मुले -वयोगटानुसार गुन्ह्याचा प्रकार | ९९ |
| ५.५ | मुली -वयोगटानुसार गुन्ह्याचे प्रकार | १०० |
| ५.६ | मुलांचे गुन्ह्याचे कारण व गुन्ह्याचा प्रकार दर्शविणारी सारणी (फक्त एकाच कारणामुळे घडलेले गुन्हे) | १०१ |
| ५.७ | मुलांचे गुन्ह्याचे कारण व गुन्ह्याचा प्रकार दर्शविणारी सारणी ( एकापेक्षा अधिक कारणामुळे घडलेले गुन्हे) | १०२ |
| ५.८ | मुलींचे गुन्ह्याचे कारण व गुन्ह्याचा प्रकार दर्शविणारी सारणी (फक्त एकाच कारणामुळे घडलेले गुन्हे) | १०३ |
| ५.९ | मुलींचे गुन्ह्याचे कारण व गुन्ह्याचा प्रकार दर्शविणारी सारणी ( एकापेक्षा अधिक कारणामुळे घडलेले गुन्हे)- | १०४ |
| ५.१० | गुन्ह्याच्या प्रकारानुसार मुलामुलींचे विभाजन | १०५ |
| ५.११ | मुले - शिक्षणाची पातळी व गुन्ह्याचा प्रकार दर्शविणारी सारणी. | १०६ |
| ५.१२ | मुली - शिक्षणाची पातळी व गुन्ह्याचा प्रकार दर्शविणारी सारणी | १०७ |
| ५.१३ | मुले - शिक्षणाची पातळी व गुन्ह्याचे कारण दर्शविणारी सारणी | १०८ |
| ५.१४ | मुली - शिक्षणाची पातळी व गुन्ह्याचे कारण दर्शविणारी सारणी. | १०९ |
| ५.१५ | कौटुंबिक पार्श्र्वभुमीनुसार मुलामुलींचे विभाजन | ११० |
| ५.१६ | मुळ निवासानुसार मुलामुलींचे विभाजन | १११ |
| ५.१७ | छंदांच्या प्रकारानुसार मुलामुलींचे विभाजन | ११२ |
| ५.१८ | कुटुंबांच्या वार्षिक उत्पन्नानुसार मुलामुलींचे विभाजन | ११३ |
| ५.१९ | सुधारगृहातील कालावधी नुसार मुलामुलींचे विभाजन | ११४ |

| | | |
|---|---|---|
| ५.२० | कौटुंबिक पार्श्र्वभुमीनुसार मुलामुलींच्या वयोगटाचे विभाजन | ११५ |
| ५.२१ | कुटुंबाच्या वार्षिक उत्पन्नानुसार मुलामुलींच्या वयोगटाचे विभाजन | ११७ |
| ५.२२ | सुधार गृहातील कालावधी नुसार मुलामुलींच्या वयोगटाचे विभाजन | ११८ |
| ५.२३ | गुन्ह्याच्या कारणांचे मुलामुलींच्या वयोगटानुसार विभाजन | १२० |
| ५.२४ | गुन्ह्याची कारणे व मुलामुलींचे कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न | १२१ |
| ५.२५ | मुळ निवासानुसार मुलामुलींचे कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न दर्शविणारी सारणी | १२३ |
| ५.२६ | कौटुंबिक पार्श्र्वभुमीनुसार मुलामुलींचे कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न दर्शविणारी सारणी. | १२५ |
| ५.२७ | गुन्ह्याच्या प्रकारानुसार मुलामुलींचे कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न | १२६ |
| ५.२८ | मुले - सुधारगृहातील कालावधी व गुन्ह्याचा प्रकार | १२८ |
| ५.२९ | मुली - सुधारगृहातील कालावधी व गुन्ह्याचा प्रकार | १२९ |
| ५.३० | मुले - गुन्ह्याचा प्रकार व कौटुंबिक पार्श्र्वभुमी दर्शविणारी सारणी | १३० |
| ५.३१ | मुली - कौटुंबिक पार्श्र्वभुमी व गुन्ह्याचा प्रकार दर्शविणारी सारणी | १३१ |
| ५.३२ | मुले - कौटुंबिक पार्श्र्वभुमी व गुन्ह्याची कारणे दर्शविणारी सारणी | १३३ |
| ५.३३ | मुली - कौटुंबिक पार्श्र्वभुमी व गुन्ह्याचे कारण दर्शविणारी सारणी | १३४ |
| ५.३४ | मुले - मुळ निवास व गुन्ह्याचा प्रकार दर्शविणारी सारणी. | १३५ |
| ५.३५ | मुली - मुळ निवास व गुन्ह्याचा प्रकार दर्शविणारी सारणी | १३६ |
| ५.३६ | मुले - मुळ निवास व गुन्ह्याची कारणे दर्शविणारी सारणी | १३७ |
| ५.३७ | मुली - मुळ निवास व गुन्ह्याची कारणे दर्शविणारी कारणे | १३८ |
| ५.३८ | मुले - कौटुंबिक पार्श्वभूमी व मूळ निवास दर्शविणारी सारणी | १३९ |
| ५.३९ | मुली - कौटुंबिक पार्श्वभूमी व मूळ निवास दर्शविणारी सारणी | १४० |
| ५.४० | मुले - एकापेक्षा अधिक गुन्ह्यांचे विश्लेषण | १४१ |
| ५.४१ | मुली - एकापेक्षा अधिक गुन्ह्याचे विश्लेषण | १४३ |

| | प्रकरण १ – विषय प्रवेश आणि समस्या सूत्रण | पृष्ठ क्र |
|---|---|---|
| १.१ | भारतातील गुन्हेगारीशास्त्राचा विकास | ०२ |
| १.२ | गुन्ह्याचे स्वरूप व संकल्पना | ०३ |
| १.३ | गुन्ह्याच्या प्रकारांचे कायद्यानुसार वर्गीकरण | १२ |
| १.४ | बालगुन्हेगारी समस्येची पार्श्वभूमी | १४ |
| १.५ | भारतातील गेल्या ५० वर्षातील प्रौढगुन्हेगारी व बालगुन्हेगारीची आकडेवारी | २० |
| १.६ | महाराष्ट्रातील गेल्या ५० वर्षातील प्रौढगुन्हेगारी व बालगुन्हेगारीची आकडेवारी | २१ |
| १.७ | पुणे शहरातील बालगुन्हेगारी – गेल्या ५० वर्षातील आढावा | २४ |
| १.८ | पुणे शहरातील बालगुन्हेगारीचे चिंताजनक स्वरूप | ३० |
| १.९ | बालगुन्हेगारीच्या कारणांचा शोध | ३० |
| १.१० | बालगुन्हेगारीच्या अभ्यासाची आवश्यकता | ३३ |
| १.११ | समस्यासूत्रण | ३५ |

# विषय प्रवेश

अतिप्राचीन काळापासून मानवप्राणी आपल्या गरजा भागविण्यासाठी संघर्ष करत आला आहे. काळाच्या ओघामध्ये या गरजा कशा भागविल्या जाव्यात याबाबत काही लोकारूढी, लोकनीती, मूल्ये इ. संकेत निर्माण झाले. समाजाच्या समाजमान्य सांस्कृतिक चौकटीतच या गरजा भागविल्या जाणे, व्यापक समाजहिताच्या व स्वास्थ्याच्या दृष्टीने आवश्यक होते.

तथापि वाढत्या लोकसंख्येबरोबर समाजही आकाराने वाढला. त्यातील क्लिष्टता, गुंतागुंत आणखी जटील होत गेली. वाढत्या जटीलतेबरोबर आपल्या गरजांची पूर्तता समाजमान्य सांस्कृतिक चौकटीत भागविणे कठीण होऊ लागले. आपली गरज भागविणे हेच एक उद्दिष्ट प्रधान मानून त्यासाठी योग्य–अयोग्य, उचित–अनुचित, कायदेशीर–बेकायदेशीर, नैतिक–अनैतिक मार्गांचा अवलंब केला जाऊ लागला. समाजातील सामाजिक संकेत–नीतिमूल्यांचे उल्लंघन करून आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी समाजविरोधी, समाजविघातक कृत्ये घडु लागली. अशा समाजविघातक कृत्यांच्या व घटनांच्या अभ्यासावर समाजशास्त्रज्ञ लक्ष केंद्रित करू लागले.

वेगवेगळया समाजातील मुल्ये, नीतिसंहिता, आदर्शाच्या कल्पना यात थोडयाफार प्रमाणात भिन्नता आढळते. गुन्हेगारी वर्तनाचा संबंध याच बाबींशी असतो.त्यामुळे प्रत्येक समाजातील गुन्हेगारी, तिचे स्वरूप, प्रकार, तीव्रता व वैशिष्टये यांमध्येही फरक आढळतो.

गुन्हेगारी वर्तनाचा अभ्यास करणे वेगवेगळया शास्त्रातील अभ्यासकांना विशेषतः समाजशास्त्रज्ञांना आवश्यक वाटू लागले आणि पुढे याच अभ्यासात विशेषीकरण होऊन आता समाजशास्त्रात गुन्हेगारीशास्त्र ही एक शाखा विकसित झाली.

युरोपातील अभ्यासकांनी गुन्हेगारीसंबंधी विशेष अध्ययन करून महत्वपूर्ण योगदान केले.१८ व्या शतकात अभ्यासकांनी गुन्हेगारी वर्तनाचा अभ्यास जीवशास्त्रीय दृष्टिकोणातून करण्यास सुरवात केली.कालांतराने गुन्हेगारी वर्तनाचा भौगोलिक, मानसशास्त्रीय, शारिरिक, सामाजिक–सांस्कृतिक दृष्टिकोणातून अभ्यास केला गेला. या प्रारंभीच्या अभ्यासकांमध्ये

इटलीतील सीझर बेकारीया, बेल्जियममधील ॲडॉल्फ केटलेट, फ्रान्समधील ए.एम.गेरी, कैसर लॉन्ब्रोसो, चार्लस गोरींग, एडविन सदरलॅंड, विल्यम बोंजर, अर्नेट हूटन, हेन्री गोडार्ड इत्यादींचा समावेश होतो. तथापि, कैसर लॉन्ब्रोसो यांना आधुनिक गुन्हेगारीशास्त्राचे शिल्पाकार असे म्हणतात तर सीझर बेकारीया यांनी गुन्हेगारांचा शास्त्रीय पध्दतीने अभ्यास करून गुन्हेगारी वर्तनाबाबत काही निश्चित नियम, पध्दत प्रस्थापित करण्याचे कार्य केले म्हणुन त्यांना गुन्हेगारीशास्त्राचे जनक असे म्हणतात. [१]

## १.१ भारतातील गुन्हेगारीशास्त्राचा विकास

भारतामध्ये समाजशास्त्राच्या औपचारिक अध्ययन व अध्यापनाची सुरूवात प्रो.पेट्रीक गेडिस यांनी १९१९ साली मुंबई विद्यापीठात केली. डॉ.जी.एस.घुर्ये यांनी भारतीय समाजाच्या विविध घटकांचे शास्त्रीय दृष्टीने विश्लेषण केले. भारतातील अभ्यासकांनी बालगुन्हेगारी, प्रौढगुन्हेगारी, स्त्री–गुन्हेगारी इ.क्षेत्रात अभ्यासाला प्रारंभ केला होता त्यामध्ये बालगुन्हेगारांची कारणे, एकुण गुन्हेगारीतील बालकांचा सहभाग, गुन्ह्याचे प्रकार, बालकाची आर्थिक व कौटुंबिक पार्श्वभुमी, बालगुन्हेगारीतील मुलींचा सहभाग त्यातील मुख्यतः लैंगिक गुन्हे, वेश्याव्यवसाय इ.यांचा अभ्यास झाला.

पेरीन केरावाला यांचा "A Study in Indian Crime",1959, हंसा शेठ यांचा "Juvenile Delinquency in India Setting" 1961, सुशीलचंद्र यांचा"सोशियॉलॉजी ऑफ डेव्हिएशन", १९६७, बालगुन्हेगारीवरील एस.आर.श्रीवास्तव यांचा " Juvenile Delinquency", डॉ.सुधा काळदाते यांचा "Society Delinquent and Juvenlie Court",1982 इत्यादी अभ्यास ग्रंथ बालगुन्हेगारी संदर्भात प्रसिध्द झाले.

स्वातंञ्योत्तर काळात भारतात औद्योगिकरण आणि नागरीकरणाच्या प्रक्रियेला चालना मिळाली. एकूण गुन्हेगारीमध्ये स्त्रियासंबंधी होणाऱ्या गुन्ह्यांमध्ये वाढ होऊ लागली. तसेच स्त्री गुन्हेगारांचेही प्रमाण वाढले. साहजिकच अभ्यासकांना गुन्हेगारीतील स्त्रियांचा सहभाग, स्त्री गुन्हेगार इत्यादींचा अभ्यास करणे आवश्यक वाटू लागले. स्त्रियांसंबंधी होणाऱ्या गुन्ह्यात

मुख्यतः लैंगिक गुन्हे, वेश्याव्यवसाय, कॉल गर्ल्स, स्त्रियांचा व्यापार, हुंडाबळी, स्त्रियांवरील अत्याचार यांचा अभ्यास झाला. राम अहुजा यांचे "Female Offenders In India 1969, Female crime : A New Theoretical perspective",& "Crime against women", 1987, अत्रे जे.पी.यांचा "Crimes against women", 1988 इत्यादी अभ्यास ग्रंथ प्रसिध्द झाले.

या शिवाय एकूणच गुन्हेगारीचे गुणात्मक विश्लेषण करणारे काही अभ्यास झाले. या अभ्यासामध्ये डॉ.एम.जे.सेठना यांचा "Society and the Criminal" 1951, परिपूर्णानंद वर्मा यांचा "Pathology of Crime And Delinquency"1972, वर्मा.पी.यांचा "Crime Convict And Criminals" इत्यादींचा उल्लेख केला जातो. (२)

## १.२.गुन्ह्याचे स्वरूप व संकल्पना

### १. गुन्ह्याची प्राचीन संकल्पना ः

'गुन्हा' या शब्दाचा व्यवहारातील अर्थ म्हणजे प्रचलित कायद्याविरूध्द वर्तन असा होतो.पूर्वी जेव्हा लिखित कायदे अस्तित्वात नव्हते तेव्हा गुन्ह्यांचा अर्थ मनुष्य ज्या समाजात राहतो त्या समाजास किंवा त्यातील व्यक्तीस त्रास किंवा दुःख होईल असे वर्तन असा समजला जाई. आदिमानवाच्या काळात भारतात व भारताबाहेर मध्य अशिया वगैरे भागात जे लोक टोळ्या -टोळ्यांनी राहत होते त्यांच्यात सुध्दा राहण्याचे व वागण्याचे काही संकेत सर्वांच्या संमतीने ठरवलेले असत व त्याच्या विरूध्द वागणे म्हणजे गुन्हा समजला जाई.प्राचीन काळात गुन्हा करणे म्हणजे 'पाप' मानले जाई. कायदे किंवा नियम यांचा उल्लेख धर्म या शब्दाने करीत असत. उदा. पितृधम, राजधर्म, प्रजाधर्म इ.समाजात धर्माचा विशेष प्रभाव होता. लोकांनी आपल्या धर्मानुसारच वर्तन केले पाहिजे असे धर्मप्रमुखांचे बंधन होते.धर्माच्या विरूध्द वर्तन करणे पाप मानले जायचे. धर्माच्या प्रभावामुळे प्रत्येक व्यक्ती धार्मिक नियम, रीतीरिवाज, परंपरा इत्यादींचे निमूटपणे पालन करायची. त्यामुळे समाजाविरोधी वर्तन सहसा घडून येत नव्हते. म्हणजे समाजावर नियंत्रण ठेवण्याचे अतिशय महत्वाचे कार्य धर्माद्वारे पार पाडले जात .(३)

**२. गुन्ह्याची सामाजिक संकल्पना ः**

प्राचीन संकल्पनेनंतर कालांतराने पुढे गुन्ह्याची सामाजिक संकल्पना विकसित झाली. "कोणतेही समाजविघातक कृत्य म्हणजे गुन्हा" असे मानले जावू लागले. सामाजिक प्रमाणके किंवा समाजाच्या विरूध्द केलेली कोणतीही नियमबाह्य कृती अथवा वर्तन म्हणजे गुन्हा अशी संकल्पना प्रचलित झाली. उदा. १८व्या शतकाच्या सुमारास आतंरजातीय विवाह हे गुन्हा समजले जात होते.

गुन्ह्याची सामाजिक संकल्पना ही अतिशय व्यापक आहे.जे वर्तन अथवा कृती सामाजिकदृष्टया अयोग्य, वाईट मानले असेल, त्या सर्व वर्तनाचा आणि कृतीचा समावेश गुन्ह्यांमध्ये केला जातो. सामाजिक संबंधात बिघाड घडवून आणणारे वर्तन हे समाजविरोधी असते कारण त्यामुळे समाजावर त्याचा वाईट परिणाम घडतो.

**'गुन्हा' संकल्पनेची समाजिक व्याख्या ः**

१. **मॅनहिम** ः "गुन्हा म्हणजे समाजविरोधी व्यवहार होय." गुन्हा म्हणजे समाजविरोधी केलेले कृत्य होय.

२. **रॅडक्लिफ ब्राऊन** ः "गुन्हा हा प्रचलित रितीचे उल्लंघन होय".

३. **थॉमस आणि झेनेकी** ः "गुन्हा म्हणजे अशी कृती, जी समूहाच्या ऐक्याविरूध्द असते."

वरील व्याख्यांमधून हे स्पष्ट होते की, 'सामाजिक दृष्टीने निषिध्द, अनैतिक, अयोग्य, अहितकारक, असे कृत्य किंवा वर्तन करणे म्हणजे गुन्हा होय'. अशा प्रकारचे वर्तन एखाद्या वेळेस कायद्याच्या दृष्टीने गुन्हा नसेल परंतु सामाजिकदृष्टया मात्र ते गुन्हा ठरते. तसेच व्यक्तीच्या अशा कृत्य किंवा वर्तनाबाबत समाज निषेध, बहिष्कार इ. गोष्टींचा अवलंब करीत असतो.

**३ . गुन्ह्याची मानसशास्त्रीय संकल्पना ः**

१७ व्या शतकानंतर गुन्ह्याच्या सामाजिक संकल्पनेनंतर गुन्ह्याची मानसाशास्त्रीय संकल्पना आस्तित्वात आली. कोणत्याही मानसिक कारणांमुळे म्हणजेच मानसिक विकृती, मानसिक आजार, मेंदूचे विकार इ. यामुळे घडणारे नियमबाह्य वर्तन किंवा कृती गुन्हा मानली जावू लागली. गुन्ह्याच्या या मानसाशास्त्रीय संकल्पनेत मानसिक स्थितीवर जास्त भर दिला आहे.

**४ . गुन्ह्याची सामाजिक व मानसिक संकल्पना ः**

"कोणतेही समाजविघातक कृत्य किंवा मानसिक विकृतीच्या आहारी जावून केलेले समाजबाह्य वर्तन हे गुन्ह्याची सामाजिक व मानसिक संकल्पना दर्शवितात. अनेक गुन्हेगारशास्त्रज्ञ गुन्ह्यांच्या कारणांमध्ये सामाजिक व मानसिक कारणे गुन्ह्याला जबाबदार असल्याचे मानतात.

**५ . गुन्ह्याची समाजिक . मानसिक व वैधानिक संकल्पना ः**

१९ व्या शतकाच्या सुरवातीला धर्माचा प्रभाव कमी झाला. लोकांनी विचलनात्मक वर्त न करू नये, याकरिता धर्माची जागा कायद्याने घेतली आहे. आज संपूर्ण जगात सामाजिक नियंत्रणाचे कार्य कायद्याव्दारे केले जाते. ज्या व्यक्ती कायद्याचे पालन करीत नाहीत आणि कायद्याचे उल्लंघन करतात त्यांच्या वर्तनास 'गुन्हा' म्हटले जाते. आधुनिक काळात जसाजसा कायद्याचा विकास झाला तसतसे गुन्ह्याचे स्वरूप बदलत गेले. यामध्ये कायद्याला जास्त महत्व प्राप्त झाले. व्यक्तीच्या हातून घडलेले समाजविघातक कृत्य किंवा वर्तन हे कायद्याच्या दृष्टिकोनातून गुन्हा असेल तर त्याला गुन्हा मानले जाते परंतु व्यक्तीच्या हातून घडलेले समाजबाह्य वर्तन हे जरी समाजविघातक असले परंतु कायद्याच्या दृष्टीकोनातून ते गुन्हा ठरत नसेल तर असे वर्तन करणाऱ्या व्यक्तीला गुन्हेगार मानले जात नाही.

**उदा.** आर्तंधर्मीय विवाह हा जरी धर्माच्या संस्कृतीला व प्रचलित नियमांना हानी पोचवणारा असला तरी कायद्याने आर्तंधर्मीय विवाह हा गुन्हा मानला जात नाही कारण त्यामुळे देशाचे कोणतेच नुकसान होत नाही. मात्र या आर्तंधर्मीय विवाहामुळे दोन धर्मामध्ये संघर्ष निर्माण झाले व त्यामुळे जिवित हानी झाली तर कायद्याने तो संघर्ष गुन्हा ठरतो.

प्रत्येक समाजात विशिष्ट प्रमाणके आणि कायदे असतात. समाजातल्या सर्व व्यक्तींनी प्रमाणके व कायद्यानुसार वर्तन करावे अशी समाजाची अपेक्षा असते. त्यामुळे प्रत्येक व्यक्ती प्रमाणके आणि कायदे लक्षात घेऊन त्यानुसार वर्तन करते. मात्र काही व्यक्ती प्रमाणकांचे व कायद्याचे उल्लंघन करतात. म्हणजेच त्या व्यक्ती विचलनात्मक वर्तन करतात. हे विचलनात्मक वर्तन समाजाच्या आणि कायद्याविरोधी असते. व्यक्तीच्या समाजाविरोधी आणि कायद्याविरोधी वर्तनास 'गुन्हा' असे म्हणतात.

गुन्हा करणाऱ्या व्यक्तीस 'गुन्हेगार' असे संबोधले जाते. गुन्हा म्हणजे कायदाबाह्य कृत्य आणि गुन्हेगार म्हणजे कायदाबाह्य कृत्य करणारी व्यक्ती होय. अशा व्यक्तीला समाजाची निंदा व कायद्याने मिळालेली शिक्षा या दोन्ही गोष्टीना तोंड द्यावे लागते. कायद्याने गुन्हा सिध्द झाला की तो गुन्हा करणाऱ्या व्यक्तीला शिक्षा दिली जाते. जसा गुन्हा असेल त्या स्वरूपाची शिक्षा तिला मिळते म्हणूनच इलियट व मेरील म्हणतात "अपराध म्हणजे कायद्याच्या विरूध्द होणारे वर्तन की, जे केले गेल्यास, मृत्यू, दंड, कारागृह किंवा सुधारगृह किंवा तत्सम जागी डांबून ठेवण्याची शिक्षा दिली जाते." (४)

## गुन्ह्याची वैधानिक संकल्पना ः

"कायद्याव्दारा ज्या गोष्टी निषिध्द मानल्या आहेत असे वर्तन करणे म्हणजे गुन्हा ठरतो." समाजातील प्रचलित कायद्याच्या विरूध्द असलेले व्यक्तीचे कोणतेही वर्तन हे वैधानिक दृष्टिकोनातून गुन्हा असते. कायद्याच्या आधारावर गुन्ह्याची व्याख्या वैधानिक दृष्टिकोनातून केली जाते. वैधानिक दृष्टिकोनातून गुन्ह्याच्या व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत ः-

**'गुन्हा' संकल्पनेची वैधानिक व्याख्या ः**

१. **गिलीन आणि गिलिन** ः "कायदेशीरदृष्टया गुन्हा म्हणजे त्या त्या देशातील कायद्यांचे उल्लंघन होय"

२. **इलियट व मेरील** ः "गुन्हा म्हणजे कायद्याच्या विरूध्द होणारे वर्तन की जे केल्यास मृत्यू, दंड, कारागृह किंवा सुधारगूह किंवा तत्सम जागी डांबून ठेवण्याची शिक्षा दिली जाते.

३. **डॉ.एम.जे.सेठना** ः "गुन्हा म्हणजे असे कोणतेही कार्य किंवा वर्तन होय जे सबंधित देशाच्या प्रचलित कायद्यानुसार शिक्षेस पात्र आहे".

४. **हर्टन आणि लेस्सी** ः "कायद्याचे कोणत्याही प्रकारचे उल्लंघन म्हणजे गुन्हा होय".

५. **डी.ई. पॉपलिन** ः "व्यक्तीस ज्या वर्तन प्रतिमानाबद्दल कायद्याने दंडित करण्यात येते त्या वर्तनास गुन्हा म्हणतात".

वैधानिक किंवा कायद्याच्या दृष्टिकोनातून करण्यात आलेल्या व्याख्यांमधून स्पष्ट होते की, देशातील प्रचलित कायद्याविरूध्द केलेले वर्तन म्हणजे गुन्हा होय. या व्याख्यांमधे फक्त कायद्याविरोधी वर्तनाचा समावेश गुन्ह्यामध्ये केला आहे.

**वैधानिक दृष्टिकोनातून गुन्ह्याची पुढील वैशिष्टे सांगता येतील.**

१. कायद्याद्वारा निषिध्द ठरविण्यात आलेल्या वर्तनास गुन्हा म्हणतात.

२. कालमानपरत्वे प्रचलित कायद्यांच्या संदर्भात गुन्ह्याचे विवेचन केले जाते.

३. प्रत्येक समाजात गुन्ह्याची संकल्पना काही प्रमाणात वेगवेगळी असते.

४. ज्या कार्य किंवा वर्तनामुळे सामुहिक हितास धोका निर्माण होतो अशा कार्य किंवा वर्तनास कायद्याव्दारे निषिध्द ठरविले जाते.

५. प्रत्येक अनैतिक कृती कायद्याने गुन्हा मानली जाईलच असे नाही.

६. जी गोष्ट कायद्याने गुन्हा असते, ती गोष्ट नैतिकदृष्टया अयोग्य असलीच पाहिजे हे आवश्यक नाही.

७. प्रत्येक गुन्ह्याकरीता निश्चित दंड ( शिक्षा) देण्याची व्यवस्था कायद्याव्दारे केली जाते.

गुन्ह्यासंबधी प्राचीन, सामाजिक, मानसिक व वैधानिक दृष्टिकोन मांडण्यात आले असले तरी वर्तमानकाळात मात्र वैधानिक दृष्टिकोन महत्वाचा मानण्यात आला आहे. थोडक्यात आधुनिक काळात समाजविरोधी वर्तनास गुन्हा म्हणण्याऐवजी कायद्याविरोधी वर्तनास गुन्हा म्हटले जाते. [५]

**गुन्ह्याच्या वैधानिक व्याख्येची सहा तत्वे :**

१. कृत्य हे वास्तवात केले गेले पाहिजे किंवा ते कायद्यातील कर्तव्याची अवहेलना असले पाहिजे. कोणतीही व्यक्ती केवळ आपल्या विचारांमुळे शिक्षेस पात्र होत नाही. काही बाबतीत 'शब्द' हे सुदधा 'कृत्य' समजले जातात. जसे देशद्रोह मध्ये किंवा इतर व्यक्तीला गुन्हा करण्यासाठी भडकवण्याबद्दल इ. कायद्यातील कर्तव्याची अवहेलना सुध्दा अपराध आहे.

**अ. उदा.:** 'अ' व्यक्तीला भेटायला कोणी 'ब' व्यक्ती येते आणि 'ब'व्यक्तीला हृदयाचा झटका येतो. तेव्हा 'अ' ही व्यक्ती डॉक्टरास बोलवण्यास असमर्थ ठरते आणि शेवटी 'ब' ह्या व्यक्तीचा जीव जातो. अशा परिस्थितीत 'अ' या व्यक्तीला आपल्या कर्तव्याची अवहेलना करण्याबद्दल शिक्षा दिली जात नाही. कारण कायद्याने आपल्या अतिथीचा जीव वाचवणे हे 'अ' या व्यक्तीला बंधनकारक नाही.

**ब. उदा.:** 'अ' ही व्यक्ती एक पाळणाघर चालवत आहे. त्या पाळणाघरातील एका मुलाला गंभीर जखम होते. परंतु 'अ' ही व्यक्ती डॉक्टरला बोलवण्यास असमर्थ ठरते आणि बालकाचा जीव जातो. अशा वेळी पाळणाघर चालवणाऱ्या 'अ' व्यक्तीला त्या मुलाचे प्राण वाचविण्याचे वैधानिक कर्तव्याची अवहेलना केली गेल्याबद्दल शिक्षा केली जावू शकते.

२. कृत्य ऐच्छिक असले पाहिजे आणि तेव्हा केले गेले पाहिजे जेव्हा कृत्य करणारी व्यक्तीचे आपल्या कृत्यांवर पुर्णपणे नियंत्रण असेल.

**उदा.** ः एखाद्या व्यक्तीजवळ कुत्रा आहे. एकदा शेजारचा लहान मुलगा कुत्र्याजवळ येतो व त्याची खोड काढतो व त्याला मारतो. कुत्रा त्या मुलाला चावतो. अशा वेळेस त्या कुत्र्याच्या मालकावर कोणताही आरोप ठेवता येत नाही. परंतु याउलट त्या मालकाने कुत्र्याला चावण्याची सवय आहे हे माहिती असून सुद्धा त्याला साखळीने बांधून ठेवले नाही व तो कुत्रा कुणा व्यक्तीला चावला तर ती व्यक्ती त्या कुत्र्याच्या मालकाविरूध्द गुन्हा नोंदवू शकते.

३. कृत्य हे हेतुपुर्व असले पाहिजे. मग जर हेतु सामान्य असेल किंवा विशिष्ट. जर एखादी व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीला गोळी मारण्याचा हेतू ठेवून किंवा विशेष हेतुविनाच कुणाला गोळी मारते तर ती गुन्हा करते. कारण तिला माहित असते की आपले कृत्य दुसऱ्या व्यक्तीला जखमी किंवा ठार मारू शकते.

४. कृत्य हे गुन्ह्यासंबंधी कायद्याचे उलंघन असले पाहिजे ते गैर गुन्हेगारी कायदा व प्रशासनिक कायदा यापासुन वेगळे असले पाहिजे. गैर गुन्हेगारी कायदा व्यक्ती आणि संघटनाच्या मधील अधिकारांना नियमित करते.

**उदा.**ः घटस्फोटाचे नियम, संपत्ती अधिकार इ. काही गुन्ह्यांमध्ये एखादी व्यक्ती किंवा एखादे राज्य आरोप लावू शकते. काही कृत्य हे व्यक्ती व राज्य दोघांसाठी गुन्हा ठरू शकते.

**उदा.**ः एखादा व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीवर हल्ला करते त्या व्यक्तीवर राज्याव्दारा किंवा त्या व्यक्तीव्दारा हानी पोचविण्याबदद्ल आरोप करू शकतो.

५. कृत्य हे स्वसंरक्षणासाठी केले गेले पाहिजे. कृत्य जर स्वरक्षा किंवा वेडेपणाच्या झटक्यामुळे केले गेले असेल तर तो गुन्हा मानला जात नाही जरी त्यामुळे कुणा व्यक्तीची हानी किंवा नुकसान झाले असेल.

६. कृत्य हे राज्याव्दारा गंभीर अपराध किंवा समाजाव्दारा गंभीर अपराध असला पाहिजे. जर एखाद्या व्यक्तीचे कृत्य सामाजिकदृष्टया हानी पोचविणारे असेल तर त्याच्यासाठी समाजात शिक्षा देण्याची व्यवस्था केली गेली असेल.

**उदा.४** पाच वर्षाच्या मुलावर हत्या केल्याबद्दल खटला चालवू शकत नाही. कारण राज्याने या वयोगटातील मुलांसाठी कुठलाही शिक्षेचा कायदा केला नाही. मग जरी त्याचे हे कृत्य समाजासाठी हानीदायक असेल तरी त्या मुलाला कोणतीही शिक्षा होत नाही. (६)

## गुन्ह्यांच्या प्रकारानुसार गुन्ह्यांचे वर्गीकरण

### गुन्ह्यांचे प्रकार

- १. सदरलॅड
  - अ.गंभीर गुन्हे
  - ब.साधारण गुन्हे
- २.बोंगर
  - अ. आर्थिक गुन्हे
  - ब. लैंगिक गुन्हे
  - क.राजकीय गुन्हे
  - ड. इतर गुन्हे
- ३.हेज
  - अ.व्यवस्थेविरूध्द गुन्हे
  - ब.संपत्तीविरूध्द गुन्हे
  - क.व्यक्ती विरूध्द गुन्हे

## गुन्हेगारांच्या प्रकारानुसार गुन्हेगारांचे वर्गीकरण

### गुन्हेगारांचे प्रकार

- १. लोम्ब्रोसो
  - अ.जन्मजात गुन्हेगार
  - ब.भावनाप्रधान गुन्हेगार
  - क.मनोविकृत गुन्हेगार
  - ड. आकस्मिक गुन्हेगार
- २. सदरलँड
  - अ.निम्नवर्गीय गुन्हेगार
  - ब.पांढरपेशी गुन्हेगार

## गुन्ह्यांच्या कारणांनुसार गुन्ह्यांचे वर्गीकरण

**गुन्ह्यांची कारणे**

१.भौगोलिक कारणे
२.जैविक कारणे
३.मानसशास्त्रीय कारणे
४.सामाजिक कारणे
५.आर्थिक कारणे
६.नागरीकरण व औद्योगिकरण

**लिंगभेदानुसार गुन्हेगारांचे वर्गीकरण**

१. स्त्री गुन्हेगार
२. पुरूष गुन्हेगार

**वयोगटानुसार गुन्हेगारांचे वर्गीकरण**

१. बाल गुन्हेगार
२. तरूण गुन्हेगार
३. प्रौढ गुन्हेगार

**गुन्हेगारांचे वयोगटानुसार शिक्षेचे स्वरूप**

१. बाल गुन्हेगार
- अ. बालसुधारगृह

२. पौढ गुन्हेगार
- ब. बंद किंवा खुले कारागृह/ तुरूंगवास (७)

## १.३ गुन्ह्यांच्या प्रकारांचे कायद्यानुसार वर्गीकरण ः

### अ) भारतीय दंड विधान या कायद्याखाली येणारे गुन्हे –

१. जीविताविरूध्दचे गुन्हे ः खून, खूनाचा प्रयत्न, सदोष मनुष्यवध, अपहरण व पळवून नेणे, दुखापत.

२. मालमत्तेबाबतचे गुन्हे ः चोरी, दरोडा, दरोडयाची तयारी, जबरी चोरी, घरफोडी इ.

३. स्त्रियांवरील अत्याचाराचे गुन्हे ः हुंडाबळी, पती किंवा त्याच्या नातेवाईकांनी केलेला छळ, विनयभंग, बलात्कार इ.

४. अनैतिक बाबींसाठी मुलींची खरेदी विक्री करणे, स्त्रियांची छेडछाड इ.

५. इतर भारतीय दंड विधान गुन्हे

६. सार्वजनिक मालमत्तेविरूध्द गुन्हे ः दंगा, जाळपोळ

७. आर्थिक गुन्हे ः विश्वासघात, फसवणूक, बनावट नाणी, कागदपत्रे इ.

८. बालकांच्या विरूध्दचे गुन्हे ः बलात्कार, अपहरण, अनैतिक कामासाठी मुलींची खरेदी विक्री, मुलांना टाकून देणे, नवजात शिशूंची हत्या, भ्रूणहत्या.

### ब) विशेष कायद्याखाली येणारे गुन्हे

१. शस्त्रांसबंधी कायदा

२. मादक औषधे व अमली पदार्थ कायदा

३. जुगारासंबंधी कायदा

४. अबकारी कायदा

५. दारूबंदी कायदा

६. स्फोटक पदार्थसंबंधीचा कायदा

७. अनैतिक व्यापार (प्रतिबंध) कायदा

८. भारतीय रेल्वे कायदा

९ . परकीय नागरिक नोंद कायदा

१० . नागरी हक्क संरक्षण कायदा

११ . भारतीय पारपत्र कायदा

१२ . अत्यावश्यक वस्तुसंबंधीचा कायदा

१३ . पुराण वस्तु आणि मौल्यवान कलाकृतीसंबंधी कायदा

१४ . हुंडा प्रतिबंधक कायदा

१५ . बालविवाह प्रतिबंधक कायदा

१६ . स्त्रियांचे अश्लिल देहप्रदर्शन (प्रतिबंध) कायदा

१७ . प्रकाशन हक्क कायदा

१८ . सती बंदी कायदा

१९ . अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा

२० . वन कायदा

२१ . विशेष व स्थानिक कायद्याखाली येणारे (इतर) गुन्हे

भारतातील बालगुन्हेगारीची संकल्पना समजावून घेण्यासाठी आपल्याला कायद्याचा विचार करावा लागतो तो म्हणजे 'भारतीय दंड संहिता' होय. बाल गुन्हेगारांच्या संदर्भात इंडियन पिनल कोड तसेच क्रिमिनल प्रोसिजर कोड (फौजदारी प्रक्रिया संहिता) मध्ये खालील तरतुदी केल्या आहेत.

१. आय.पी.सी.कलम ८२ आणि ८३ नुसार विविध वयोगटातील मुलांची गुन्हयातील फौजदारी जबाबदारीची व्याप्ती किंवा दायित्व स्पष्ट केले आहे. ७ वर्षे वयाखालील मुलाने जरी एखादा अपराध केला तरी कायदा त्याची दखल घेत नाही असे कायद्याचे तत्व आहे. कारण या वयातील मुलांना आपण करतो त्या कृत्याचे स्वरूप व होणारे परिणाम यांची अपरिपक्वतेमुळे जाणीव असत नाही, म्हणून या वयोगटातील मुलांकडे कायदा सौम्य

दृष्टीने पाहतो. **इंडियन पिनल कोडच्या कलम ८३ नुसार ७ ते १३ वर्षे वयाच्या मुलांवर मर्यादित फौजदारी दायित्व किंवा जबाबदारी आहे.**

२. १९७३ च्या क्रिमिनल प्रोसिजर कोडच्या कलम ३६0 प्रमाणे २१ वर्षाखालील व्यक्ती 'प्रथम अपराधी' समजून तिच्यावर प्रस्थापित प्रध्दतीने फौजदारी न्यायालयात खटला न चालविता कायद्यानुसार विशेष पध्दतींनी त्या सुधारण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत. सराईत किंवा निर्ढावलेल्या गुन्हेगारांपासून त्याचे विलगीकरण करण्यात यावे. त्यामुळे तो पुन:पुन्हा गुन्हा करायला प्रवृत्त होणार नाही असा त्यामागे उद्देश आहे.

३. क्रिमिनल प्रोसिजर कोडच्या कलम २७ नुसार १६ वर्याखालील व्यक्तीने एखादा गुन्हा केल्यास त्याचे पूर्वायुष्य, चारित्र्य, आणि ज्या परिस्थितीत त्याने गुन्हा केला ती परिस्थिती विचारात घेऊन त्याला सौम्य शिक्षा देण्यात यावी. मात्र जन्मठेप किंवा मृत्युदंडासारखी शिक्षा असलेला गुन्हा त्याने केलेला असता कामा नये असेही या कायद्यात म्हटलेले आहे.

**बालगुन्हेगाराला सामाजिक कलंक लागून त्याच्या वर्तनाला प्रतिबंध करण्याच्या उद्देशाने त्याच्यावर चाललेल्या खटल्याच्या कामकाजाला प्रसिध्दी दिली जात नाही. त्याचे नाव, पत्ता किंवा ज्यामुळे त्याची ओळख पटेल अशी कुठलीही माहिती गोपनीय ठेवली जाते.** [८]

## १.४ बालगुन्हेगारी समस्येची पार्श्वभूमी ः

**प्रस्तावना ः**

बालगुन्हेगारी ही १७व्या शतकापासून असलेली एक महत्त्वाची समस्या आहे. गुन्हेगार हे एकाएकी अचानक गुन्हेगार होतात असे नाही, बालगुन्हेगारीतच पौढगुन्हेगाराची मूळे असतात् बालगुन्हेगारीवर वेळीच प्रतिबंध आणि उपाययोजना झाली नाही तर बालगुन्हेगाराची समस्या आणखी जटील होईल बालगुन्हेगारी प्राचीन काळापासून समाजात अस्तित्वात आहे हे आपल्याला प्राचीन वाङ्मयावरून समजते.

सहा हजार वर्षापूर्वी इजिप्तमधील एका धर्मगुरूंनी एका थडग्याच्या भिंतीवर लिहिलेल्या मजकुरातील या ओळी पाहा.

**"अलीकडील काळात आपल्या समाजाचे अधःपतन झाले आहे. मुले आपल्या पालकांच्या आज्ञांचे पालन करत नाहीत. त्यामुळे या जगाचा अंत जवळ येत चालला आहे अशी चिन्हे दिसत आहेत."** (९)

याचा अर्थ एवढाच की मुलांच्या उन्मर्गीपणाची किंवा विचलित वर्तनाची समस्या (Problem of deviant behavious) ही पुर्वीपासूनची आहे. फक्त त्या अवांछनीय वर्तनाचे स्वरूप (undesired behaviour) आणि व्याख्या यात बदल झाला आहे. त्यासाठी आपल्याला बालगुन्हेगारीची व्याख्या–अर्थ—स्वरूप समाजावून घेणे क्रमप्राप्त ठरते.

आधुनिक समाजात निर्माण झालेल्या विविध सामाजिक समस्यांपैकी 'बालगुन्हेगारी' ही एक महत्वाची सामाजिक समस्या आहे. तरूण वयातील अट्टल गुन्हेगार हा बालगुन्हेगारीतूनच जन्म घेत असतो कारण बालवयातच तो गुन्ह्याचे प्राथमिक धडे शिकत असतो. १७व्या शतकापूर्वी भारतात बालगुन्हेगारीची समस्या फारशी दिसून येत नव्हती. परंतु नागरीकरण आणि औद्योगिकरणामुळे बालगुन्हेगारी ही समस्या प्रकर्षाने पुढे आली आहे असे बऱ्याच आधुनिक समाजशास्त्रज्ञांना वाटते. नागरीकरणाच्या प्रक्रियेमुळे ज्या सामाजिक परिस्थिती निर्मा ण झाल्यात त्या देशातील कुटुंबसंस्थेचा घाट बदलविण्यास कारणीभूत झाल्या व त्यातूनच बालकांच्या व्यक्तिमत्व विघटनास सुरूवात झाली. अनेक मुले ग्रामीण भागातून शहराकडे आली किंवा झोपडपट्टीत राहून शहरी परिस्थितीशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करीत होती पण त्यात ती असमर्थ ठरली. याचा परिणाम म्हणजे शहरी परिस्थितीशी असमायोजन करणाऱ्या मुलांच्या संख्येत हळूहळू वाढ झाली.

वरील विवेचनाचा अर्थ असा नाही की नागरीकरणाची औद्योगिकरणाची प्रक्रिया सुरू होण्यापूर्वी भारतात बालगुन्हेगारी अस्तित्वात नव्हती. बालगुन्हेगारीची समस्या त्याआधीही होती पण त्याची तीव्रता कमी होती. संयुक्त कुटुंबपध्दती, सुटसुटीत व स्वायत्त पारंपरिक भारतीय खेडी, स्थानिक समुदायाचे कडक सामाजिक नियंत्रण यांसारख्या अनेक कारणांमुळे गुन्हेगारी प्रवृत्तीला आपोआप आळा बसत होता. (१०)

**बालगुन्हेगारीच्या व्याख्या :**

**१. मार्शल बी.क्लिनार्ड :** "विशिष्ट वयाखालील विशेषतः १६ ते १८ वर्षाखालील व्यक्तींनी इतर व्यक्तींना किंवा समाजाला घातक ठरेल अशा रीतीने केलेले समाजविघातक कृत्य म्हणजे बालगुन्हेगारी होय."

**२.डॉ.एम.जे.सेठना :** "विशिष्ट समुहात विद्यमान असलेल्या कायद्यानुसार विशिष्ट वयाखालील बालकाने अथवा तरूण व्यक्तीने केलेले गैरकृत्य म्हणजे बालगुन्हेगारी होय." (११)

**३.वाल्टर रेक्लेकस :** "बालगुन्हेगारी ही संकल्पना गुन्हेगारी कायद्याचे उल्लंघन आणि अशा प्रकारच्या व्यवहार प्रतिमानास लागू होते की, जे वर्तन बालक किंवा युवकांच्या बाबतीत अयोग्य मानले जाते".

**४.फ्रेड लॅडर :** "बालगुन्हेगारी म्हणजे कायद्याच्या आधारे कारवाई करण्यास पात्र असे मुलांचे दुर्वर्तन होय".

**५.विल्यम एफ शेल्डन :** "बालगुन्हेगारी म्हणजे समाजाच्या रास्त अपेक्षांचा भंग करणारे बालकाचे वर्तन होय". (१२)

या व्याख्यांचा मथितार्थ असा की "बालगुन्हेगारी" ही संज्ञा विशिष्ठ वयाखालील व्यक्तींनी केलेल्या असामाजिक किंवा समाजविघातक कृत्याला देता येईल. सर्व साधारणता असे समाज विघातक कृत्य केले असता प्रौढाला कायद्याने योग्य ती शिक्षा झाली असती परंतु बालकाला मात्र कायद्याप्रमाणे शिक्षा न करता त्यावर वेगळी उपाययोजना केली जाते.

वरील व्याख्यांनुसार कायद्याच्या वयाच्या अटीत बसणाऱ्या मुलाने किंवा मुलीने केलेले सामाजविघातक कृत्य हे बालगुन्हेगारीच्या निर्मितीस कारणीभूत ठरते. बाल गुन्हेगारांची वयोमर्यादा प्रत्येक देशात वेगवेगळी आढळून येते. भारतीय दंडविधान अधिनियमानुसार सन १९८८ पासुन मुलांसाठी १६ वर्ष व मुलींसाठी १८ वर्ष ही वयोमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. परंतु सन २००१ मध्ये या व्याख्येत बदल करून बालगुन्हेगार याचा अर्थ १८ वर्षा खालील मुलगा / मुलगी असा करण्यात आला आहे.

अमेरिकेत ही मर्यादा १६ वर्षे पर्यंतची आहे. जगातील काही देशात ही वयोमर्यादा १८ वर्षाइतकी आहे. थोडक्यात हे प्रत्येक देशातल्या कायद्यावर अवलंबून असते. ज्याला बाल वा मूल समजण्यात येते त्याने विशिष्ट वयोमर्यादा ओलांडण्यापूर्वीच जर काही गुन्हे केले असतील तर ते मूल बालगुन्हेगार या सदरात अंतर्भूत होईल.

बालगुन्हेगारीमध्ये फक्त कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या बालंकानाच नव्हे तर समाजविरोधी वर्तन करणाऱ्या बालकांचाही समावेश दिसून येतो. म्हणूनच बालगुन्हेगारी या समस्येच्या अंतर्गत फक्त कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या बालकांबरोबरच समाजविघातक कृत्ये करणाऱ्या बालकांचाही समावेश होतो.

उदा. – उनाडपणा, कोडगेपणा, विध्वंसक प्रवृत्ती इ.

**भारतातील बालगुन्हेगारीचे स्वरुप :**

इ.स.१९५0 साली भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने (सध्याचे मानव संसाधन मंत्रालय) यासंबंधी जी माहिती गोळा केली त्यावरून त्या काळी फक्त ४ राज्यात बाल न्यायालये कार्यरत होती. ती चार राज्ये म्हणजे मुंबई, मद्रास, बंगाल व दिल्ली (सध्याची नावे महाराष्ट्र, तामीळनाडू, पश्चिम बंगाल व दिल्ली) ही होत. इ.स.१९५0 साली १५१९६ बाल गुन्हेगारीची प्रकरणे (१२९१५ मुले व २२८१ मुली) बाल न्यायालयासमोर आली. त्यापैकी २/३ प्रकरणे एकटया मुंबई प्रांतातुन (महाराष्ट्र) होती. याचे कारण त्यावेळी इतर प्रांताच्या तुलनेने मुंबई प्रांतात अधिक बाल न्यायालये होती हे आहे. या व्यतिरिक्त उत्तर पदेश वगळता अन्य सर्व प्रांतातून बालगुन्हेगारीची ४0११९ प्रकरणे (३७0४0) मुले तर ३0७९ (मुली) उघडकीला आलीत. खालील तक्त्यावरून या बालकांनी केलेल्या अपराधाचे स्वरूप आपल्या लक्षात येईल.

### १.४.१ मुंबई, मद्रास, बंगाल व दिल्ली प्रांतातील बालगुन्हेगारांची संख्या

**(उत्तर पदेश वगळता )**

| अ.क्र. | गुन्ह्याचे स्वरूप | बालगुन्हेगारांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | मालमत्तेविरूध्द | १३५६८ | ३३.८ |
| २ | राज्याविरूध्द | ५८५३ | १४.६ |
| ३ | व्यक्तीविरूध्द | ३०१६ | ७.५ |
| ४ | नैतिकतेविरूध्द | १०९८ | २.७ |
| ५ | भटकेपणा | ४९८७ | १२.५ |
| ६ | अन्य गुन्हे | ११६०० | २८.९ |
| | **एकूण** | ४०११९ | १००.० |

भारतातील एकूण बालगुन्हेगारीच्या स्वरूपाचा विचार करता भारतात इ.सन १९७१ ते १९७५ या कालखंडात विविध प्रकारचे बालगुन्हे निदर्शनास आले. त्यावरून बालगुन्हेगारीचे स्वरूप चिंतानजक आहे असे म्हणावे लागेल. वाढती लोकसंख्या व वाढते नागरीकरण ह्याचा हा परिणाम होय. खालील तक्त्यावरून तुम्हाला बालगुन्हेगारीच्या विस्ताराची कल्पना येईल.

**भारतातील बालगुन्हेगारीचे स्वरूप दर्शविणारा तक्ता**

**वयोगट ७ ते १८**

| अ. | बालगुन्हेगारीचा प्रकार | त्या त्या वर्षी नोंदविलेली बाल गुन्हेगारीची प्रकरणे | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **१९७१** | **१९७२** | **१९७३** | **१९७४** | **१९७५** | |
| १ | खुन | ५२० | ६६१ | ६५१ | ८०४ | ६६३ | ३२९९ |
| २ | अपहरण | २८८ | ३३२ | ३०१ | ४२६ | ३५९ | १७०६ |
| ३ | दरोडे | १२२ | २३६ | ३१७ | २८८ | २९१ | १२५४ |
| ४ | जबरदस्तीची चोरी | ३१२ | ३४३ | ४५५ | ५२१ | ४९९ | २१३० |
| ५ | सांधिक चोऱ्या | ४४७१ | ४९५० | ६२५१ | ७२३८ | ६९४० | २९८५० |
| ६ | चोरी | १०४२२ | १२०८३ | १४६५४ | १६१५३ | १६२९९ | ६९६११ |
| ७ | दंगली घडविणे | १७२९ | २५४१ | ३५४१ | ३७२९ | २२८५ | १३८२५ |
| ८ | विश्वासघात | २१४ | २२६ | २५२ | २७२ | २३६ | १२०० |
| ९ | ठगविणे | २२४ | २७१ | १९० | २५२ | ३०४ | १२४१ |
| १० | अन्य | ८५४४ | ९६३१ | ९८५७ | १०९८३ | ११०१९ | ५००३४ |
| | **एकूण** | **२६७४६** | **३१२७४** | **३६४६९** | **४०६६६** | **३८८९५** | **१७४१५०** |

दिल्लीच्या राष्ट्रीय गुन्हे नोंदणी कार्यालयाने इ.स.१९८७ पर्यंत जी आकडेवारी जमा केली त्या आधारे असे प्रतिपादन केले की दरवर्षी, भारतीय दंड विधान अधीनियमानुसार सुमारे ५० हजार बालगुन्हेगारांनी गुन्हे केल्याची तर स्थानिक व विशेष अधिनियमानुसार सुमारे ८५००० बाल गुन्हेगारांनी गुन्हे केल्याची नोंद करण्यात आली आहे. ऑक्टोबर १९८७ पासुन आमलात आलेल्या (प्रत्यक्ष हा कायदा १९८६ साली मंजूर झाला होता) युवा न्याय कायद्यानुसार बाल गुन्हेगार या संज्ञेत बदल करण्यात येऊन १६ ते २१ वयोगटातील मुले व १८ ते २१ वयोगटातील मुली यांना या कायद्याच्या कार्यकक्षेतून वगळण्यात आले. या कायद्यानुसार केवळ १६ वर्षाखालील मुले व १८ वर्षाखालील मुली यांनी केलेले गुन्हेगारी कृत्य

बालअपराध या संज्ञेला पात्र ठरते. याचा परीणाम असा झाला की इ.स. १९८८ साली बाल गुन्हेगारीचे प्रमाण बदललेले दिसते. इ.स.१९८८ साली भारतीय दंड विधान अधिनियमानुसार २५००० तर स्थानिक व विशेष अधिनियमानुसारही २५००० बाल गुन्ह्यांची (१६ वयापेक्षा कमी वयाच्या मुला – मुलींनी केलेल्या) नोंद झाली.

**माहीतीचे स्त्रोत** ः Crime in India, 1976, pg.76-89

## १.५ भारतातील गेल्या ५० वर्षातील प्रौढगुन्हेगारीची व बालगुन्हेगारीची आकडेवारी

**(सन १९६१ – २०११)**

| सन | एकुण गुन्हेगारी | प्रौढगुन्हेगारांची संख्या | प्रौढगुन्हेगारीची टक्केवारी | बालगुन्हेगारांची संख्या | बालगुन्हेगारीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १९६१ | ९८६७०७४ | ८५०२४४५ | ८६.१६ | १३६४६२९ | १३.८३ |
| १९७१ | १०९५०५६२ | ९२३९९५६ | ८४.३७ | १७१०६०६ | १६.३१ |
| १९८१ | १२१७८८९८ | ९९७८६७४ | ८१.९३ | २२००२२४ | १८.०६ |
| १९९१ | १६१६५२७९ | १३३१५४१३ | ८२.३७ | २८४९८६६ | १७.६२ |
| २००० | १९२१९७४४ | १५८०९९२८ | ८२.२५ | ३४०९८१६ | १७.७४ |
| २०११ | २६००७४३४ | २१७०५९१६ | ८३.४६ | ४३०१५१८ | १६.५३ |

भारतात सन १९६१ पासून सन २०११ पर्यंत एकुण गुन्हेगारीपैकी प्रौढगुन्हेगारीची टक्केवारी ही बालगुन्हेगारीच्या टक्केवारीच्या तुलनेत कमी होत असलेली दिसून येते तर बालगुन्हेगारीची टक्केवारी वाढलेली दिसून येते.

भारतातील ५० वर्षातील एकुण गुन्हेगारी बघितली असता सन १९६१ च्या काळात ती सर्वात कमी आहे. तर सन २०११ च्या काळात ती सर्वात जास्त वाढलेली दिसून येते.सन

१९६१ पासुन सन २०११ पर्यंत बालगुन्हेगारी ही तिपटीपेक्षा जास्त वाढलेली दिसून येते.तर प्रौढगुन्हेगारीही तिपटीपेक्षा कमी झालेली दिसून येते.

**माहीतीचे स्त्रोत** : Crime in India, 1963 , 1991& 2011

## १.६ महाराष्ट्रातील गेल्या ५० वर्षातील प्रौढगुन्हेगारी व बालगुन्हेगारीची आकडेवारी (सन १९६१ – २०११)

| सन | एकुण गुन्हेगारी | प्रौढगुन्हेगारांची संख्या | प्रौढगुन्हेगारीची टक्केवारी | बालगुन्हेगारांची संख्या | बालगुन्हेगारीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १९६१ | ३४७५६४६ | ३२५६७१३ | ९३.७० | २१८९३३ | ६.२९ |
| १९७१ | ३४२६२६४ | ३२४१९५८ | ९४.६२ | १८४३०६ | ५.३७ |
| १९८१ | ३५६६९८८ | ३३०९५१७ | ९२.७८ | २५७४७१ | ७.२१ |
| १९९१ | ३८१९०११ | ३५१३८९५ | ९२.०१ | ३०५११६ | ७.९८ |
| २००० | ४२३९९८७ | ३८९०४४५ | ९१.७५ | ३४९५४२ | ८.२४ |
| २०११ | ४३७०३०९ | ४००१५४३ | ९१.५६ | ३६८७६६ | ८.४३ |

महाराष्ट्रात सन १९६१ पासून सन २०११ पर्यंत एकुण गुन्हेगारीपैकी प्रौढगुन्हेगारीची टक्केवारी ही बालगुन्हेगारीच्या टक्केवारीच्या तुलनेत कमी होत असलेली दिसून येते तर बालगुन्हेगारीची टक्केवारी वाढलेली दिसून येते.

महाराष्ट्रातील ५० वर्षातील एकुण गुन्हेगारी बघितली असता सन १९६१ च्या काळात ती सर्वात कमी आहे. तर सन २०११ च्या काळात ती सर्वात जास्त वाढलेली दिसून येते.

**माहीतीचे स्त्रोत** : Crime in Maharashtra 1970 , 1981 & 2011

## १.६.१ सन २००३ मधील भा.द.वि.गुन्ह्यांचे जिल्हानिहाय प्रमाण (दर १ लाख लोकसंख्येशी)

### (महाराष्ट्र राज्याचे प्रमाण ः १६१.३)

| नं. | शहरी भाग | प्रमाण | नं. | ग्रामीण भाग | प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | अमरावती | ५१६.६ | २२ | परभणी | १५२.९ |
| २ | नागपुर | ३३९.२ | २३ | ठाणे | १५१.० |
| ३ | नवी मुंबई | ३१९.० | २४ | गडचिरोली | १४७.७ |
| ४ | वर्धा | २९८.१ | २५ | जालना | १४५.३ |
| ५ | औरंगाबाद | २३२.६ | २६ | लातुर | १४१.१ |
| ६ | अकोला | २२९.८ | २७ | चंद्रपुर | १४१.१ |
| ७ | नागपुर | २२१.८ | २८ | औरंगाबाद | १२३.८ |
| ८ | पुणे | २१६.१ | २९ | पुणे | ११९.८ |
| ९ | मुंबई | २०७.२ | ३० | सातारा | ११०.० |
| १० | नाशिक | २०३.४ | ३१ | नाशिक | १०७.८ |
| ११ | भंडाारा | १९९.२ | ३२ | सोलापुर | १०४.२ |
| १२ | नांदेड | १९४.२ | ३३ | जळगाव | १०३.५ |
| १३ | वाशिम | १८५.३ | ३४ | सांगली | १०१.६ |
| १४ | सोलापुर | १८०.९ | ३५ | ठाणे | १००.८ |
| १५ | अमरावती | १७६.४ | ३६ | अहमदनगर | ९९.७ |
| १६ | बीड | १७३.५ | ३७ | धुळे | ९९.४ |
| १७ | हिंगोली | १६९.१ | ३८ | रायगड | ९४.८ |
| १८ | बुलढाणा | १६५.६ | ३९ | नंदुरबार | ९३.६ |
| १९ | यवतमाळ | १६५.५ | ४० | सिंधुदुर्ग | ९३.३ |
| २० | उस्मानाबाद | १६५.२ | ४१ | कोल्हापुर | ९२.३ |
| २१ | गोंदीया | १५३.१ | ४२ | रत्नागिरी | ७३.५ |

**माहीतीचे स्त्रोत ः** Crime in maharashtra 2004

## १.६.२ सन २००३ मधील मोठी शहरे व राज्यात दाखल गुन्ह्यांचे (भा.दं.वि)

### तुलनात्मक प्रमाण

| नं. | शहर | प्रत्येक एक लाख लोकसंख्येमागे दाखल होणारे गुन्हे (आय.पी.सी) | |
|---|---|---|---|
| | | शहर | महाराष्ट्र राज्य |
| १ | अमरावती | ५१६.६ | १६१.३ |
| २ | नागपुर | ३३९.२ | |
| ३ | नवी मुंबई | ३१९.० | |
| ४ | औरंगाबाद | २३२.६ | |
| ५ | पुणे | २१६.१ | |
| ६ | मुंबई | २०७.२ | |
| ७ | नाशिक | २०३.४ | |
| ८ | सोलापुर | १८०.९ | |
| ९ | ठाणे | १५१.० | |
| | एकूण नऊ शहरे | २१९.७ | |

वरील तक्त्याप्रमाणे अवलोकन करता सर्वसाधारणतः भारतीय दंड विधान संहीतेखाली राज्यात दाखल होणाऱ्या गुन्ह्यांच्या प्रमाणापेक्षा शहरांत दाखल होणाऱ्या गुन्ह्यांचे प्रमाण जास्त असल्याचे आढळून येईल. अमरावती शहर ५१६.६, नागपुर शहर ३३९.२, नवी मुंबई ३१९.०, औरंगाबाद शहर २३२.६, पुणे शहर २१६.१, मुंबई शहर २०७.२, नाशिक शहर २०३.४, सोलापुर शहर १८०.९ या शहरातील गुन्ह्यांचे प्रमाण राज्याचे गुन्ह्यांच्या प्रमाणापेक्षा १६१.३ जास्त असल्याचे दिसून येते. याला अपवाद फक्त ठाणे शहर असून तेथे दाखल गुन्ह्यांचे प्रमाण १५१.० असे आहे.

**माहीतीचे स्त्रोत** : Crime in Maharashtra , 2004

## १.७ पुणे शहरातील गेल्या ५० वर्षातील प्रौढगुन्हेगारी व बालगुन्हेगारीची आकडेवारी (सन १९६१ – २०११)

| सन | एकुण गुन्हेगारी | प्रौढगुन्हेगारांची संख्या | प्रौढगुन्हेगारीची टक्केवारी | बालगुन्हेगारांची संख्या | बालगुन्हेगारीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १९६१ | ११६६२ | ९४०९ | ८०.६८ | २२५३ | १९.३१ |
| १९७१ | १४९८५ | ११८७९ | ७९.२७ | ३१०६ | २०.७२ |
| १९८१ | १६८३१ | १२९९६ | ७७.२१ | ३८३५ | २२.७८ |
| १९९१ | १९००९ | १४६५४ | ७७.०८ | ४३५५ | २२.९१ |
| २००० | २३७३४ | १८५३१ | ७८.०७ | ५२०३ | २१.९२ |
| २०११ | ३०८६२ | २४०४२ | ७७.९० | ६८२० | २२.०९ |

पुणे शहरातील सन १९६१ पासून सन २०११ पर्यंत एकुण गुन्हेगारीपैकी प्रौढगुन्हेगारीची टक्केवारी ही बालगुन्हेगारीच्या टक्केवारी च्या तुलनेत कमी होत असलेली दिसून येते तर बालगुन्हेगारीची टक्केवारी वाढलेली दिसून येते.

पुणे शहरातील ५० वर्षातील एकुण गुन्हेगारी बघितली असता सन १९६१ च्या काळात ती सर्वात कमी आहे. तर सन २०११ च्या काळात ती वाढलेली दिसून येते. सन १९६१ पासून सन २०११ पर्यंत पुणे शहरातील बालगुन्हेगारी ही तिपटीपेक्षा जास्त वाढलेली दिसून येते. तर प्रौढगुन्हेगारीही फक्त दुपटीपेक्षा जास्त वाढलेली दिसून येते

**माहीतीचे स्त्रोत ः शिवाजीनगर मुलांचे निरिक्षण गृह येथील दरवर्षी प्रकाशित होणारा वार्षिक अहवाल .**

## १.७.१ पुणे शहरातील गेल्या ५० वर्षातील बालगुन्हेगारीचा आढावा

## (सन १९६१ – २०११)

| सन | एकुण बालगुन्हेगारी | मुलांची संख्या | मुलांची टक्केवारी | मुलींची संख्या | मुलींची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १९६१ | २१५३ | १४८१ | ६८.७८ | ६७२ | ३१.२१ |
| १९७१ | ३४८६ | २३०४ | ६६.०९ | ११८२ | ३३.९० |
| १९८१ | ४१३५ | २८६७ | ६९.३३ | १२६८ | ३०.६६ |
| १९९१ | ४७५५ | ३२९६ | ६९.३१ | १४५९ | ३०.६८ |
| २००० | ५८७४ | ४०४७ | ६८.८९ | १८२७ | ३१.१० |
| २०११ | ८८४८ | ६२३२ | ७०.४३ | २६१६ | २९.५६ |

पुणे शहरातील ५० वर्षातील बालगुन्हेगारीत मुलांची टक्केवारी बघितली असता सन १९६१ ते १९७१ च्या काळात ती सर्वात कमी आहे. तर २०११ च्या काळात ही टक्केवारी वाढलेली दिसते.

बालगुन्हेगारीत मुलींची टक्केवारी बघितली असता सन १९७१ च्या काळात ती सर्वात जास्त आहे. तर २०११ च्या काळात ही टक्केवारी कमी झालेली दिसून येते.

पुणे शहरातील ५० वर्षातील बालगुन्हेगारीत मुलामुलींचे एकूण प्रमाण बघितले असता सन १९६१ च्या काळात बालगुन्हेगारीचे प्रमाण सर्वात कमी आहे. तर सन २०११ च्या काळात हे प्रमाण सर्वात वाढलेले दिसते. पुणे शहरातील एकुण बालगुन्हेगारीत मुलींपेक्षा मुलांची संख्या ही दुपटीपेक्षा जास्त आढळून येते. त्यामानाने मुली या बालगुन्हेगारीत कमी दिसून येतात.

**माहीतीचे स्त्रोत ः शिवाजीनगर मुलांचे निरिक्षण गृह येथील नोंदवहीतील नोंदी.**

### १.७.२ पुणे शहरातील गेल्या ६0 वर्षातील गुन्ह्याच्या प्रकारानुसार मुलींचे वर्गीकरण (सन १९५१ – २00१)

| गुन्ह्याचा प्रकार | १९५१-१९६१ | १९६१-१९७१ | १९७१-१९८१ | १९८१-१९९१ | १९९१-२000 | २000-२0११ |
|---|---|---|---|---|---|---|
| साधी चोरी | ११४ | २६0 | २५२ | ३१३ | ३९३ | ४३२ |
| जबरी चोरी | ४४ | १५६ | १४७ | १५८ | २0७ | २८९ |
| आक्रमकता / मारामारी बंडखोरी | ७३ | ७९ | ८७ | ९५ | १२१ | २४५ |
| वेश्याव्यवसाय | ५८ | ६१ | ४५ | ७0 | १४४ | २१५ |
| प्रेमप्रकरण | ३९ | ३२ | ५६ | ५१ | ६८ | १0१ |
| फसवणुक / ठकबाजी | ११५ | २७३ | २९१ | ३0४ | २४६ | ३१९ |
| अपहरण | १६ | २१ | ३0 | २७ | ५९ | ८६ |
| खुन | ३४ | ४0 | ३५ | ४७ | ८८ | १९२ |
| एकापेक्षा अधिक गुन्हे | ८५ | १0४ | १८८ | १९५ | २६६ | ३९८ |
| इतर गुन्हे | ९४ | १५६ | १३६ | १९९ | २३५ | ३३९ |
| एकुण | ६७२ | ११८२ | १२६८ | १४५९ | १८२७ | २६१६ |

पुणे शहरातील ६0 वर्षातील गुन्ह्याच्या प्रकारानुसार मुलींचे वर्गीकरण केले असता असे दिसुन येते की, गुन्ह्याच्या प्रकारामध्ये साधी चोरी करणाऱ्या मुलींची संख्या सर्वात जास्त आहे. त्या खालोखाल फसवणूक व ठकबाजी मध्ये मुलींची संख्या जास्त दिसून येते. त्या खालोखाल अनुक्रमे इतर गुन्हे, मिश्र गुन्हे. आक्रमकता / मारामारी, वेश्याव्यवसाय जबरी चोरी, प्रेम प्रकरण व खून यांचे प्रमाण दिसून येते. गुन्ह्याच्या प्रकारात अपहरणाचे प्रमाण हे इतर गुन्ह्यापेक्षा सर्वात कमी दिसून येते.

सन १९६१ पासून २0११ पर्यत गुन्ह्याच्या प्रकारात साधी चोरी , फसवणूक व ठकवाजी, मिश्र गुन्हे व इतर गुन्हे यांमध्ये वाढ झाल्याचे दिसून येते.

**माहीतीचे स्त्रोत ः शिवाजीनगर मुलांचे निरिक्षण गृह येथील नोंदवहीतील नोंदी.**

### १.७.३ पुणे शहरातील गेल्या ६० वर्षातील गुन्ह्याच्या प्रकारानुसार मुलांचे वर्गीकरण (सन १९५१ – २०११)

| गुन्ह्याचा प्रकार | १९५१-१९६१ | १९६१-१९७१ | १९७१-१९८१ | १९८१-१९ ९१ | १९९१-२००० | २०००-२०११ |
|---|---|---|---|---|---|---|
| साधी चोरी | ३४५ | ५८७ | ७९० | ९८२ | १०७७ | १५४१ |
| जबरी चोरी | २३१ | ४२६ | ५३५ | ५०९ | ६१६ | ९३० |
| आक्रमकता / मारामारी बंडखोरी | १२२ | १५८ | २४९ | ३७२ | ४५१ | ६७५ |
| विनयभंग /छेडछाड | ९८ | १५६ | १४८ | १४५ | ३६९ | ५२१ |
| फसवणुक / ठकबाजी | २६५ | ३१२ | ३७८ | ३९९ | ४८८ | ७९७ |
| अपहरण | ५७ | १०२ | ९५ | ११२ | १७६ | २८५ |
| प्रेमप्रकरण | ३२ | ४४ | ४९ | ४५ | ५० | ९९ |
| बलात्कार | १०२ | १३८ | १६३ | १७७ | १९१ | २३२ |
| खून | ४४ | ४८ | ६२ | ९५ | १२२ | २५७ |
| एकापेक्षा अधिक गुन्हे | ८९ | ११७ | १६८ | २१६ | २०१ | ४६९ |
| इतर गुन्हे | ९६ | १३६ | २३० | २४४ | ३०६ | ४२६ |
| एकुण | १४८१ | २३०४ | २८६७ | ३२९६ | ४०४७ | ६२३२ |

पुणे शहरातील ६० वर्षातील गुन्ह्याच्या प्रकारानुसार मुलांचे वर्गीकरण केले असता असे दिसुन येते की, गुन्ह्याच्या प्रकारामध्ये साधी चोरी करणाऱ्या मुलांची संख्या सर्वात जास्त आहे.त्या खालोखाल जबरी चोरी मध्ये मुलांची संख्या जास्त दिसून येते.त्या खालोखाल अनुक्रमे फसवणुक/ठकबाजी ,आक्रमकता/मारामारी,इतर गुन्हे,विनयभंग/छेडछाड, मिश्रगुन्हे, बलात्कार,अपहरण व खून यांचे प्रमाण दिसुन येते. गुन्ह्याच्या प्रकारात प्रेमप्रकरणाचे प्रमाण हे इतर गुन्ह्यापेक्षा सर्वात कमी दिसुन येते.

सन १९६१ पासून २०११ पर्यंत गुन्ह्याच्या प्रकारात साधी चोरी, जबरी चोरी, आक्रमकता/मारामारी, फसवणूक व ठकबाजी व विनयभंग / छेडछाड यांमध्ये वाढ झाल्याचे दिसून येते.

**माहीतीचे स्त्रोत ः शिवाजीनगर मुलांचे निरिक्षण गृह येथील नोंदवहीतील नोंदी.**

### १.७.४ पुणे शहरातील गेल्या ५0 वर्षातील लोकसंख्या वाढ व बालगुन्हेगारीतील वाढ (सन १९६१ – २0११)

| सन | लोकसंख्या वाढ | बालगुन्हेगारीतील वाढ |
|---|---|---|
| १९५१ | ८३४७२३ | २१५३ |
| १९६१ | ९३९९0६ | ३४८६ |
| १९७१ | १३२९७७४ | ४१३५ |
| १९८१ | १९७१0८२ | ४७५५ |
| १९९१ | २८0७0२९ | ५८७४ |
| २00१ | ४२00८३७ | ८८४८ |

वरील सारणीवरून असे लक्षात येत आहे की; पुणे शहरातील लोकसंख्यावाढी बरोबरच पुणे शहरातील बालगुन्हेगारीची संख्या ही दिवसेंदिवस वाढत आहे.

पुणे शहरातील ५0 वर्षातील लोकसंख्येची वाढ बघता सन १९५१ पासून २00१ पर्यंत लोकसंख्या पाचपट झालेली दिसुन येते. तर बालगुन्हेगारी ही सन १९५१ पासून २00१ पर्यंत चौपटीपेक्षा जास्त झालेली दिसुन येते. १९८८ मध्ये बालगुन्हेगारीच्या वयोमर्यादेत जरी बदल झाला असला तरी १९९१ मध्ये बालगुन्हेगारी वाढल्याचे दिसुन येते.

**माहीतीचे स्त्रोत ः ५0वर्षातील पुणे शहरातील जनगणनेचे अहवाल ,२00१**

## १.७.५ पुणे शहरातील ५० वर्षातील ६ ते १९ वयोगटातील लोकसंख्या वाढ व बालगुन्हेगारीतील वाढ

**(सन १९५१ – २००१)**

| सन | वयोगट ६ ते १९ लोकसंख्या | बालगुन्हेगारीतील वाढ |
|---|---|---|
| १९५१ | ३६६८७ | २१५३ |
| १९६१ | ४७५४१ | ३४८६ |
| १९७१ | ६११६१३ | ४१३५ |
| १९८१ | ६७४६७ | ४७५५ |
| १९९१ | ९९५०२१ | ५८७४ |
| २००१ | १४४६७६ | ८८४८ |

वरील सारणीवरून असे लक्षात येत आहे की; पुणे शहरातील ६ ते १९ वयोगटातील लोकसंख्यावाढी बरोबरच पुणे शहरातील बालगुन्हेगारीचे प्रमाण हे दिवसेंदिवस वाढत आहे.

पुणे शहरातील ५० वर्षातील ५ ते १९ वयोगटातील लोकसंख्येची वाढ बघता सन १९५१ पासून २००१ पर्यंत लोकसंख्या ३.९४ पट झालेली दिसुन येते.तर बालगुन्हेगारी ही सन १९५१ पासून २००१ पर्यंत ४.१२ पट झालेली दिसुन येते.

म्हणूनच पुणे शहरातील वाढते नागरीकरण हे वाढत्या बालगुन्हेगारीला कारणीभुत आहे असे म्हणता येईल.

**माहीतीचे स्त्रोत ः ५०वर्षातील पुणे शहरातील जनगणनेचे अहवाल ,२००१**

## १.८ पुणे शहरातील बाल गुन्हेगारीचे चिंताजनक स्वरूप ः

पूर्वी बालगुन्हेगारीचे स्वरूप तितकेसे गंभीर नव्हते.पुण्यात फार कमी संख्येने बाल गुन्हेगार आढळत होते. परंतु कालांतराने १९६१ नंतर पुणे शहराचा औद्योगिक विकास होवू लागला. महाराष्ट्रातील मुंबई शहराबरोबरच पुणे शहर हे औद्योगिक विकासाचे केंद्र म्हणून ओळखले जावू लागले. त्यामुळे ग्रामीण भागातून, विविध राज्यांतून, देशातून अनेक कुटुंबे पुणे शहरात स्थायिक होवू लागली. कुणी नोकरी, कामधंदयाच्या शोधात, कुणी निवाऱ्याच्या शोधात पुण्यात येत आहे. त्यामुळे पुण्यातील लोकसंख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. आज पुण्यामधे असंख्य कुटुंबे दारीद्ररेषेखाली जीवन जगताना दिसतात. लहान बालकांवर पुण्यासारख्या शहरातील जीवनपध्दतीचा, वातावरणाचा प्रभाव पडत आहे. आपणसुद्धा श्रीमंत वर्गातील मुलांसारखे राहावे, मौजमजा करावी, फॅशन करावी असे त्यांना वाटते. परंतु त्यांच्या घरची आर्थिक परिस्थिती जर बालकांच्या या चैनीच्या गरजांची पूर्तता करण्याइतकी चांगली नसेल तर मग ही मुले वाममार्गाने पैसा मिळविण्याचा प्रयत्न करतात आणि परिणामी बाल गुन्हेगारांचे प्रमाण वाढते. म्हणजेच थोडयाफार प्रमाणात पुणे शहरात झालेले औदयोगिकरण व नागरीकरण पुणे शहरातील वाढणा–या बाल गुन्हेगारीचे कारण होवू शकते.

## १.९ बालगुन्हेगारी संदर्भात प्रचलित असलेली कारणे

गुन्ह्यांच्या कारणांमध्ये विविध कारणांमुळे गुन्हे होताना दिसून येतात. फक्त याच कारणांमुळे गुन्हे घडतात असे म्हणता येणार नाही कारण या कारणांपाठीमागे काही विशिष्ट अशी मूळ पार्श्वभूमी दडलेली आहे त्या पार्श्वभुमीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही

### १.आर्थिक कारण :

गुन्ह्यांच्या कारणांमध्ये अर्थिक परिस्थितीमुळे जास्त गुन्हे होताना दिसतात.सर्व साधारणपणे आर्थिक परिस्थिती गरीब व अति गरीब असणाऱ्या कुटूंबातील बालके बालगुन्हेगार दिसून येतात. परंतु आर्थिक परिस्थिती हालाखीची असणारी कुंटूबे जशी

आधुनिक काळात दिसून येतात तशीच ती पूर्वीही होती. पूर्वीही पुण्यातील बरीचशी लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली जीवन जगत होती परंतू त्याकाळी बालगुन्हेगारांचे प्रमाण बरेच कमी होते.जर पुणे शहरातील ५० वर्षातील बालगुन्हेगारीचे प्रमाण दर्शविणारा तक्ता बघितला असता असे दिसून येते कि, प्रत्येक वर्षी गुन्ह्यांची संख्या वाढत आहे. म्हणून आर्थिक कारणांमागेही काही कारणे दडली आहे .

२० व्या शतकात औद्योगिकिकरण व नागरीकरणाचा बरासचा प्रभाव हा सामान्य लोकांवर पडलेला आहे. बालकांवर याचा मोठया प्रमाणावर परिणाम होत आहे. चांगले आयुष्य जगण्यासाठी, चैनीच्या वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी , झटपट श्रीमंत बनण्याचा हव्यास , औद्योगिकिकरणामूळे प्रगत समाजाशी संपर्क येवून त्यांच्यासारखे जीवनमान जगण्याची सामान्यांची खटपट ,विलासी वृत्ती यांमुळे बालके वा□ मार्गाला जाताना दिसतात. एखाद्या बालकाला श्रीमंत मित्र भेटले तर त्याला सुध्दा आपल्या मित्रासारखे रहावे पैसे, खर्च करावे, मौजमजा करावी असे वाटत असते. अशा वेळी बालकाला घरून पैसे मिळाले नाही तर ही मुले वाममार्गाला जावून प्रयत्न पैसे मिळविण्याचा प्रयत्न करतात. काही वेळा घरची परिस्थिती चांगली असून सुध्दा केवळ मौजमजेसाठी बालक गुन्हे करताना दिसून येतात.

**२. कौटुंबिक कारण :**

काही वेळा मुले कौटुंबिक कारणांमुळे ही गुन्हेगार बनताना दिसतात. भग्न कुटूंब, गुन्हेगारीचा इतिहास असणारे कुटूंब, पालकाकडून होणारी कडक शिक्षा किंवा जास्त सूट, घरातील संस्कार या सर्वांचा परिणाम बालकांवर होत असतो. जर कुटुंबामध्ये सतत भांडणे व तणावपूर्ण वातावरण असेल तर अशा वेळीस त्या परिस्थितीचा बालकांवर खूप वा□ परिणाम होत असतो. कौटुंबिक कारणांमुळे मुले व मुली गुन्हेगार बनत असताना दिसून येते.

### ३ . मानसशास्त्रीय कारण ः

मानसशास्त्रीय कारणांमुळे बालके ही गुन्हेगारी प्रवृत्तीकडे जात असताना दिसतात. नकारात्मक दृष्टिकोन, मनोविकृतता, मानसिक अस्वास्थ्य व ताणतणाव, नैराश्य, भावनिक अस्थिरता, अपघाताने होणारे मेंदूचे विकार, गुणसूत्रातील कमीजास्तपणा, कुटुंबातील वातावरण, लहानपणापासून आक्रमक व बंडखोर वृत्ती, अनुवांशिकता इ. कारणांमुळे ही गुन्हेगार आढळून येतात .

### ४ . वा☐ट संगतः

इतर कारणांबरोबरच वाईट संगतीचा परिणाम होताना दिसतो. मित्रांचे ऐकून, त्यांच्या नादी लागुन अनेक मुले व मुली गुन्हेगारी क्षेत्राकडे वळालेल्या दिसून येतात. लहान वयातच जर बालकांना वा☐ट संगत लाभली तर त्यांना गुन्हेगार बनायला निश्चितच वेळ लागत नाही. समवयस्क मुलांचे अनुकरण करणे, चोरुन मित्रांबरोबर बाहेर जाणे, घरात खोटे बोलणे. इ. कारणांमुळे त्यांच्यात गुन्हेगारी प्रवृत्ती निर्माण होते.

### ५ . व्यसन व नशा करणे :

दिवसेंदिवस लहान वयातच व्यसन करणाऱ्या मुलांचे प्रमाण वाढताना दिसत आहे. दारु, सिगारेट, तंबाखु, गुटखा इ. पदार्थांचे सेवन करुन ही मुले व्यसनाधीन होतात. तसेच पेट्रोल, व्हाईटनर, आयोडेक्स व अन्य मादक घटक याच्या साह्याने लहान मुले नशा करताना दिसून येतात. आपली व्यसनाची गरज भागविण्यासाठी ही मुले चोरी करताना दिसून येतात. व्यसनाधीनतेमध्ये मुलींचे प्रमाण हे दिसून येत नाही. मुलांचीच यात संख्या जास्त आहे. व्यसन केल्याने किंवा इतर मादक पदार्थाने नशा केल्याने ही मुले धुंद होऊन आपण काय करत आहोत याचेही त्यांना भान नसते अशा या व्यसनाधीनतेमुळे अनेक मुले गुन्हेगार होताना दिसून येतात.

### ६. इतर कारणे

वरील कारणांप्रमाणेच इतरही काही कारणांमुळे मुले व मुली गुन्हेगारी मार्गाला लागतात. सध्या चित्रपटांचा बालकांच्या मनावर अतिशय परिणाम होत आहे. चित्रपट, सिरीयल, प्रेमकथा यांमधून जे भीषण नाट्य समाजासमोर येत असते त्यांच्या जास्तीतजास्त प्रभाव हा बालकांवर होत असतो.चित्रपटातील प्रेमकथा, फॅशन, हिरो, हिरो□न सारखे राहणे, त्यांचे अनुकरण करणे, चित्रपटातील अश्लील दृश्ये पाहणे, ब्लु फिल्म सारख्या कॅसेटस् स्वतःजवळ बाळगणे, यांमुळे ही बालके स्वतःचे वय, कुटुंब व समाजाला विसरुन बलात्कार, विनयभंग, छेडछाड , समलिंगी संबंध व प्रेमप्रकरण यांसारखे गंभीर गुन्हे करतात. तसेच चित्रपटातील हिंसक दृश्ये, सूड घेण्याची भावना, मारामारी, खून, इ. मुळे त्यांच्या मनावर परिणाम होतो. आधुनिक पध्दतीने चोरी करण्याची कला, खून करण्याच्या पध्दती इ. ज्ञान मुलांना चित्रपटातून व सिरीयलमधूनच प्राप्त होत असते.

अशा रितीने या कारणांचा परस्परांशी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या संबंध येत असतो. गुन्ह्यांची सर्व कारणे ही एकमेकांत गुंतलेली दिसतात. या सर्व कारणामुळे बालकांच्या हातून विविध गुन्हे घडत असताना दिसून येतात. [१४]

## १.१० बालगुन्हेगारीच्या अभ्यासाची आवश्यकता ः

२० व्या शतकात विविध सामाजिक समस्याचे प्रमाण हे वाढत गेलेले दिसून येते. त्यामध्ये गुन्हेगारी ही समस्या अत्यंत गंभीररीत्या वाढताना दिसते. या गुन्हेगारीच्या क्षेत्रात लहान बालकांचा सहभाग हा प्रकर्षाने जाणवत आहे. विशिष्ट परिस्थितीत मनुष्य असा का वागतो? या प्रश्नाचा निरनिराळया दृष्टिकोनातून विचार करण्यात आला आहे. समाज ज्याला समाजविरोधी वर्तन म्हणतो ते करण्याची बालकांच्या मनाची सहजप्रवृत्ती कधीच नसते किंवा त्यांचा तसा हेतूही नसतो. मग बालकांच्या हातून गुन्हे का घडतात, त्या पाठीमागची कारणे काय याचा शोध घेणे आवश्यक आहे.

एखाद्या वेळेस बालकांनी केलेला गुन्हा आणि प्रत्येक वेळी बालकांनी केलेले गुन्हे यापाठीमागे नेमकी कोणती परिस्थिती गुन्हा करायला भाग पाडते की त्यामागे फक्त बालकांचे अज्ञान कारणीभुत आहे? यावर प्रकाश टाकणे हे अत्यंत आवश्यक आहे. समाजामध्ये निर्माण होत असलेले प्रौढ गुन्हेगार हे बालगुन्हेगारामधूनच तयार होत असतात. लहान वयात केलेले छोटे – मोठे गुन्हे पुढे व्यक्तीला गंभीर गुन्हेगार बनवत असतात. म्हणूनच 'गुन्हेगारी' ही सामाजिक समस्या दूर करण्यासाठी प्रथम बालगुन्हेगारीच्या अभ्यासाकडे लक्ष वेधणे आवश्यक ठरते. त्यामुळे सध्याच्या काळात बालगुन्हेगारी या समस्येच्या अभ्यासाची नितांत गरज जाणवते.

## १.११ समस्या सूत्रण

आपल्याला आपल्या दैनंदिन आयुष्यात ठिकठिकाणी विविध प्रकारच्या घटना बघायला मिळतात किंवा वाचायला मिळतात. वर्तमानपत्रातून रोज समाजात घडणाऱ्या घडामोडी समजत असतात. यामध्ये काही बातम्या आपल्याला रोज दिसून येतात. त्या म्हणजे समाजात घडणारे गुन्हे. रोज एक तरी चोरी, खून, दरोडा, बलात्कार इ.बातमी वाचनात येतच असते.

असेच एकदा वर्तमानपत्रात 'वर्षभरात ७९ बालगुन्हेगार सुधारगृहात" (६ जुलै. २००८ 'सकाळ') ही बातमी वाचनात आली. या बातमीतून असे समजले की प्रौढ गुन्हेगारांबरोबरच लहान अज्ञान बालके ही मोठया प्रमाणावर गुन्हे करत आहेत. या बातमीनुसार २००८ मध्ये चोरी,खून, बलात्कार इ. यासारखे ५४ गुन्हे दाखल असुन ते १२ ते १८ वयोगटातील बालकांकडून झाले आहेत.

त्यावेळेस असा विचार आला की, ही बालके अजून अज्ञान आहेत. त्यांच्यात चांगले किंवा वाईट समजण्याची बुद्धीही तितकीशी विकसित झाली नाही. मग ही बालके गुन्हा का करतात? ते स्वतःच्या मर्जीने गुन्हा करतात की कोणी त्यांच्याकडून करून घेतात? अशी कोणती परिस्थिती व कारणे त्यांना गुन्हा करायला भाग पाडते, याचा शोध घेणे मला आवश्यक वाटले. तसे पाहिले असता कुठलीही बालके खरे तर गुन्हेगार कधीच नसतात. परंतु असा एखादा क्षण त्यांच्या आयुष्यात येतो की, कळत-नकळत त्यांच्या हातून गुन्हा घडतो. आपण काय करतो आहे याचे भानही त्यांना नसते म्हणून ह्या विषयाचे आधुनिक काळात गांभीर्य लक्षात घेता मला हा विषय संशोधनासाठी घ्यावा असे वाटले.

माझा हा शोधप्रबंध 'पुणे शहरातील बालगुन्हेगारी समस्येच्या बदलत्या कारणांचा अभ्यास' यावर आधारीत असून या शोधप्रबंधात नाईलाजास्तव मला बालकांना बालगुन्हेगार म्हणून वेळोवेळी संबोधित करावे लागले आहे, त्याबाबत मी क्षमा मागते.

| | प्रकरण २ – अगोदरच्या स्त्रोतांचा आढावा | पृष्ठ क्र |
|---|---|---|
| २.१ | संदर्भ साहित्याचा आढावा | ३७ |
| २.२ | बालगुन्हेगारीच्या संदर्भातील विविध समाजशास्त्रज्ञांचे सिध्दांत | ७२ |

## २.१ संदर्भ साहित्याचा आढावा

१८ व्या शतकाच्या अखेरीस बालगुन्हेगारीच्या वैज्ञानिक संशोधनाला सुरुवात झाली. ऑगस्त कॉम्त या शास्त्रज्ञाने समाजशास्त्राच्या अध्ययन पध्दतीला नवीन दिशा दिल्याने गुन्हेगारीच्या संर्दभातील जुने पिशाच्चवादी व दैववादी दृष्टीकोन मागे पडू लागला व बालगुन्हेगारीच्या वैज्ञानिक अध्ययनास प्रारंभ झाला. संशोधकांनी गुन्हेगारीच्या संर्दभात दोन घटक मानले आहेत.

१) **जडणघडण (Nature)** :- आनुवांशिक घटक ,शरीरशास्त्रीय घटक व अंर्तस्त्रावी ग्रंथी.

२) **संस्कार (Nurture)** :- कौटुंबिक घटक, आर्थिक घटक, राजकीय घटक, मानसशास्त्रीय घटक, कुटुंबाबाहेरील घटक -शेजार, कुसंगत, चलचित्र, औद्योगिकरण, नागरीकरण इ.व बहूकारक घटक. अनेक अभ्यासकांनी यापैंकी एकेका घटकाच्या आधारे अभ्यास करून मांडलेले निष्कर्ष लक्षात घेतले असता अगोदरच्या काळात बालगुन्हेगारीचा कोणकोणत्या पैलुंनी अभ्यास झाला आहे हे समजते.तसेच वेगवेगळया कालखंडात, वेगवेगळया भौगोलिक प्रदेशात, वेगवेगळया वांशिक समुहामध्ये, वेगवेगळया काळात बालगुन्हेगारीचे स्वरूप कसे होते हे समजु शकते आणि स्थळ काळातील वेगळेपणाच्या आधारावर तुलना केल्याने बालगुन्हेगारीतील बदलत्या प्रवाहांबाबत माहिती प्राप्त होते. त्यादृष्टीने काही महत्वाच्या अभ्यासाचा आढावा यानंतरच्या भागात प्रस्तुत केला आहे.

या दोन घटकानुसार गुन्हेगारीचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण केले आहे.

### अ)आनुवांशिक घटक ः-

१) **एनरीको फैरी इटली** (Enrico Ferri, “Criminal Sociology”, 1856- 1929 pg.138-139) **:-** फैरी हे प्रत्यक्षवादी या विचारसरणीचे पुरस्कर्ते आहेत. यांच्या मते, गुन्हेगारी ही आनुवांशिक कारणांमुळे होत असते. काही विशिष्ट शारीरिक लक्षणांनी युक्त अशी व्यक्ती विशिष्ट प्रकारचे गुन्हे करतात. तसेच त्यांच्यामध्ये असलेली आनुर्वेशिक लक्षणे त्यांना गुन्हे करण्यास भाग पाडत असतात. फैरी या शास्त्रज्ञांने गुन्हेगारांचे चार प्रकारात वर्गी

करण केले आहे. १.विक्षिप्त (ज्यांचे मानसिक  असंतुलन बिघडलेले आहे) २.सवयीत्मक (ज्याला गुन्हे करण्याची सवय झाली आहे). ३.आकस्मिक(जो साधारण अपराध करतो) ४.तीव्र इच्छा किंवा व्यसन (ज्याला गुन्हे करण्याचे एक प्रकारे व्यसन लागले आहे.)

गुन्ह्याच्या कारणासंबंधी तो म्हणतो की, गुन्हा हा मुख्यतः समाजाव्दारा उत्पन्न होत असतो. समाजात आर्थिक, सामाजिक व राजकीय परिवर्तन झाले तर गुन्हेगारी कमी केली जावू शकते.

**उदा.**ः रोजगारांच्या संधी, स्वस्त घरे, निवडणुकात सुधार, विवाह व घटस्फोटातील नियमांत परिवर्तन, करामध्ये परिवर्तन इ.

म्हणजेच, समाजातील परिवर्तन हे जर सुधारीत व व्यक्ती विकासाला अनुकुल स्वरूपाचे असेल तर व्यक्तीच्या गुन्हेगारी प्रवृत्तीला व एकंदरव गुन्हेगारीला आळा बसू शकतो.

**२) कैसर लॉम्ब्रोसा** (Cesure Lombraso“Theory of Evolutionary Atavism”,1876 pg.55)**:-** यांच्या मते,बालगुन्हेगारासाठी सामाजिक परिस्थिती जबाबदार नाही तर बालकांना मिळालेल्या आनुवांशिक वारशाचा तो एक प्रभाव आहे.यात लोम्ब्रोसोने जन्मजात गुन्हेगार ह्या गुन्हेगारीच्या एका प्रकाराचा उल्लेख केला आहे.त्यांच्या मते वंशानुक्रमे बालकाच्या शारीरीक लक्षणांचे निर्धारण होत असते.ही लक्षणे त्या बालकांची विघातक प्रवृत्ती दर्शवितात. लोम्ब्रोसोने शारीरीक लक्षणांच्या ऐवजी वंशानुगत आधारांची चर्चा केली आहे. लोम्ब्रोसो यांच्या मते,

**अ.** गुन्हेगार जन्मजात विशिष्ट प्रकारच्या व्यक्ती असतात.

**ब.** यासारंख्या गुन्हेगारांना विशेष शारीरिक लक्षणे, प्रवृत्ती यासारख्या गोष्टीमुळे ओळखले जाते.उदा. चपटे नाक, लांब हात, कुरळे केस, डोळयातील दोष इ.

**क.** हे दोष गुन्ह्यांचे कारण होत नाही तर गुन्ह्याच्या पूर्ववर्तनाचे व गुन्हेगारीकडे झुकवणारे असतात.

**ड.** जी व्यक्ती जन्मजातच गुन्हेगार असते ती कोणताही गुन्हा करण्यास कधीच मागे

पुढे पाहात नाही, निदान जोपर्यंत तिला योग्य असे अनुकुल वातावरण मिळत नाही.

**इ.** गुन्हेगार हे गुन्हेगारबाह्य व्यक्तीच्या तुलनेत फक्त शारीरीक रचनेतच भिन्न असत नाही तर त्यांचे गुन्ह्यांचे स्वरूपही भिन्न असते.

**३) रॅफेल गॅरोफंलो** (Garofalo, "Criminology", 1914, pg.111-132) **:-** यांनी गुन्हेगारी वर्तनाला जीवोद्‌भावी किंवा अनुंवशिक घटक जबाबदार मानले आहे. त्यांच्या मते, गुन्हेगार व्यक्तीमध्ये काही वैशिष्टयपूर्ण लक्षणे असतात.

**उदा.**ः रानटीपणा जाणवणे, अरूंद कपाळ, फुगीर पसरट नाकपुडया, अप्रमाणबध्द कवटी, अतिशय कमानदार भुवया, दाट केस इ. वैशिष्टये जन्मजात असातात. ही शारीरिक वैशिष्टये असलेली व्यक्ती गुन्हेगार असते. गॅरोंफेलोच्या मते काही गुन्हेगारांच्या संदर्भात शारीरिक दोषांच्या तुलनेत मानसिक दोष जास्त प्रमाणात दिसून येतात. उदा ः हिंसक प्रवृत्ती, कामवासना, मारामारी करणे, विकृतता इ.

**४) चार्लस गोरींग** (Charls Goring, "The English Convict", 1919, Pg. 11) **:-** यांनी इंग्लंडमधील विविध तुरूंगात डॉक्टर म्हणून काम करत असताना १९१३ मध्ये ३**000** कैद्यांच्या ९६ शारीरिक वैशिष्टयांचा अभ्यास साांख्यिकी गणित पध्दतीने केला व १५ हजार निरिक्षणे नोंदविली. बारा वर्षांच्या संशोधनांवर आधारित त्यांचा 'The English Convict' हा ग्रंथ प्रसिध्द झाला. गोरींग यांनी गुन्हेगारी वर्तनाचे अनुवंशिकतेच्या संदर्भात स्पष्टीकरण केले आहे. त्यांच्या मतानुसार व्यक्ती गुन्हेगार होण्यास काही प्रमाणात वंशावळ कशी आहे हे लक्षात घेतले पाहिजे. व्यक्तीच्या कुटुंबात जर आधी कोणी गुन्हेगार असेल किंवा पूर्वजापैकी कोणी गुन्हेगार असेल तर ती लक्षणे पुढच्या पिढीकडे अनुवंशिकतेच्या स्वरूपात आढळून येतात. यांनी मानवी शरीरातील काही ग्रंथीतील त्रुटींचा किंवा स्वभावविकृतीचा संबंध गुन्हेगारी प्रवृत्तीशी लावलेला आहे. काही व्यक्ती इतरांपेक्षा जास्त कामातुर असतात. अशा व्यक्तींकडून लैंगिक गुन्हे घडतात. काही व्यक्तींच्या बाबतीत लैंगिक गरज ही तीव्र असते. ही गरज जर

समाजाच्या मार्गाने पूर्ण होऊ शकली तर ठीक असते परंतु जर ती समाजमान्य मार्गाने पूर्ण होऊ शकली नाही तर असा व्यक्तीकडून लैंगिक गुन्हे घडतात.

५) **जोहान्स लेंज** (Johanes Lange, "Crime as Destiny", 1931,pg.122-25) :- हे गुन्हेगारी वर्तनाच्या विश्लेषणाच्या संदर्भात जुळयांचा अभ्यास करणारे पहिले संशोधक होत. त्यांनी आनुवंशिकता हे गुन्हेगारीचे कारण आहे असे मानले तर जुळी भावंडे गुन्हेगार होतात काय ? असा प्रश्न निर्माण होतो. त्यांनी जर्मनीतील तुरूंगातील जुळया मुलांचा शक्य झाले तेथे तुरूंगात नसणाऱ्या जुळयांशी तुलना करून अभ्यास केला. १५ पैकी १० जुळयांमधे (ही १५ जुळी एकसारखी दिसणारी होती) समान बाबी दिसून आल्या. याउलट एकसारखी न दिसणाऱ्या १७ पैकी १५ जुळयांमधे असमान बाबी आढळल्या. म्हणजेच एकसारख्या दिसणाऱ्या जुळ्यांमध्ये समान कार्य करण्याची वृत्ती जास्त दिसून येते. यातील एक जरी बालक हे वा☐ मार्गाला लागले तर दुसरेही बालक पहिल्या बालकाचे अनुकरण करीत असते.

६) **के.ओ. ख्रिश्चियनसेन** (K.O.Khristiyansen, "The Mentally Abnormal" , 1968, pg.78) **:-** यांनी १८८० ते १८९० या कालावधीत डेन्मार्क येथे जन्मलेल्या जवळपास ६००० जुळया जोडयांचा अभ्यास केला. या अभ्यासात त्यांना असे अढळले की ६६.७ टक्के जणांच्यात आनुवंशिकता हा घटक जुळणारा होता. तर ३०.४ टक्के तो जुळणारा नव्हता. (ही न जुळणारी जुळी होती). तर १५ जुळयांमधे काही असमान बाबी आढळल्या. यांनी केलेले अध्ययन कालांतराने वादग्रस्त ठरले. कारण ज्या जुळ्यांमध्ये साम्य आढळले ते कदाचित एकाच सामाजिक पर्यावरणात राहिल्याचा परिणाम असू शकतात व जरी अनुवांशिकता हे गुन्हेगारी वर्तनाचे कारण मानले तरी या जुळ्यापैकी एक बालक गुन्हेगार होतो व दुसरा होत नाही? हा प्रश्न निर्माण होतो.

७) **क्रान्ज** (Kranz, “Genetic Theory and Abnormal Behaviour”,1970, pg.47) **:-** या शास्त्रज्ञाने १९३६ मध्ये जुळी मुले व गुन्हेगारी यावर केलेल्या अध्यपनामध्ये त्यांना असे आढळून आले की, ६0 टक्के जुळी मुले हे एकाने गैरकृत्य केल्यास दुसराही त्याच्या वर्तनाचे अनुकरण करून गैरकृत्य करतो असे दिसून आले. तर २१ टक्के जुळ्यांपैकी एखादा बालक हा गुन्हेगार असतो तर दुसरा बालक गुन्हेगार नसतो, असे आढळून आले. यातुन असे दिसुन येते की, फक्त १९% जुळ्यांपैकी दोघेही बालक हे गुन्हेगार नसतात तर ते सामान्य बालक असतात.

**ब) शरीरशास्त्रीय घटक ः-**

**१) अर्नेस्ट अलबर्ट हूटन** (Anerst Albert Hutton, “Crime and The Man” ,1939 pg.19):- या अमेरिकेतील मानसाशास्त्रज्ञाने १३ हजार ८७३ पुरूष कैद्यांची ३ हजार २0२ सामान्य पुरूषांशी तुलना करून केलेल्या अभ्यासाच्या आधारे असा निष्कर्ष काढला की गुन्हेगारीचे प्राथमिक कारण हे ‘जीवशास्त्रीय न्यूनता’ (Biological Inferiority) आहे. हूटन यांनी तीन प्रकारची न्यूनता सांगितली आहे.

१. सेंद्रियदृष्टया अनुकूलन साधू न शकणारे २. मानसिक वाढ खुंटलेले आणि ३. समाजशास्त्रीय दृष्टया पूर्वग्रहयुक्त (sociologically wrapped) यांच्या मते असामाजिक व्यवहार व शारीरिक लक्षण यांच्यामध्ये परस्परसबंध आहे. यांनी आपल्या अभ्यासानुसार खालील निष्कर्ष मांडले आहे.

**अ.** निमुळते कपाळ, पातळ ओठ, ताठ केस, अंगावरील केस, छोटे कान, लांबडी अशक्त मान,ओघळणारे खांदे इ.जीवशास्त्रीय न्युनता ह्या गुन्हेगारीस प्रत्यक्षपणे जबाबदार असतात.

**ब.** विशिष्ट प्रकारचे लक्षणांनी युक्त व्यक्ती विशिष्ट प्रकारचे गुन्हे करतात. उदा.उंच आणि सडपातळ व्यक्ती खून, दरोडेखोरीकडे झुकतात, उंच सशक्त व्यक्तीचा कल फसवणुकीकडे तर ठेंगु सशक्त बांधा असणाऱ्यांचा कल चोऱ्या, घरफोडया, लैगिंक

गुन्हे करण्याकडे असतो.

सद्यपरीस्थितीत शारीरिक लक्षण व गुन्हेगारी यांचा तितकसा परस्परसंबध दिसुन येत नाही.कारण विशिष्ट शारीरिक लक्षण नसणाऱ्या व्यक्तींकडूनही विविध प्रकारचे गुन्हे होताना दिसुन येतात.

२) **शैल्डन आणि ग्लुक** (Sheldon & Glueck, “Unravelling Juvenile Delinquency”, 1950, Pg. 281.82) **:-** यांना गुन्हेगारीच्या अभ्यासात दिसून आले की, ९0% बालगुन्हेगार हे आई वडिलांपैकी कोणाच्या तरी एकाच्याच हातून पालन झालेले होते. तर केवळ १0% गुन्हेगार हे आईवडील दोघांच्या हातून पालनपोषण झालेले होते म्हणजेच त्यांच्या मते भग्न कुटुंब हे बालगुन्हेगारीचे एक महत्त्वाचे कारण आहे. शैल्डन या शास्त्रज्ञांनी व्यक्तीच्या शारीरिक रचनेचा आधारावर व्यक्तीचे तीन प्रकारात वर्गीकरण केले आहे.

**१. गोलाकार शारीरिक रचना २. मध्यकायी शारीरिक रचना ३.लंबाकार शारीरिक रचना**

१. गोलाकार शारीरिक रचना असलेले व्यक्ती (छोटी हाडे, छोटे गुडघे व मुलायम मलमली त्वचा) आराम आणि चैनदायी जीवन पसंद करतात.तसेच ते बहिर्मुख असतात.

२. मध्यकायी शारीरिक रचना असलेल्या व्यक्ती (मजबुत मांसपेशी, भारी छाती, मोठी हाडे इ.) सक्रिय, प्रगतशील व समजुतदार असतात पण तितकेच ते आक्रमक असतात.

३. लंबाकार शारीरिक रचना असलेल्या व्यक्ती (पतले – दुबळे शारीरिक छोटी हाडे) अंतर्मुखी असतात. सतत तक्रार करणाऱ्या, गोंगाटाच्या बाबतीत संवेदनशील, सारख्या थकणाऱ्या, गर्दीपासून दूर राहणाऱ्या असतात.

शैल्डन याने शारीरिक आकार मोजण्यासाठी एक मापन विकसित केले ज्यामध्ये व्यक्तींना १ ते ७ अंकापर्यंत भिन्न अवयवांमध्ये मोजले जाते. शैल्डनच्या मते गुन्हेगारी

व्यवहार व शरीररचना यांच्यामध्ये संबंध आहे आणि गुन्हेगार हे बिनगुन्हेगाराच्या तुलनेत शारीरिक रचनेमध्ये मध्यकायी शरीर असलेले अधिक असतात.

**क) कौटुंबिक घटक ः-**

**१) ब्रेकिनरीज आणि ॲबॉट** (Breckinirdge & Abbot,"The Delinqent Child and The Home"1912, pg.91)**:-** यांनी केलेल्या संशोधनात असे आढळून आले की, ३४% मुले भग्न कुटुंबामुळे गुन्हेगारीकडे वळली होती. कुटुंब हा लहान मुलांच्या सर्वात जवळ असणारा घटक असतो. कुटुंबातील भांडणे, मारहाण, हे सतत मुलांच्या दृष्टीस पडत असल्याने त्या सगळयांचा त्यांच्या बालमनावर विपरीत परिणाम घडत असतो. ही मुले एकतर मानसिक विकृत तरी होतात नाहीतर आपले सुख बाहेर शोधण्याचा प्रयत्न करतात व त्यातूनच गुन्हे करायला सुरूवात होते.

२) **The Joint Committee Methods of Preventing Delinquency** (New york ,1925, Pg.253) **:-** यांच्या निरीक्षणानुसार लहान बालकांची लहानपणीच काळजी न घेतल्याने किंवा घरातील शिक्षेचे स्वरूप कठोर असल्यास लहानपणातच मुले ही वाईट मार्गाला लागतात व त्यातुनच बालगुन्हेगारी निर्माण होते. या मुलांना लवकरच दारू पिणे, जुगार खेळणे, मज्जा करणे अशा सवयी लागतात. परिणामी आपल्या सवयी पूर्ण करण्यासाठी ही मुले पुढे वाईट मार्गाला जातात.

**३) डॉ.पीक व ब्लेसमिथ** (Dr.Peek & Blesmith, "Treatment of the Delinquent Adolescent",1957,pg.8-9)**:-** यांच्या मते, अर्भकावस्थेतील प्रेमाची कमतरता, खाण्यापिण्यातील कमतरता, जैविक घटक, वाढीतील फरक यामुळे मुले ही लवकर वाईट मार्गा ला लागतात. त्यांनी केलेल्या निरिक्षणानुसार त्यांना असे आढळून आले की ३ ते ६ वयोगटातील मुलांशी कुटूंबातील आई–वडीलाचे संबंध चांगले नसतील किंवा त्यांना नीट

सांभाळले नाही तर त्यांचा भावनिक विकास खुंटतो तर ६ पेक्षा जास्त वयोगटतील मुलांना एकमेकांशी नीट संपर्क साधता येत नसेल किंवा नीट बोलता येत नसेल तर अशा मुलांना सामाजिक आंतरक्रिया कळू शकत नाही त्यामुळे अशा मुलाला समाजाकडून तिरस्काराने बघतिले जाते अशी मुले ही लवकर बालगुन्हेगार होतात.

४) **जेन्किन्स** (Jenkins, “Parental Rejection”, 1957: Pg. 528-37) :- यांच्या मते, आई वडीलांच्या तिरस्कारामुळे लहान मुलांवर खूप परिणाम घडतो. त्यामुळे त्यांच्या मनात सततची अपमानाची भावना निर्माण होवून अशी मुले जास्त आक्रमक होतात. कुटुंबात एखादे वेळीस पुरेशा वेळेअभावी लहान मुले ही दुर्लक्षित राहतात. तसेच आई – वडील दोघेही दिवसभर कामासाठी बाहेर असतील तर अशा बालकांवर रागावणे, त्याला वाढत्या वयाप्रमाणे न वागवता सतत त्याचा अपमान करणे यांमुळे त्याच्या मनावर परिणाम होऊन तो बंडखोर होतो व ते एकलकोंडे होऊन समाजापासून दूर राहण्याचा प्रयत्न करतात. एकलकोंडेपणा त्यांना स्वतःचे निर्णय स्वतः घेण्यास प्रवृत्त करतो. ते आपल्या मर्जीप्रमाणे जीवन व्यतित करू इच्छितात. परिणाम सततचा एकटेपणा त्यांना गुन्हेगारीकडे घेवून जातो.

यांच्या मते बालगुन्हेगार असणारे मूल हे देखील समाजाचा एक घटक आहे. समाजाने दुर्लक्ष केल्यामुळे ते बालगुन्हेगार झालेले असतात. आजचा गुन्हेगार मुलगा हा कालचा दुर्लक्षित मुलगा असतो. काही वेळा बालकांना कुटुंबातून किंवा समाजातून वाईट वागणूक मिळालेली असते किंवा एखाद्या बालकांचे कुटुंब हे समाजाने वाळीत टाकले असले तर त्याचा परिणाम त्या कुटुंबातील बालकांच्या मनावर देखील पडत असतो. यामुळे अशा बालकांच्या मनात समाजाविषयी तिरस्कार व घृणा निर्माण होते. व कालांतराने ही बालके समाजविरोधी कृत्ये करण्यास प्रवृत्त होतात.

५) **मेकोर्डस आणि जोला** (Mekoedas & Jola, "Origin of Crime", Columbia University, Press Newyork, 1959,pg.67-69)**:-** यांच्या मते, बालगुन्हेगारीत सर्वात

जास्त गुन्हेगार हे भग्न कुटुंबातील आहेत. प्रेममय व शांततापूर्वक कुटुंब कमी गुन्हेगारांना जन्म देते परंतु तणाव व शत्रुतापूर्ण कुटुंब जास्तीतजास्त गुन्हेगारांना जन्म देते. कौटुंबिक ताणतणाव, घटस्फोटीत माता पिता, सावत्रपणा यांमुळे बालकांच्या कोवळ्या मनावर परिणाम होऊन ते आपले सुख शोधण्याच्या निमित्ताने घराबाहेर पडतात व त्यातूनच गुन्हेगार बनतात.

६) **डेव्हिड अब्राहमसेन** (Abrahamsen, "The Psychology of Crime", Columbia press, New York, 1960) **:-** या शास्त्रज्ञांच्या मते, बालगुन्हेगारांना सामान्य बिनगुन्हेगारी बालकांपेक्षा कुटुंबातील प्रेम व आ□वडीलांचे प्रेम खूप कमी मिळते. कौटुंबिक तणाव, घृणा आणि शत्रुत्वाची भावना ही बालगुन्हेगारीची कारणे आहेत.सामान्य बालकांना कुटुंबातील संस्कार व आई वडीलांचे प्रेम हे ठराविक मर्यादेचा चौकटीतच बांधून ठेवत असते. परंतु बालगुन्हेगारांच्या बाबतीत काही बालके ही अशी असतात की त्यांना आई -वडीलांचे प्रेम कमी मिळाले असते किंवा काहींना ते अजिबातच मिळत नाही अशी मुले ही लवकर वाममार्गाला लागण्याची शक्यता असते.

७) **हंसा सेठ** ("Juvenile Delinquency in Indian Setting", 1961, pg.134) **:-** यांच्या मते, जास्तीत जास्त बालगुन्हेगार हे भग्न कुटुंबातून जन्माला येत असतात. त्यांनी मुंबई पुणे व अहमदाबाद येथे केलेल्या अध्ययनावरून एकुण बालगुन्हेगारांपैकी ४८% बालगुन्हेगार भग्न कुटुंबातील होते. कुटुंबातील भग्नता मुलांना गुन्हेगारी क्षेत्राकडे वळवते.तसेच कुटुंबातील भग्नता लहान मुलांच्या मनावर मानसिक आघात पोचवत असते. त्यामुळे ही लहान मुले जास्त आक्रमक किंवा मानसिक दडपणामुळे गुन्हेगारी मार्गाला लागतात.

समाजात बऱ्याच व्यक्ती मानसिक न्यूनतेने पीडित असतात. आपल्यात काहीतरी कमतरता आहे अशी जाणीव त्यांच्या मनात सतत असते. बऱ्याच वेळा ही जाणीव खरी नसते परंतु अशा कुमकुवतपणाच्या जाणीवेमुळे व्यक्ती इतर लोकांची मान्यता प्राप्त करण्यासाठी किंवा लोक मान्यता देत नाहीत म्हणून प्रमाणकबाह्य वर्तन करण्यास उद्युक्त होतात आणि गुन्हे

करतात. कुटुंबातून किंवा समाजातून अशा बालकांना 'तू काही करू शकत नाही', 'तुला काही समजत नाही' असे शब्द सतत कानावर पडत राहिल्याने त्यांच्या मनात आत्मविश्वासाचा अभाव निर्माण होवून तो न्यूनगंडाचा शिकार बनतो. ही न्यूनगंडाचा शिकार झालेली बालके लवकरच निराशेपोटी व सततच्या अपमानामुळे वाममार्गाला जावू शकतात.

८) **इरविंग कॉफमन, सिडनी बर्मन, ऑगस्ट एश्वार्न** (Irving Kaufman, Sydney Burman, August Aichhorn, "Readings in Juvenile Delinquency", 1964) **:-** या मानसशास्त्रज्ञांनी बालगुन्हेगारीची कारणे ही लहानपणीचे अनुभव, भावनात्मक अपमान, संगोपन प्रक्रिया, संस्कार, आणि जीवनशैली ही सांगितली आहेत. त्यांच्या मते, बालकांच्या हातून समाजविरोधी व्यवहार याच कारणांमुळे होतो. बालकांच्या लहानपणी त्यांनी अशा काही घटना किंवा प्रसंग बघितलेले असतात की त्या त्याच्या मनात खोलवर रूजतात. या घटनांचा परिणाम त्याच्या भावी आयुष्यावरही घडत असतो. जर या घटना चांगल्या असतील तर त्याचा त्यांच्या आयुष्यावर सकारात्मक परिणाम घडत असतो परंतु या घटना किंवा प्रसंग वाईट असतील तर त्याचा नकारात्मक परिणाम हा त्याच्या मनावर झालेला असतो. त्यामुळेच त्यांच्या हातून समाजविरोधी व्यवहार घडताना दिसून येतात.

### ड) आर्थिक घटक ः-

१) **कार्ल मार्क्स** (Karl Marx, "The poverty of Philosophy, 1857, P. 140) **:-** यांनी आर्थिक घटकाला महत्व दिले आहे. खाजगी मालमत्ता धारणेमुळे दारिद्रय निर्माण होत असते. त्यांच्या मते समाजात दोन वर्ग असतात.एक 'आहे रे' व दुसरा 'नाही रे' वर्ग .'आहे रे' हा वर्ग सत्ताधारी व आर्थिकदृष्टया प्रबळ असा वर्ग आहे. तर 'नाही रे' हा वर्ग शोषित व आर्थिकदृष्टया मागासलेला आहे. 'आहे रे' वर्गातील घटकांकडून समाजातील दुसऱ्या 'नाही रे' वाल्या घटकांचे शोषण होत असते. स्वतःवर झालेल्या अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी व स्वतःची आर्थिक गरज भागविण्यासाठी असा 'शोषित वर्ग' गुन्हेगारीकडे झुकतो.

२) **विल्यम बोंजर** (William Bonger, "Criminality and Economic Conditions", Boston , 1916,pg.90-96):- यांच्या मते, गुन्हयांचे प्रमाण वाढविण्यासाठी समाजातील भांडवलदारांचा वर्ग जबाबदार आहे. भारतातील गुन्हेगारीचा उगम हा आर्थिक विषमतेतून होत आहे. भारतात दारिद्रयरेषेखाली जीवन जगणाऱ्या लोकांतून गुन्हेगारांचा एक फार मोठा वर्ग आलेला आहे. भांडवलवादी समाजरचनेत सदस्य हे आत्मकेंद्रित असतात. केवळ स्वार्थाचेच ते जतन करत असल्याने आपल्या गरजा भागवून भरघोस नफा मिळविण्यासाठी ते अतिरिक्त उत्पादन करतात. इतर सदस्यांच्या गरजांबाबत ते बेफिकीर असतात. साहजिकच भांडवलवादी समाजरचनेत आत्मकेंद्रितता, परकेपणाची भावना, दुय्यम संबंध, द्वेषमूलकता, बेजाबाबदारपणा इ. वैशिष्ट्ये आढळतात. या सगळ्यांचा परिणाम गुन्हेगारी वर्तनात होतो. उदा.आर्थिक कारणांमुळे योग्य त्या वयात विवाह न होणे, परिणामी बलात्कार, गर्भपात, अर्भकहत्या, इत्यादी गुन्हे होऊ शकतात. भांडवलवादामुळे व्यक्ती आत्मकेंद्रित होऊन गुन्हे करायला प्रवृत्त होते असे बोंजर ठामपणे म्हणत नाही. पण गुन्हेगारी वर्तनाला सुपीक किंवा पोषक पार्श्वभुमी नक्कीच निर्माण होते असे त्यांना वाटते.(The Economic System thus Provides a "Climate of Motivation" for Criminal Behaviour).

३) **ऑगस्ट ब्रोनर** (Augusta Bronner, "Delinquents & Criminals : Their Making and Unmaking", 1926):-यांनी ६७५ बालगुन्हेगारांचे अध्ययन केले. त्यातून त्यांना ५% निराश्रय वर्गाचे, २२% निर्धन वर्ग, ३५% सामान्य वर्ग, ३४% सुखद व सुविधापूर्ण वर्ग व ४0% विलासी वर्गातले आढळून आले. त्यांच्या मते, बालकांना गुन्हेगार बनण्यासाठी दारिद्य' हे कारण फारसे जबाबदार धरता येणार नाही. कारण निम्यापेक्षा जास्त बालगुन्हेगार ही सधन व विलासी कुटुंबातील आढळून आली.

४) **क्लफोर्ड शॉ आणि हेन्री मॅके** (Shaw and Henry Mackey, "Juvenile Delinguency and Urban Areas", 1942,pg.86) :- यांच्या मते, गुन्हा हा वैयक्तिक

किंवा सामुहिक संपर्काव्दारे संप्रेषित होत असतो. 'गुन्हेगारी क्षेत्र' असणारे बालक हे आर्थिक परिस्थितींचे शिकार झालेले असतात. आर्थिक परिस्थितींमुळे झालेल्या गुन्हेगारीच्या परंपरेचा प्रभाव आणि वारसा हा गुन्हेगारी क्षेत्रात महत्वाचा ठरतो. आर्थिक व सामाजिक घटक हे बालगुन्हेगारीला शहरात अधिक पोषक ठरतात तर दूरस्थ विभागात या घटकांचा प्रभाव कमी होतो. यांनी शिकागो शहरातील बालगुन्हेगारीच्या संदर्भात केलेल्या अभ्यासात ७८ टक्के गुन्हे हे मुलांनी एकमेकांच्या संगतीत केलेले आढळून आले.

५) **पीटरसन व हावर्ड बेकर** (Peterson & Howard Becker, "Family interaction and Delinqency", 1965, pg.46) :- यांच्या मते, कुटुंबातील आर्थिक परिस्थिती मुलांवर जास्त प्रभाव पाडत असते. आर्थिक परिस्थिती हालाखीची असलेल्या कुटुंबातील बालकांच्या मागण्या व अपेक्षा पूर्ण होऊ न शकल्याने ही बालके गुन्हेगारीकडे वळतात. यांना आर्थिक परिस्थिती हे गुन्हेगारीचे कारण आहे असे वाटते. ते म्हणतात की, इटलीच्या लोकसंख्येपैकी ६0 टक्के लोकसंख्या गरीब असून ८५ ते ९0 टक्के गुन्हेगार हे त्या साठ टक्यांपैकी आहेत. आर्थिक परिस्थिती हि दारिद्रयरेषेखाली असेल तर जास्तीच्या जीवनावश्यक गरजा भागविणे कठीण होत असते. तसेच श्रीमंत व्यक्तींचे अनुकरण करणे, संपत्तीचे आकर्षण, श्रीमंतांच्या जीवनशैलीचा प्रभाव इ. कारणांमुळे त्या व्यक्ती गुन्हेगारीकडे वळतात.

## इ) कुंटुबाबाहेरील घटक ः-

१) **सिरील बर्ट** (Cyril Burt, "The Young Delinquent", 1925 pg.100) :- यांच्या मते,चित्रपटाच्या प्रभावामुळे बालगुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे. ४८% गुन्हेगार भावनात्मक शून्यता असलेले दिसतात. रागीटपणा, भांडखोरवृत्ती, चंचल स्वभाव यांमुळे त्यांचे मनोनियंत्रण राहत नाही. त्या रागाच्या अवस्थेत त्यांची भांडखोर व हिंसक प्रवृत्ती जागृत होते व अशा व्यक्ती समाजविघातक वर्तन करतात. चित्रपटामध्ये प्रदर्शित करण्यात आलेली हिंसक दृष्ये,

मारामारी, खून इ.मुळे बालकांच्या मनावर त्याचा परिणाम घडून येतो. अशी लहान बालके ही दृष्ये लवकर आत्मसात करतात व परिणामी तसे प्रत्यक्षात वागण्याचा प्रयत्न करतात.

२) **फ्रेड्रिक थ्रॅशर** (Fedrik Tharsher, "The Gang", 1937) **:-** यांच्या मते, उत्स्फूर्तपणे खेळ खेळणाऱ्यांच्या छोट्या समूहातून देखील बालगुन्हेगाराचच्या टोळ्या निर्माण होतात. प्रारंभी खेळगड्यांची चौकडी आणि त्रिकूट असते. त्यांचा संपर्क एखाद्या दुसऱ्या उनाडटप्पू त्रिकुटाशी येतो. दोघांचा मिळून मोठा गट तयार होतो. उनाडटप्पू मुले आपला प्रभाव इतर बालकांवर निर्माण करतात, आज एवढे उनाडटप्पूपणा करणारी मुले ही उद्याचे संभाव्य बालगुन्हेगार असतात.

३) **एल्बर्ट कोहेन** (Albert Cohen, "Delinquent Boys : The Culture of The Gang", 1955 pg.134 )**:-** यांनी शिकागो शहरातील बालगुन्हेगारीचा अभ्यास करुन असा निष्कर्ष काढला आहे की, अतिगर्दीच्या शहरांमध्ये बालगुन्हेगारी अधिक असते. कारण त्या शहरातील गुन्हेगार मुलांवर कुटुंब, शेजार, ओळखीचे लोक इत्यादींचा कोणताच धाक नसतो. झोपडपट्टीतील शिवीगाळ, गलिच्छपणा , मारामारी , मद्यपान, अनैतिक स्वरुपाचे लैगिक व्यवहार इ. गोष्टींचा समावेश असलेल्या वातावरणाला उद्देशून झोपडपट्टीची उपसंस्कृती ही बालगुन्हेगारी प्रवृत्तीचा विकास होण्याचे एक प्रमुख कारण आहे. यांच्या मते, झोपडपट्टीमध्ये अशा काही गुन्ह्यांच्या प्रकारांचे प्रशिक्षण दिले जाते की व्यक्ती ही पुढे जावून गुन्हेगार बनते.

४) **जी.सी.दत्त** (G. C. Dutt, Intelligence Bureau, Government of India Seminar on Social Defence, 1964, P. 30 )**:-** यांच्या मते, बालगुन्हेगारी ही औद्योगिकीकरण व नागरीकरणामुळे निर्माण होते. भारतात बालगुन्हेगारीची समस्या ही तीव्र गतीने समोर आली आहे. कारण वाढते नागरीकरण व औद्योगीकरण यामुळे बालगुन्हेगारीची

समस्या अधिक गंभीर झाली आहे. औद्योगीकरणामुळे व्यवसायाचा अनेक संधी उपलब्ध झाल्यामुळे अनेक मोठया शहरांमध्ये खेडयापाडयातून किंवा बाहेरच्या राज्यातून स्थलांतर होत असते व त्यातूनच झोपडपट्टयांची निर्मिती होते. सुरवातीला हे लोक काम मिळवायच्या उद्देशाने आलेले असतात. परंतु कालांतराने त्यांना काम न मिळाल्यास ते गुन्हेगारीकडे वळतात. तसेच ह्या व्यक्ती कालांतराने स्थानिक नागरिकांनाही त्यात सामील करून घेतात.

५) **सदरलॅन्ड** (Sutherland, “Principles of Criminiology” ,1965, pg.75) **:-** यांच्या मते, खेडयांपेक्षा दाट वस्तीच्या शहरांमध्ये गुन्हेगारीचे प्रमाण जास्त असते. शहरापासुन जितके दूर जावे तितक्या प्रमाणात ते कमी होते म्हणजेच शहरामध्ये गुन्हेगारीचे प्रमाण सर्वात जास्त दिसून येते. शहरामध्ये व्यवसायाच्या सोयी व इतर उपयोगी वस्तूंची चंगळ असल्यामुळे व्यक्ती ह्या शहरामध्ये राहणेच पसंत करतात. शहरातील गजबजलेले वातावरण, आरामदायी जीवन, पूरक वस्तुंची उपलब्धता, मनोरंजनाची साधने इ. गोष्टी त्यांना आकर्षित करीत असतात. त्यामुळे शहरांमध्ये लोकांची दाट गर्दी निर्माण होवून त्यातून पुढे गुन्हेगारीचे प्रमाणही वाढते.

सदरलॅन्डचे हे विचार सद्यपरिस्थितीत लागू होताना दिसून येतात. कारण वाढते औद्योगिकरण व नागरिकरणामुळे खेडी ओस पडून लोकांचा ओघ हा शहराकडे दिसून येतो. साहजिकच शहरातील दाट गर्दी व अपुऱ्या गरजा यांमुळे व्यक्ती आपल्या गरजा पूर्ण करण्याच्या हेतूने वाममार्गाकडे वळते व त्यातूनच गुन्हेगारी जन्म घेत असते.

६) **हर्बट ब्लुमर आणि फिलीप हाऊसर** (Herbert Blumer & Philip Hauser, "F sutherland", 1965, P. 216)**:-** यांना गुन्हेगारांच्या अध्ययनात १०% पुरूष गुन्हेगार व २५% स्त्रिया गुन्हेगार यांच्या गुन्हेगारी जीवनामध्ये सिनेमा, चलचित्र इ. महत्त्वपूर्ण घटक आढळले. चलचित्रांमुळे गुन्हेगारी वर्तनाचे प्रकार व युक्त्या समजल्या जातात. यामधील श्रीमंती आणि विलासी वृत्ती ही व्यक्तींना जागृत करत असते. यामुळे व्यक्ती गुन्हेगारीकडे

वळते. यांच्या मते, अनेक मुले ही सिनेमा, दुरदर्शन, टिव्ही यांचा प्रभाव यांमुळे बालगुन्हेगार होताना दिसतात. चित्रपटातील अश्लील दृश्ये व हिंसात्मक दृश्ये मुलांना लवकर प्रभावित करून टाकतात. त्यामुळे लहान वयातच या गोष्टी टिव्हीवर सारख्या पाहत राहील्याने त्यांच्या हातून आयुष्यात एकदा तरी वाईट वर्तन हे निश्चित घडते. सततची अश्लील दृष्ये पाहुन मुलांची कामवासनेची भावना लहान वयातच जागृत होते व त्यामुळे विनयभंग, बलात्कार, अनैतिक संबंध यासारखे गुन्हे त्यांच्या हातून घडतात.

७)**एल्मर** (Elmer,“Correction and Society”,1978,pg.140):-यांच्या मते, बालगुन्हेगारीला दाट लोकसंख्या जबाबदार नसुन त्यापेक्षा अधिक जबाबदार झोपडपट्ट्याच आहेत. त्यांच्यामध्येच या गुन्हेगारी प्रवृत्तीला पोषक असे वातावरण तयार होते. सर्वसाधारणतः जास्तीत जास्त बालगुन्हेगार हे झोपडपट्टीतून निर्माण होत असतात. झोपड्यांमधुन राहणाऱ्या लोकांची आर्थिक स्थितीही फारशी प्रबळ नसते. त्यामुळे ही मुले सुरवातीला साधी चोरी करायला शिकतात व कालांतराने चोरी करण्यात तरबेज होऊन दरोडे, घरफोडी, लुटमार अशा मोठया स्वरूपाच्या चोऱ्या करायला सुरूवात करतात.

८) **चार्लस कुले** (Charls Cooley): यांच्या मते, कुटुंब आणि शेजार या दोन्ही प्राथमिक समुहांना सामाजिक प्रकियेतील आद्य आणि आवश्यक घटक मानले पाहिजे. मुलांचा संबंध कुटुंबानंतर शेजारी या प्राथमिक समुहाशी येतो. शेजार समूहाचा मुलांच्या वर्तनावर प्रभाव पडत असतो. जर बाजूचा शेजार चांगल्या प्रवृत्तीचा नसेल तर त्याचा विपरीत परिणाम बालकांच्या मनावर होतो, म्हणुन ती बालगुन्हेगार बनतात. ग्रामीण समाजापेक्षा नागरी समाजात शेजार सानिध्याचा मुलांच्या वर्तनावर प्रभाव पडत असतो. सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेत शेजार या प्राथमिक समुहाची महत्त्वपूर्ण भूमिका असते.

९) **पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभाग** (19 Jan. 2002, Sakal) :- या शाखेच्या प्रमुखांनी गुप्तरोग्यांच्या संदर्भात केलेल्या पाहणीमध्ये त्यांना किशोरवयीन मुलांचा अधिक भरणा आढळला. या मुलांमध्ये कुसंगत हा घटक आढळून आला. या मुलांनी कुसंगतीमुळे वेश्यागमन केले होते म्हणूनच त्यांना गुप्तरोगासारखे आजार झाल्याचे दिसुन आले.

**ई) मानसशास्त्रीय घटक ः-**

१) **हेन्री गोडार्ड** (Henry Godard, "Human Efficiency and Levels of Intelligency" , 1920, pg.73) **:-** या शास्त्रज्ञाने गुन्हा घडण्यास कमकुवत मनोवृत्ती हे गुन्हेगारीचे प्रभावी कारण असेल असे सांगितले आहे. त्याने बालगुन्हेगारांचा अभ्यास करुन जवळजवळ ५०% बालगुन्हेगार हे मनोवृत्तीने कमकुवत असतात असे सिध्द केले आहे. हेन्री गोडार्ड यांनी 'मनोदुर्बलता' हे गुन्हेगारी आणि बालगुन्हेगारी चे सर्वात महत्वाचे एकमेव कारण प्रतिपादन केले आहे.ज्या व्यक्तीचा बुद्धयांक कमी असतो त्यांना गोदार्द मनोदुर्बल मानतात. १९१९ साली त्यांनी बुध्दिमत्ता चाचणीच्या अहवालाच्या आधारे सिध्दांत मांडला. त्यांच्या मते, मनोदुर्बलता हे आनुवंशिक असून इतर बाह्य घटनांचा त्यांच्यावर प्रभाव पडत असतो. म्हणूनच गुन्हेगार हे जन्मजात गुन्हेगार नसतात तर ते परिस्थितीने गुन्हेगार बनतात असे त्यांचे म्हणणे आहे. याचाच अर्थ मनोदुर्बल व्यक्ती ही मुळतः गुन्हेगारी वृत्तीची नसते. याच कारणामुळे प्रत्येक मनोदुर्बल व्यक्ती ही गुन्हेगार बनतेच असे नाही.

२) **पॉल शिल्डर** (Pal Schilder, "Journal of Criminal Psycho-Pathology", oct-1940, pg.152) **:-** यांनी न्यूयॉर्कमध्येच केलेल्या संशोधनात ८३.८ टक्के गुन्हेगार हे 'सामान्य' असल्याचे आढळले.तर १७ टक्के गुन्हेगार त्यांना स्कीझोफ्रेनियामुळे गुन्हेगार झाल्याचे आढळले. त्यात १.५ टक्के मनोविकृत, ६.९ टक्के मनोरोगी, ६.९ टक्के वेडेपणा, व २.४ टक्के मंदबुध्दी होते. म्हणजेच व्यक्तीला गुन्हेगार बनण्यास काही अंशी मानसिक कारणेही जबाबदार असल्याचे दिसून येते. यांनी इलियॉनिस येथील सुधारशाळेतील

व्यक्तींचा १९१९ – १९२९ या काळात अभ्यास केला. त्यामधे ९९.५ टक्के व्यक्ती 'मनोविकृतीशास्त्रीय अपसामान्य' (Psychiatrically abnormal) होत्या आणि त्यातही बहुसंख्य 'मनोविकृतीग्रस्त' (Psychopathic) व्यक्तिमत्त्व असलेले आढळले. न्युयॉर्क मधील महाभयंकर अपराध केलेल्या दहा हजार गुन्हेगारांच्या अभ्यासात १.५ टक्के मनोविक्षिप्त (Psychotic), ६.९ टक्के मानसनसविकृत (Psycho-neurotic), ६.९ टक्के मनोविकृतीमय (Psycho-pathic), २.४ टक्के मनोदौर्बल्ययुक्त (Feebleminded) आढळले होते व केवळ ८.३ टक्के गुन्हेगार सामान्य असल्याचे आढळले.

## क) बहुकारकवादी घटक ः-

**१) कैसर बेकारीया 'अभिजातवादी सिध्दांत'** (Kesar Beccaria, "Essay on Crime and Punishment" , 1764, pg.155) **:-** यांच्या मते, गुन्हेगारांचे हक्क, स्वातंत्र्य आणि हितसंबंधाची जपणूक करणारी कायदा व्यवस्था एक असली पाहिजे. मानवी स्वभाव हा वैचारीक नि मुक्त असून स्व–हितसंबंधाने त्याचे नियमन होत असते. सामाजिक करार आणि मतैक्यावर समाज स्वास्थ किंवा सुव्यवस्था अवलंबून असते. सामाजिक नीती संहितेचे नव्हे तर कायदेशीर नियमांचे उल्लंघन केल्यास गुन्हा होतो.

बेकारीया यांनी गुन्हेगारी वर्तनासंबंधी काही गृहीते १७६४ साली मांडली आहेत ती खालीलप्रमाणे ः

**अ.** मानवप्राण्याचे वर्तन सहेतुक आणि विचारपूर्वक असून ते भोगवादावर किंवा चंगळवादावर आधारलेले असते. याचा अर्थ मानव प्राण्याला ऊब हवी असते पण धग नको असते. सुखदायीचा स्वीकार व दुःखदायीचा नकार हे त्याच्या वर्तनाच्या मुळाशी असते.

**ब.** गुन्हेगारी वर्तन केल्याबद्दल ज्याला अत्यानंद मिळतो त्यावर मात करण्यासाठी प्रत्येक गुन्ह्याला शिक्षा मिळाली पाहिजे.

**क.** शिक्षा ही तीव्र आणि दहशदवादी नसावी तर गुन्ह्याच्या प्रमाणात असावी.

**ड.** सर्व नागरीकांना समान कायदा लावावा त्यात पक्षपातीपणा नसावा.

**इ.** कायदे करणाऱ्यांनी स्पष्ट कायदे करावे याचा अर्थ त्या कायद्यात स्पष्टता असावी. संदिग्धता नसावी. न्यायाधिशांनी फक्त न्यायनिवाडा करावा. कायद्यांचे विश्लेषण करू नये.

**२) विल्यम हिले** (William Healy,"The Individual Delinquent" ,1915,pg.37) **:-** यांनी गुन्ह्याची कारणे शोधताना व्यष्टि अध्ययन पद्धत वापरली. ८२७ बालगुन्हेगारांच्या केसेस त्यांनी तपासल्या व त्यावरुन गुन्ह्याची कारणे शोधण्याचा प्रयत्न केला. त्यातील १५७ केसेस (१९%) मुलांच्या बाबतील मादक पेयांचे सेवन, अनैतिकता ही गुन्हेगारी प्रवृत्ती असलेल्या कुटुंबामध्ये आढळली. तर ६३ केसेस (१३%) मध्ये बालगुन्हेगारीचे कारण दारिद्रय हे होते. हिले यांना आपल्या अभ्यासात ३४ टक्के बालगुन्हेगारांच्या बाबतीत कुसंगत हे कारण आढळले. विल्यम हिले यांच्या निरीक्षणानुसार ८ वर्षापर्यंत बालगुन्हेगारीच्या २४ टक्के केसेस त्यांना आढळल्या तर १२ वर्षापर्यंतच्या २२ टक्के केसेस त्यांना आढळल्या. त्यांच्या मते, काही मुले ही १ वर्ष किंवा वर्षापेक्षा जास्त काळ गुन्हा करीत होती परंतु तरीही त्यांना पकडण्यात आले नव्हते मात्र ही मुले १ वर्षानंतर पकडण्यात आली होती त्याचे प्रमाण जवळजवळ ८७ टक्के झाले होते. म्हणजेच या मुलांना लवकर पकडण्यात न आल्याने सुध्दा त्यांच्यामधील बालगुन्हेगारी वाढत गेल्याचे दिसून येते.

**३) गुन्हेगार आयोग न्युयार्क** (The Crime Commission of New York, "A Study of 250 Adolescents" ,1928,pg. 139) **:-** यांनी केलेला निरिक्षणावरून अनेक मुलांना उनाडपणा, उचलगिरीच्या सवयी, चोरी करणे, गुन्हे करण्याची आवड इ. असल्याचे दिसून आले. तसेच त्यांच्या मते बालगुन्हेगारीच्या कारणामध्ये वाईट संगत, समूह, शाळेतील विचलित वर्तन ही कारणे असल्याचे दिसून येते. मुलांना शाळेतच काही वेळेला वस्तु उचलणे, छोट्या स्वरूपाच्या चोऱ्या करणे याची सवय लागते. जर शाळेतील एखादा बालक असे वर्तन

करत असेल तर त्यात तो इतर बालकांनाही सामिल करून घेतो व यातूनच बालकेही गुन्हेगार बनतात.

४) **अलैक्झांडर व स्टाब 'अभिजातवादी सिध्दांत'** (Alexander and Staub, "The Criminal The Judge and The Public",1931,pg.145-152 ) :- यांनी गुन्हेगारांचे आकस्मिक व दीर्घकालीन अशा दोन वर्गात विभाजन केले आहे. आकस्मिक गुन्हेगार हे असाधारण व अयोग्य परिस्थितीमुळे एखादा गुन्हा करतात. तर दीर्घकालीन गुन्हेगार हे इतर गुन्हेगारांच्या संपर्कात आल्यामुळे वारंवार गुन्हा करतात. नाही तर स्वतःच्या चिंता, गुन्ह्याची भावना, व्यक्तिमत्व संघर्ष यामुळे गुन्हा करतात किंवा शारीरिक विकृती मुळे गुन्हा करतात. आकस्मिक गुन्हेगारांना विशिष्ट परिस्थिती गुन्हा करण्यास भाग पाडत असते तर दीर्घकालीन गुन्हेगारांना कोणतीही परिस्थिती भाग पाडत नसुन ती स्वत:हुन गुन्हेगारीकडे वळत असतात.

५) **हिर्श** (Hirsh, Nathanieal, "Dynamic Causes of Juvenile Crime", 1937, pg.78) : या शास्त्रज्ञानी गुन्ह्यांचे सहा प्रकारात वर्गीकरण केले आहे.

**अ**. सुधारण्यापलीकडील किंवा कोडगेरात्री - अपरात्री भटकणारी, वडिलांचे न ऐकणारी इ.

**ब**. पळून जाणारे (Truancy)- उदा. घरून किंवा शाळेतून पळून जाणे.

**क**. विध्वंसक वृत्तीचे किंवा हिंसाचारी - खाजगी व सार्वजनिक मालमत्तेचा विध्वंस करणारे, समुदायावर सशस्त्र हल्ला करणारे.

**ड**. चोरी - भुरट्या चोऱ्यांपासून सशस्त्र दरोड्यापर्यंत चोऱ्या करणारे

**इ**. संपत्तीचे आकर्षण

**ई**. लैंगिक गुन्हे - समलैंगिक संबंधापासून बलात्कारापर्यंत

**६) थोर्स्टन सेलिन** (Thorsten Sellin, "Culture, Conflict and Crime", 1938, pg.496-98) **:-** यांच्या मते , गुन्हा व्यवहारातील नियमांच्या बाबत असणाऱ्या संघर्षामुळे

निर्माण होतो. तसेच व्यक्तीची एखादी इच्छा समाजाच्या नियमांचे पालन करून होत नसेल तर अशा वेळी व्यक्ती समाजविरोधी मार्ग स्विकारतो व स्वतःची इच्छा पुर्ण करण्यासाठी गुन्हेगारीकडे वळते.

७) **लिन्डस्मिथ आणि डन्हाम** (Lindesmith & Dunham, "Some Principles of Criminal Typology Social Forces" , 1941, pg. 307-314) **:-** यांनी गुन्हेगारांचे दोन प्रकार सांगितले आहेत.

**१.सामाजिक अपराधी –** जे गुन्हेगार समाजात प्रतिष्ठा व स्वतःचे स्थान मिळवण्यासाठी, समाजात स्वतःची ओळख निर्माण करण्यासाठी काही वाईट मार्गांचा अवलंब करतात. तसेच काही गुन्हेगार हे समाजात एकत्र राहत असुन त्यांचे विविध समूह असतात. हे समूह प्रथानुगत गुन्हे करतात. सराईत व पेशेवर गुन्हेगार हे याचे सर्वात उत्तम उदाहरण सांगता येईल.

**२.व्यक्तिगत अपराधी –** जे गुन्हेगार स्वतःच्या व्यक्तिगत फायद्यासाठी तसेच आर्थिक फायद्यासाठी वाईट संगतीमुळे गुन्हे करतात. अशा गुन्ह्यांमध्ये व्यक्तिगत हित महत्त्वाचे मानले जाते.

८) **हाल जेरोम** (Hall Gerome, "Genearl Principles of Criminal Low" ,1947, pg.8-18) **:-** यांच्या मते पुढील प्रकारची कृत्ये गुन्ह्याची लक्षणे मानली आहेत.

**अ.** असे कार्य जे समाजाच्या हिताआड येणार असेल व समाजाला हानी पोचविणारे असेल. तसेच हानी पोचविण्याचा हेतु असेल तर हा गुन्हा ठरू शकत नाही जोपर्यंत तो वास्तवात येत नाही.

**ब.** पोचवलेली हानी कायद्याचे उल्लंघन असली पाहिजे.

**क.** हानी पोचविलेले कृत्य हे हेतुपूर्वक असले पाहिजे.

**ड.** हानी पोचविणारे कृत्य हे जाणुनबुजुन केले गेले पाहिजे. परंतु वेडया व्यक्तीने पोचविलेली हानी गुन्हा होत नाही कारण त्यामागे कोणताही हेतु नसतो.

**इ.** कृत्य हे गुन्ह्याची इच्छा व व्यवहार यांचे मिश्रण असले पाहिजे.

उदा.एक मोलकरीण नियमितपणे घरातील काम सांभाळत आली आहे. जरी तीने त्या घरात चोरी केली तर तिच्यावर फक्त चोरीचा आरोप ठेवला जातो.अनाधिकार प्रवेशासाठी तिच्यावर आरोप ठेवू शकत नाही.

**ई.** कृत्य हे कायद्यानुसार हानी पोचविणाऱ्या कारणाशी संबंधित असले पाहिजे.

उदा. एका शिक्षकाने बालकाला चापट मारली आणि त्या बालकाच्या कानाची नस फाटून त्याचा अचानक मृत्यू झाला. तर अशा वेळी व्यवहार व हानी यांच्यामधील संबंध स्पष्ट होत नाही.

**फ.** हानिकारक व्यवहारासाठी शिक्षेचे स्वरूप हे कायद्यानुसार असले पाहिजे.

९) **रुथ कैवन** (Ruth Cavan, "Criminology", 1948, pg. 30-32) **:-** यांनी गुन्हेगारांची सहा श्रेणीत विभागणी केली आहे.

१. जे गुन्हेगार गैर-गुन्हेगारी जगात राहतात. त्यातील **१.आकस्मिक गुन्हेगार –** जे आपल्या सोयीसाठी नियमांचे उल्लंघन करतात. **२.प्रासंगिक गुन्हेगार –** जे कधी-कधी छोटे-मोठे गुन्हेगार **३.घटनात्मक गुन्हेगार –** जे एखादी विशिष्ट व गंभीर घटनात्मक तणावामुळे गुन्हे करतात. **४.श्वेतवसन गुन्हेगार –**जे ठराविक आर्थिक उददेशासाठी व्यवसायसंबंधी गुन्हे करतात.

२. **सराईत गुन्हेगार –** जे आपल्या उपजिविकेसाठी व आर्थिक उद्देशासाठी गुन्हेगार बनतात व हे गुन्हेगार गुन्हे करण्यात तरबेज असतात.

३. **संघटित अपराधी –** जे आपल्या गुन्ह्यासंबंधी कृत्यांना व्यवस्थित लपवून ठेवून किंवा पडद्यामागून गुन्हे करताना दिसतात.

४. **सवयग्रस्त अपराधी –** जे आपल्या गुन्ह्याला पुनःपुनः विकसित करतात व सारखे गुन्हे करतात.

**५.मानसिक असंतुलन असलेले गुन्हेगार** – जे मानसिक दृष्टया अविकसित किंवा विकृत असतात.

**६.व्देषरहित गुन्हेगार** – जे आपल्या समाजातील कायद्यांना मानतात परंतु काही वेळा कोणत्यातरी व्देषभावनेने कायद्याचे उल्लंघन करतात.

**१०) एम.एस.श्रीवास्तव** (M.S.Shrivastav, “Juvenile Vagrancy” , 1950) **:-** यांनी लखनऊ येथील ७ ते १४ वयोगटातील ५0 निरक्षर मुलांचे अध्ययन केले असता त्यांना असे दिसून आले कि त्यातील ३६ मुले ही जुगारी होती तर १0 जणांना जुगाराची तीव्र सवय होती तर ४ जण जुगारी नव्हते. पुढे त्यांना असे दिसून आले की यातील २0 जण हे जुगारासाठी कधी – कधी भीक मागत होते तर १२ जण हे नेहमीच भीक मागून जुगार खेळत होते. परंतु ४ जण हे इतर गुन्हे करीत होते. उदा. फिरणे, मारामारी, गुंडागर्दी, इ.काही वर्षांनी त्यांना असे दिसून आले की, यातील बऱ्याच मुलांना जुगाराबरोबरच अनेक वाईट सवयी जडल्या होत्या. उदा. चोरी करणे, व्यसन, विचित्र वागणे इ.या गुन्ह्यांमध्ये १३ व १४ वयोगटातील १९ मुले ही बालगुन्हेगार दिसून आली.यांच्या मते, सुशिक्षित बालंकापेक्षा निरक्षर बालके गुन्हेगारीत जास्त दिसुन येतात.कारण शाळा हा घटकाकडून बालकाला चांगल्या मुल्यशिक्षणाचे धडे देणे व आदर्श नागरिक बनवण्याचे कार्य पार पाडले जात असते.

**११) श्री. राजनाथ खन्ना** (Shri. Rajnath Khanna, “Juvenile Truancy and School” ,1951 pg.133) **:-** यांनी लखनऊ येथील ११ ते १५ वयोगटातील माध्यमिक शाळांतील मुलांची जी पाहणी केली, तिच्यामध्ये असे आढळून आले की, शालेय शिक्षणातील पध्दतशीर नसलेला शिक्षणक्रम, घरातील अयोग्य वातावरण, मित्रमंडळीचा प्रभाव व प्रामुख्याने जेष्ठ मित्रांचा सहभाग, बालवय इ.अनेक कारणांमुळे मुले शाळेत असल्यापासुनच जुगार व भटकेगिरीच्या मार्गाला लागतात व ती प्रवृत्ती त्यांना गुन्हेगार मार्गाकडे नेते. श्री.राजनाथ

खन्ना यांनी लखनऊ येथील ५४ केसेसचा विस्तारपूर्वक अभ्यास केला. आणि खालीलप्रमाणे निष्कर्ष काढले.

१. अयोग्य शालेय शिक्षणपध्दत

२. कुटुंबातील अयोग्य वातावरण

३. उनाडपणा व आळस

४. खेळण्याची वृत्ती

५. शाळेतील शिक्षणापासून दूर पळणे

६. १४ व १५ वयोगटामध्ये जास्त उनाडपणा

या ५४ मुलांचा अभ्यास करून त्यांनी त्यांच्या सवयीचा अभ्यास केला तर त्यांना असे दिसून आले की त्यातील बऱ्याच मुलांना दारू पिणे, जुगार खेळणे, हिंडणे अशा सवयी होत्या. त्यावरून त्यांना ही मुले बालगुन्हेगार असल्याचे निर्देशनास आले.

**१२) यु.एन.ओ. इंटरनॅशनल रिपोर्ट ऑफ क्रिमिनल पॉलिसी** (1954, pg.23) **:-** यांच्या निरीक्षणावरून असे दिसून आले की काही सामाजिक विघातक प्रवृत्तीमुळे बालगन्हेगारीचे प्रमाण वाढते तसेच काही सामाजिक, मानसशास्त्रीय व जैविक घटकांमुळेसुध्दा मुले ही असामान्य वर्तन करीत असल्याचे दिसून येते. परंतु व्यक्ती बालगुन्हेगार होण्यामागे समाजातल्या वाईट प्रवृत्ती दिसून येतात.

**१३) लेमर्ट ः-** (Lemart “Social Promblem” , 1958, pg.141) **:-** यांनी गुन्हेगाराचे दोन प्रकारात वर्गीकरण केले आहे.

१. परिस्थितीजन्य गुन्हेगार २. सुव्यवस्थित परिस्थितीजन्य गुन्हेगार

परिस्थितीजन्य गुन्हेगार म्हणजे ज्यांचा हातून गुन्हे हे कोणत्यातरी परिस्थितीच्या दबावात केले जातात किंवा दडपणात केले जातात. तर सुव्यवस्थित गुन्हेगार जे जाणीवपूर्वक व हेतुपुर्वक

गुन्हे करत असतात. त्यांना गुन्हे करायला भाग पाडणारी कोणतीही अशी परिस्थिती जबाबदार ठरत नाही.

१४) **थॉमस** (Thamus, “Juvenile Delinquency in Indian setting” ,1961,pg.200-201) :- यांच्या मते, व्यक्ती स्वतःच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी रीतसर मार्गाचा वापर करतात. परंतु या इच्छा रीतसर मार्गांनी पूर्ण होण्यात अडथळा निर्माण झाला तर व्यक्ती या गुन्हेगारीकडे वळतात. व्यक्ती आपली कोणतीही इच्छा पूर्ण करण्याबाबतीत गंभीर असतात. अशा वेळी सुरवातीला ते आपली इच्छा समाजमान्य मार्गानी पूर्ण करण्याचा प्रयत्न करताात. परंतु जर ती समाजमान्य मार्गाने पूर्ण झाली नाही तर अशा वेळी ती अयोग्य मार्गाने पूर्ण केली जाते. मग जरी त्यात समाजाचे नुकसान झाले तरी त्याकडे दुर्लक्ष केले जाते.

उदा. एखाद्या व्यक्तीची श्रीमंत बनण्याची इच्छा असेल तर सुरवातीला ती श्रीमंत बनण्यासाठी रीतसर मार्गाचा अवलंब करून आपली श्रीमंत बनण्याची इच्छा पूर्ण करतात.

१५) **रॉबर्ट ट्रोजानोविज** (Robert Trojanowicz, “Juvenile Deliquency : Concepts & Control”, 1973, Pg. 59) :- यांनी बालगुन्हेगारांचे पाच प्रकारांमध्ये वर्गी करण केले आहे.

१) आकस्मिक गुन्हेगार २) असमंजस गुन्हेगार ३) प्रासंगिक गुन्हेगार ४) पेशेवर गुन्हेगार ५) टोळीतील गुन्हेगार. आकस्मिक गुन्हेगार जे अचानक व अयोग्य परिस्थितीने गुन्हेगार झालेले असतात. असमंजस गुन्हेगारांना आपण काय करतो आहोत याची पुरेशी समज आलेली नसते व त्यातूनच त्यांच्या हातून गुन्हा घडतो. प्रासंगिक गुन्हेगार त्यांच्या आयुष्यात आलेला विशिष्ट प्रसंगामुळे किंवा घटनेमुळे गुन्हा घडलेला असतो. पेशेवर गुन्हेगार गुन्हा करणे हा पेशा असतो असा गुन्हेगाराच्या कुटुंबातही गुन्हेगारी पार्श्वभुमी असते. टोळीतील गुन्हेगार जे टोळी किंवा समुहात राहुन सामुहिक गुन्हे करीत असतात.

**१. एमिल डरखिमचा प्रमाणकशून्यतेचा सिध्दांत ः** (Theory of Anomie, 1858-1917 ,PG.11)

एमिल डरखिम या समाजशास्त्रज्ञाने मांडलेली 'ॲनामि' ची संकल्पना गुन्हेगारीच्या संदर्भात समजावून घेणार आहोत. 'Anomie' या ग्रीक शब्दाचा अर्थ 'lawlessness' असा आहे. १८९३ साली डरखिम यांचा **'Division of labour in society'** हा ग्रंथ प्रसिध्द झाला. त्यात डरखिम यांनी 'ॲनामि' हा शब्द योजला.

'ॲनामि' याचा अर्थ 'प्रमाणकशून्यता' होय. प्रमाणकशून्यता म्हणजे एखाद्या समाजात प्रमाणकेच नसणे असा नाही. खऱ्या अर्थाने कोणताही समाज किंवा व्यक्ती पूर्णपणे नियमनरहित असू शकत नाही. समाजामध्ये नियमने किंवा मुल्ये असतातच. पण त्यातील कोणती नियमने व्यक्तिवर्तनावर कोणत्या विशिष्ट परिस्थितीमध्ये बंधनकारक आहेत याबाबत स्पष्टता नसल्याने जी गोंधळाची परिस्थिती निर्माण होते तिला उद्देशून डरखिम यांना 'Anomie' ही संकल्पना योजली आहे.

डरखिम यांनी असे प्रतिपादन केले आहे की समाजात असणारा सामाजिक ऐक्यभाव हे अति महत्वाचे मूलतत्व असून ते सामुहिक सद्सद्विवेक बुध्दीचे प्रतिनिधीत्व करत असते. डरखिम यांनी १.यांत्रिक ऐक्यभाव आणि २. सेंद्रिय ऐक्यभाव असे दोन प्रकारचे ऐक्यभाव सांगितले आहेत. आदिवासी समाजात यांत्रिक ऐक्यभाव असतो. तेथे सगळेच समान असतात. त्यांची जीवनपध्दती समान असते. या साधर्म्यातून यांत्रिक ऐक्यभाव निर्माण होतो. कारण प्रत्येक व्यक्तीच दुसऱ्या व्यक्तीसारखी असते त्यामुळे त्यांच्यात भेदभावाचा प्रश्न उपस्थित होत नाही. साहजिकच सामुहिक सद्सद्विवेक बुध्दीने यांत्रिक प्रकारचा ऐक्यभाव प्रभावित झालेला असतो. अशा समाजात कायदा हा दमनात्मक किंवा प्रायश्चित्त प्रकारचा असतो. तेथे व्यक्तीला शिक्षा होते ती कुणा व्यक्तीच्या विरोधात कृत्य केले म्हणून नाही तर त्याने संपूर्ण जमातीच्या सद्सद्विवेक बुध्दीस धक्का पोहचविला असतो त्याची भरपाई करून घेणे असा त्या कायद्याचा हेतू असतो.

याउलट समाज जसजसा अधिक संकीर्ण व गुंतागुंतीचा होत जातो तसतसे समाजातील श्रमविभाजन विकसित व जटील स्वरूपाचे होते. अशा समाजात सामाजिक विविधता असते.

या सामाजिक वैधर्म्यातून 'जैविक ऐक्यभाव' निर्माण होतो. हा ऐक्यभाव व्यक्तीव्यक्तीमधील भेदावर आधारित आहे. या समाजात शमनात्मक कायदा असतो. अपराध्याला शिक्षा करण्यापेक्षा संबधितांना नुकसान भरपाई देणे हा या कायद्याचा हेतू असतो.

आधुनिक औद्योगिक समाजामध्ये भौतिक समृध्दीच्या हव्यासामुळे घरदार पैसा, संपत्तीसाठी मोठया प्रमाणावर स्पर्धा चालू आहे. आपणास हवी ती उद्दिष्टे समाजमान्य पध्दतींनी प्राप्त करणे सर्वच सदस्यांना शक्य होत नाही. औद्योगिक क्रांतीमुळे गृहोद्योग बंद पडले. नवीन व्यावसायिक मुल्ये स्वीकारता आली नाहीत. नवीन समाजाशी समायोजन साधता आले नाही. यांत्रिकीकरण आणि बेकारीही वाढली. अशाही परिस्थितीत व्यक्ती आपली उदिष्टे गाठण्याच्या प्रयत्न करते. योग्य गुणवत्ता असूनही योग्य पदावर निवड होत नाही. उलट अपात्र व्यक्तींची वशिलेबाजीने वर्णी लागते. अशा परिस्थितीत समाज सदस्यांचा प्रमाणके व नियमनांवरचा, मुल्यांवरचा, सदाचार, विश्वास, श्रध्दा इ.वरचा विश्वास उडतो. योग्य–अयोग्य, उचित–अनुचित, पाप–पुण्य यातील भेद पुसट होतो, त्यांच्या मनात संघर्ष किंवा द्वंद्व निर्माण होते. या प्रकारची समाजामध्ये जी अवस्था किंवा परिस्थिती निर्माण होते त्याला नियमनरहितता किंवा प्रमाणकशून्यता म्हणतात. या अवस्थेत गुन्हेगारी वर्तनाला चालना मिळते. थोडक्यात अप्रगत आदीवासींसारख्या समाजात गुन्हेगारी वर्तन अभावात्मक आढळते. याउलट मोठया प्रगत समाजात गुन्हेगारीवर्तन जास्त आढळते.

**२. रॉबर्ट मर्टन यांचा नियमनरहितता सिध्दांत** ः (Merton's Theory of Anomie,1968,P. 192.93):- मर्टनच्या मते, काही समाज उदिष्टांवर भर देतात तर काही समाज उदिष्ट प्राप्तीच्या साधनांवर भर देतात. जोपर्यंत समाजातील सदस्य समाजातील उदिष्टांची प्राप्ती समाजमान्य मार्गाने करतात तो पर्यंत समाजात अनुचलन होत असते याचा अर्थ समाजात सामाजिक नियमनांना अनुसरून वर्तन होत असते पण जेव्हा याउलट वर्तन होते म्हणजे समाजमान्य पध्दती झिडकारल्या जातात. तेव्हा सामाजिक विचलन घडते. यातूनच प्रस्थापित सामाजिक नियमनांशी विसंगत वर्तन होवून गुन्हेगारी वर्तन घडते.

मर्टन यांच्या मते, समाजमान्य उदिष्टे आणि ती प्राप्त करण्याचे समाजमान्य मार्ग किंवा पध्दतीना समाज सदस्यांकडून पुढील पाच प्रकारे प्रतिक्रिया होवू शकते.

**१) अनुचलन (Conformity)** ः

व्यक्ती समाजमान्य उदिष्ट आणि ते प्राप्त करण्याचे समाजमान्य मार्ग या दोन्ही स्वीकार करून सांस्कृतिक उदिष्टे व संस्थात्मक नियमने यांचा मेळ घालते.

**उदा.** लैंगिक समाधान हे समाजमान्य उदिष्ट आहे आणि ते भागविण्याची समाजमान्य पध्दत म्हणजे विवाह होय. म्हणून लैंगिक समाधान मिळविण्यासाठी व्यक्ती विवाह करते तेव्हा ते अनुचलनशील वर्तन होते.

**२) आविष्कृतीजन्य किंवा नवक्लृप्ती (Innovation)**ः

यामध्ये समाजसदस्य समाजमान्य किंवा संस्कृतीमान्य उद्दिष्टांची आकांक्षा धरतात. पण त्यासाठी आवश्यक ती समाजमान्य पध्दती किंवा साधने नाकारतात. उदा. परीक्षा उत्तम गुणांनी उतीर्ण होणे हे उद्दिष्ट विद्यार्थी स्वीकारतात पण त्यासाठी समाजसंमत, कायदेशीर मार्गांचा अवलंब न करता ते गैरमार्गांचा अवलंब करतात. त्यातून परीक्षेत कॉपी करणे, एकाच्या ऐवजी दुसरा परीक्षेला बसविणे यासारखे गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन घडते. या संदर्भात मर्टन म्हणतात की, दारिद्र्यामुळे गुन्हेगारी वर्तन होत नाही पण पैसा हेच सर्वोच्च उद्दिष्ट आहे असे सांस्कृतिक मूल्य ठसविले जाऊन त्याचा दारिद्र्याशी संबंध जोडला जातो तेव्हा स्वाभाविकच त्याची परिणती गुन्हेगारी वर्तनात होते.

**३) उपचार उरकणे (Ritualism)** ः यामध्ये समाजमान्य उदिष्टे नाकारली जातात पण ती मिळविण्याची साधने किंवा समाजमान्य पध्दतीचा स्वीकार केला जातो. उदा.एखादा विद्यार्थी कॉलेजात जातो पण तासांना न बसता अन्यत्र वेळ घालवतो.

**४) प्रतिगमन (Retreatism)** ः यालाच पलायनवाद असेही म्हणता येईल. यामध्ये व्यक्ती समाजमान्य उद्दिष्ट आणि ते प्राप्त करण्याची समाजमान्य पध्दत किंवा साधने ही दोन्हीही नाकारते. उदा. समाजमान्य पध्दतीने परीक्षा पास होण्याचे उद्दिष्ट जेव्हा गाठता येत नाही तेव्हा अशी व्यक्ती शिक्षणालाच रामराम ठोकते. जेव्हा कायदेशीर मार्गाने आपले उद्दिष्ट

गाठता येत नाही आणि पूर्वसंस्कारामुळे बेकायदेशीर मर्गाचा अवलंबही करता येत नाही अशा वेळी व्यक्ती ते उद्दिष्ट आणि ते गाठण्याचे मार्ग या दोन्हीपासून आपली मुक्तता करून घेऊन दारूडे / मद्यपी, जुगारी बनतात.

**५) बंडखोर (Rebellion)**ः समाजातील उद्दिष्टे आणि ती प्राप्त करण्याची साधने दोन्हीही केवळ नाकारली जातात असे नाही तर या दोहोंना आव्हान देऊन स्वतःच्या विचारसरणीप्रमाणे नवीन व्यवस्था निर्माण करणे हे त्यांचे ध्येय असते. अशा व्यक्तींना प्रस्थापित समाजरचनेत, मूल्यव्यवस्थेत बदल घडवून आणायचे असतात. त्यासाठी ते प्रस्थापित नियमने, नीतिमूल्ये न मानता स्वेच्छावर्तन करतात उदा. मुंबईच्या गुन्हेगारी जगतातील एका 'भाई' ने कारागृहातून मुक्तता झाल्यावर प्रचंड मोठा मोर्चा मंत्रालयावर काढला होता. गावोगावी आपल्या सेनेच्या शाखाही काढल्या होत्या.

**३. रिचर्ड क्लोवर्ड आणि लॉईड ऑलीन यांचा विभेदित संधी सिध्दांत** ः (Cloward and Ohlin's Theory of Differential Opportunity, 1960)

रिचर्ड क्लोवर्ड आणि लॉईड ऑलीन यांनी डरखिम आणि रॉबर्ट मर्टनच्या प्रमाणकशून्यतेचा सिध्दांत आणि सदरलँड यांच्या विभेदित साहचर्य सिध्दांताने प्रभावित होऊन १९६0 साली आपला विभेदित संधी सिध्दांत मांडला. मर्टन आनि सदरलँड या दोघांच्या सिध्दांताचे एकत्रीकरण म्हणजे हा सिध्दांत होय.

समाजमान्य उद्दिष्टे आणि त्यांची समाजमान्य पध्दतींनी प्राप्ती करणे वा न करण्याचा संबंध सामाजिक विचलनाशी कसा आहे हे मर्टनने आपल्या प्रमाणकशून्यतेच्या सिध्दांतात स्पष्ट केले. एखाद्या समाजसंरचनेमध्ये आपली उद्दिष्टे प्राप्त करण्याची कायदेशीर संधी एखाद्या व्यक्तीला किती प्रमाणात उपलब्ध आहे याचा विचार या सिध्दांतात आहे. या सिध्दांतांची मूलभूत महत्त्वपूर्ण तत्वे अशी ः- (१) प्रत्येक व्यक्ती कायदेशीर व बेकायदेशीर संधी संरचनेत सहभागी असते. (२) बेकायदेशीर संधींची सापेक्ष उपलब्धता व्यक्तीच्या समायोजनाच्या समस्येवर परिणाम करते. (३) उद्दिष्टांची प्राप्ती करण्यासाठी उपलब्ध असणाऱ्या कायदेशीर

संधी मर्यादित असतात. अधोगामी आकांक्षा स्वीकारणे पटत नाही. परिणामी व्यक्तीला तीव्र नैराश्य येऊन त्याची परिणती पर्यायी व समाजविरोधी कृत्ये करण्यात होते.

क्लॅरेन्स श्राग यांनी क्लोवर्ड आणि ऑलीनच्या सिध्दांताची पध्दतशीर मांडणी करून त्यातील पुढील चार गृहीते दिली आहेत.

१. आर्थिक उद्दिष्टे ही समाजव्यापी आहेत. त्यांनाच मध्यमवर्गीय उदिष्टे असेही म्हणतात.

२. या उद्दिष्टांच्या प्राप्तीसाठी प्रत्येक संघटित समाज काही कायदेशीर संधीची योजना करत असतो.

३. कायदेशीर साधनांनी संधी वर्गसापेक्ष असते.

४. एखाद्या समुदायात बेकायदेशीर संधी उपलब्ध असू शकतात किंवा नसू शकतात.

ज्या विभेदित संधीबाबत क्कोवर्ड आणि ऑलिन बोलतात त्यात किती तथ्य आहे हे जाणून घेण्याचा प्रयत्न शॉर्ट, टेनिसन, रिव्हर्स तसेच वाल्टर रेकलेस या अभ्यासकांनी केला. शिक्षण आणि व्यवसायाबाबत मिळणाऱ्या कायदेशीर आणि बेकायदेशीर संधीबाबतचे ज्ञान किती आहे हे जाणून घेण्यासाठी शॉर्ट, टेनिसन इत्यादींनी एकाच विभागातल्या ५०० निग्रो तसेच पांढरपेशीय कनिष्ठ वर्गातील टोळीतील मुलांचा आणि मध्यमवर्गीय बिगर-टोळीतील मुलांचा अभ्यास केला. या अभ्यासाच्या आधारे त्यांनी काढलेले निष्कर्ष हे क्लोवर्ड आणि ऑलीनच्या सिध्दांताला पुष्टीच देतात.

**४. मुल्यभिमुखता किंवा उन्मार्गी उपसंस्कृती सिध्दांत :** (Cohen's Theory of Value orientation or Deliquent Sub-Culture)

गुन्हेगारी वर्तनाचे स्पष्टीकरण समाजशास्त्रज्ञांनी संस्कृती आणि उपसंस्कृतीच्या संदर्भात केले आहे. या अभ्यासकांमध्ये प्रामुख्याने क्लिफोर्ड शॉ आणि हेन्री मॅकी, फ्रेड्रिक ग्रॅशर, हर्मन मॅन्हिम, विल्यम फूट व्हाईट, अल्बर्ट कोहेन यांचा उल्लेख केला पाहिजे.

क्लिफोर्ड शॉ आणि हेन्री मॅकी यांना असे आढळून आले की शिकागो शहराच्या एका विशिष्ट भागातच दीर्घकाळापर्यंत मोठया प्रमाणावर गुन्हे घडत होते. विशेष म्हणजे त्या

विशिष्ट भागातील स्थानिक समूहांनी स्थलांतर केले तरी तेथील गुन्ह्यांच्या संख्येत घट झाली नाही. याचा शोध घेतला असता त्यांना असे आढळले की त्या विभागात नव्याने राहायला येणाऱ्या मुलांना तेथील स्थानिक उन्मार्गी मुले गुन्हेगारी कृत्ये शिकवत होती आणि नवीन मुले ते गुन्हेगारी वर्तन शिकत होती. केवळ उन्मार्गी मुलांच्या संगतीमुळे आपली मुले गुन्हेगारी वर्तन करतात हे समजल्यावर त्या कुटुंबियांनी त्या भागातून स्थलांतर केले. परिणामी त्या मुलांचे गुन्हेगारी वर्तन कमी झाले. याचा अर्थ गुन्हेगारांची एक संस्कृती असते तसेच एक उपसंस्कृतीही असते. या संस्कृतीचे एका समुहाकडून दुसऱ्या समुहाकडे विविध माध्यमांकडून – कारकांकडून संक्रमण होते. यालाच सांस्कृतिक – संक्रमण असे म्हणतात.

एमिल डरखिम आणि रॉबर्ट मर्टन यांनी मांडलेल्या नियमनरहिततेच्या सिध्दांताने सांस्कृतिक सिध्दांतांना अनुकूल अशी चौकट प्रस्थापित केली. या सिध्दांतांना हर्मन मॅन्हिम यांनी वर्गाभिमुख सिध्दांत असे संबोधले आहे. उच्च किंवा मध्यम वर्गाच्या तुलनेत कनिष्ठ वर्गात गुन्हेगारीचे प्रमाण उच्च असते असा अर्थ मॅन्हिम यांना अभिप्रेत नाही. समाजमान्य उद्दिष्टे व ती प्राप्त करण्याच्या समाजमान्य पध्दतींना होणाऱ्या प्रतिक्रिया या सामाजिक वर्गाशी निगडीत असतात असे त्यांना सुचवायचे आहे. या वर्गाची एक उपसंस्कृती असते. त्या उपसंस्कृतीचा गुन्हेगारी वर्तनाच्या संबंधात आता आपल्याला विचार करायचा आहे.

फ्रेड्रिक थ्रॅशर यांनी शिकागो शहरातील १३१३ टोळयांचा अभ्यास केला. संक्रमण विभागातील सामाजिक विघटनामुळे विशेषतः झोपडपट्टयांतील विघटनामुळे तेथे बालगुन्हेगारांच्या टोळ्या निर्माण होत असल्याचे त्यांना आढळून आले. स्वतः थ्रॅशर यांनी 'उपसंस्कृती' बद्दल विशेषत्वाने काही म्हटले नसले तरी त्यामुळे 'उपसंस्कृती सिध्दांताला' मार्ग दर्शक अशी पार्श्वभूमी निर्माण झाली. याच संदर्भात आपणास कोहेन यांचा सिध्दांत अभ्यासायचा आहे. अल्बर्ट कोहेन यांचा Delinquent Boys : The Culture of the Gang हे संशोधन १९५५ साली प्रसिध्द झाले आणि तेव्हापासून गुन्हेगारी / उन्मार्गी वर्तनाकडे पाहण्याचा एक नवा दृष्टिकोण विकसित होऊ लागला. त्यामुळे गुन्हेगारी वर्तनाच्या स्पष्टीकरणाबाबतच्या उप–सांस्कृतिक सिध्दांताचा विकास होऊ लागला. 'मध्यमवर्गीय

मोजपट्टी' चे कोहेन यांनी केलेले विश्लेषण पाहिले की कोहेनवर डरखिम आणि मर्टन यांचा प्रभाव पडलेला जाणवतो.

कोहेन यांचा सिध्दांत हा मुख्यतः कनिष्ठ वर्गातील मुलांच्या दर्जा समायोजनाशी संबंधित आहे. आपले मुल्यमापन इतर जण कसे करतात यावरच मुलांच्या स्वतःबद्दलच्या भावना अवलंबून असतात. हे मुल्यमापन बहुधा शाळा, निवासस्थान किंवा क्रीडांगणे इत्यादी संदर्भात केले जाते. या सर्वच ठिकाणी मध्यमवर्गीय मूल्यांचा आणि मानदंडांचा प्रभाव पडलेला असतो. दुसऱ्या शब्दात या शाळा म्हणजे प्रभावी मूल्यव्यवस्थाच असतात आणि त्या आपल्या विद्यार्थ्यांकडून तशाच मूल्यांची किंवा मानदंडांनी युक्त वर्तनाची अपेक्षा करतात.

**उदा.** १८ व्या शतकात आपल्याकडे बहुतेक शाळा उच्चवर्णीयांनी विशेषतः ब्राह्मणांनी काढल्या. ब्राह्मणेतरांनी काढलेल्या शाळांमध्येही बहुधा मध्यमवर्गीय (ब्राह्मण) शिक्षकांचा भरणा अधिक असे. या मध्यमवर्गाची नीटनेटकेपणा, टापटीप, स्वच्छता, संकेत, शिष्टाचार, वाणी आणि उच्चारशुध्दता, उच्चाकांक्षा, उच्चशैक्षणिक गुणवत्ता, ध्येयासक्ती, इत्यादी मूल्ये आहेत. शिक्षक जरी मध्यमवर्गीय असले किंवा शाळेत जरी मध्यमवर्गीय मूल्यव्यवस्थेचा प्रभाव असला तरी शाळेत येणारी मुले मात्र भिन्न सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक पार्श्वभूमी असलेली असतात. त्यात कनिष्ठवर्गीय मुलांचाही भरणा असतो. या मुलांची मूल्ये वेगळी असतात. स्वच्छता, टापटीप, नीटनेटकेपणा, शुध्द उच्चार, संकेत, शिष्टाचार, इ.बाबतीत ही मुले कनिष्ठ असतात. तथापि, त्यांच्या वर्तनाचे मूल्यमापन शाळेकडून किंवा इतरेजनांकडून मात्र मध्यमवर्गीय मूल्यांचे निकष किंवा मोजपट्टी लावून केले जाते. परिणामी त्या विद्यार्थ्यांना मध्यमवर्गीय मूल्यव्यवस्थेशी स्पर्धा करीत आपले समाजातील स्थान किंवा दर्जा प्राप्त करण्यासाठी झगडावे लागते. अर्थातच त्यासाठी आवश्यक असणाऱ्या सोयी, सुविधा किंवा संधी त्यांना उपलब्ध असत नाहीत. याची परिणती कनिष्ठ वर्गीय मुलांच्या मानहानीत आणि अपयशात होते. अशी मुलं मध्यमवर्गीय मूल्ये अंगिकारण्याचा प्रयत्न करून सामाजिक श्रेणीरचनेत आपला दर्जा त्यांच्या समकक्ष उंचावण्याचा प्रयत्न करतात. पण ते न जमल्यास त्यांना समायोजनाच्या समस्येला तोंड द्यावे लागते. याचा परिणाम म्हणजे, त्या समस्येवर तोडगा

काढण्याच्या प्रयत्नात अशा मुलांची एक उप-संस्कृती विकसित होते. असा कोहेन यांचा हा सिध्दांत आहे.

अशी मुले प्रस्थापित प्रभावी मूल्यव्यवस्था झिडकारून आपली स्वतःची नवीन मूल्ये निर्माण करतात. ती खालील प्रमाणे ः

१. **निरूपयुक्ततावाद मूल्य** ः ही मुले केवळ काही तरी करायचे म्हणून काही कृत्ये करतात. ते कृत्य करण्यापासून त्यांना कुठला आर्थिक लाभ मिळवायचा हेतू नसतो तर फक्त ते केल्याचे समाधान मिळवायचे असते. उदा.दुसऱ्याचे पेन-पेन्सिल चोरतील आणि तिसऱ्याला देतील किंवा टाकून देतील. दुसऱ्याच्या झाडाच्या कैऱ्यांचा सडा पाडतील पण एकही खाणार नाहीत ! याचा अर्थ एवढाच की त्यांच्या अशा कृत्यांमागे उपयुक्ततावादाचे किंवा वैचारिक अधिष्ठान नसते.

२. **द्वेषमूलकता** ः अशा उन्मार्गी मुलांच्यात दुसरा एक वर्तन प्रकार आढळतो तो म्हणजे द्वेषमूलकता. ती मुले केवळ दुष्ट हेतूने इतरांचा द्वेष करतात. द्वेष करण्यातून, पिडा देण्यात त्यांना एक प्रकारचा आनंद मिळवायचा असतो. वर्तन-निर्बंध किंवा निषिध्द वस्तूंविरोधी वर्तन करण्यात ती मुले आनंद मानू लागतात.

३. **नकारात्मकवादी** ः उन्मार्गी किंवा गुन्हेगारी स्वरूपाची कृत्ये करणाऱ्या मुलांच्या उपसंस्कृतीतील मूल्ये ही समाजातील प्रौढ सदस्यांच्या मूल्यांच्या बऱ्याच अंशी विरूध्द असतात. प्रौढ त्या मुलांकडून ज्या वर्तनप्रकारांची अपेक्षा करतात. त्याला त्या मुलांच्या प्रतिक्रिया नकारात्मक होतात. उदा.शाळेत जा,अभ्यास कर म्हटले तर त्याला नकारात्मक वर्तनातून प्रतिसाद मिळतो.अर्थात त्या व्यक्तींकडून होणारे वर्तन मर्यादितच असते.

निर्ढावलेल्या धंदेवाईक गुन्हेगारांसारखे त्यांचे वर्तन होत नसते हे ध्यानात घेतले पाहिजे. अशा प्रकारच्या आपल्या उपसंस्कृतीची मूल्ये निर्माण करून ती प्रस्थापित मध्यमवर्गीय प्रभावी मूल्यव्यवस्थेला पर्याय निर्माण करून आपला सामाजिक दर्जा प्रस्थापित करून त्याला समाजमान्यता मिळविण्याचा प्रयत्न करतात.

गुन्हेगारी टोळ्यांच्या उपसंस्कृतीची कोहेन यांनी दोन ठळक वैशिष्टये सांगितली आहेत. पहिले म्हणजे अल्पजीवी सुखवाद यालाच तात्कालिक सुखवाद असेही म्हणता येईल. या व्यक्ती भावी काळातील आर्थिक किंवा समयबध्द योजनांचा विचार न करता क्षणिक सुखाला प्राधान्य देतात. कोणत्याही विशिष्ट ध्येयाने प्रेरित न होता केवळ तात्कालिन सुखप्राप्तीसाठी त्या टोळीतील सदस्य एकत्र येऊन कृतीप्रवण होतात.

या उपसंस्कृतीचे दुसरे वैशिष्टय म्हणजे स्वायत्तता. या उपसंस्कृतीत गुन्हेगारी टोळ्यातील सदस्यांच्यात अनौपचारिक संबंध निर्माण होतात. परिणामी अशा टोळ्यांमध्ये दृढ स्वरूपाचा ऐक्यभाव असतो. या टोळ्यांचे इतर समूहांशी असणारे संबंध हे तटस्थ, शत्रुत्वाचे किंवा बेफिकीरीचे असतात. विशेष म्हणजे कुटुंब, शाळा, धार्मिक संस्था यांसारख्या सामाजिक संस्थांनी अशा गुन्हेगारी टोळी सदस्यांना सुधारण्याचा प्रयत्न केला तर त्याला विरोध किंवा प्रतिकार करण्याची या उपसंस्कृतीतील टोळ्यांची प्रवृत्ती असते.

एखादा मुलगा गुन्हेगार का होतो याचे स्पष्टीकरण न देता गुन्हेगारी उपसंस्कृतीचा विकास कसा होतो याचेच स्पष्टीकरण कोहेन यांनी केले आहे. उपसंस्कृतीच्या प्रभावामुळे जरी एखादा सदस्य गुन्हेगारी वर्तनाचा अंगीकार करतो असे कोहेन म्हणत असले तरी कुटुंब संरचनेचा या संदर्भात पडू शकणारा प्रभाव ते नाकारीत नाहीत. या संदर्भात ते म्हणतात, "कुटुंबाची (या संदर्भातील) भूमिका कमी लेखणे हा उद्देश नाही तर ज्या प्रकारे कुटुंबाचा सदस्यांवर प्रभाव पडतो तो बराचसा कुटुंबबाह्य जगतावरच अवलंबून असतो." कनिष्ठ वर्गाचा तरूण सदस्य उपसंस्कृती का विकसित करतो याचे प्राथमिक स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न कोहेन यांनी केला आहे. एका मोठया सामाजिक चौकटीमध्ये त्याला दर्जा प्राप्त होत नसल्याने तो (उपसंस्कृतीमध्ये) स्वतःला स्थान किंवा दर्जा मिळविण्याचा प्रयत्न करत असतो.

थोडक्यात, कनिष्ठ वर्गातील एखादा सदस्य स्वतःचे जे मूल्यमापन करतो ते आणि समाजातील मध्यमवर्गीयांच्या नजरेतून त्याचे होणारे मुल्यमापन यातील फरकामुळे

निर्माण होणा-या ताण व वैफल्याला प्रतिसाद म्हणून उपसंस्कृती निर्माण होते असा हा सिध्दांत आहे.

**५.सदरलॅन्ड यांचा विभेदित साहचर्य सिध्दांन्त** ः (Sutherland's Theory of Differential Association, 1939)

क्लिफोर्ड शो आणि हेन्री मेकी यांनी केलेला अभ्यास प्रमाण मानून एडविन सदरलॅड आणि त्यांचे विद्यार्थी डोनाल्ड क्रेसी यांनी १९३९ साली आपला विभेदित साहचर्य सिध्दांत मांडला. 'घनिष्ठ साहचर्य किंवा प्राथमिक संबंध असलेल्या समुहात गुन्हेगारी वर्तन शिकले जाते' ही या सिध्दान्ताची मध्यवर्ती कल्पना आहे.

गुन्हेगारी वर्तनाचे स्पष्टीकरण हे मुख्यतः दोन घटकांच्या आधारे केले जाते. पहिला म्हणजे परिस्थितीजन्य आणि दुसरा म्हणजे जननशास्त्रीय. एखादे विशिष्ठ कृत्य करतेवेळी परिस्थिती कशी होती? दिवस होता की रात्र ? पोलिसांची गस्त किंवा अन्य कुणाची गस्त चालू होती ? थोडक्यात गुन्हेगारी वर्तनाला अनुकूल होती का ? या प्रश्नांचा पहिल्या म्हणजे परिस्थितिजन्य घटकाशी संबंध आहे. जननशास्त्रीय घटकाला 'ऐतिहासिक' घटक असेही म्हणता येईल. येथे ऐतिहासिक याचा अर्थ ते विशिष्ट कृत्य करणा-या व्यक्तीला किंवा गुन्हेगाराला त्याच्या जीवनामध्ये आलेले वेगवेगळे अनुभव असा होय. म्हणजे गुन्हेगाराचे बालपण कसे गेले ? त्याला आई - वडील व भावंडांचे प्रेम मिळाले का ? त्याची मित्रमंडळी कोणती होती ? संगत कुणाची होती ? जीवनानुभांच्या आधारे त्याच्या गुन्हेगारी वर्तनाचे विश्लेषण केले जाते.

सदरलॅड यांनी यापैकी दुसऱ्या घटकाच्या आधारे आपला हा सिध्दांत विकसित केला आहे.

**उदा.** एका मुलाला खूप भूक लागली आहे. अशा भुकेल्या अवस्थेत जाताना त्याला रस्त्यात एका दुकानात खाद्यपदार्थ मांडलेले दिसले. विशेष म्हणजे त्या दुकानात मालक / नोकर तेव्हा नसल्याने त्या मुलाने काही मिठाई उचलली.

या मुलाने केलेले वर्तन हे 'उचलेगिरी' चे आहे. कायद्याच्या दृष्टीकोनातून तो चोर ठरतो परंतु त्यांच्या या वर्तनाचे स्पष्टीकरण 'परिस्थितीजन्य' दृष्टिकोनातून करणार की जननशास्त्रीय दृष्टिकोनातून ठरणार ? त्या मुलाला खूप भूक लागली असल्याने व दुकानात कुणीच नसल्याने त्याने मिठाई चोरली ही परिस्थिती होती का या उलट यापूर्वीच्या जीवनात तो अशाच काही गोष्टी तो शिकला होता. "चो-या करून भूक भागविता येते" हे त्याला माहित असल्याने तो मिठाईची पेटी उचलू शकला. याचा अर्थ परिस्थिती किंवा त्याने स्वतः शिकलेल्या वृत्ती त्याला चोरी करण्याची प्रेरणा देत असतात. म्हणून या वर्तनाचे स्पष्टीकरण 'परिस्थितीजन्य' दृष्टिकोनातून केले पाहिजे.

सदरलॅडचा हा सिध्दान्त समजण्यासाठी प्रथम 'विभेदित साहचर्य' म्हणजे काय ते समजावून घेवू. Association याचा अर्थ साहचर्य. त्यासाठी अर्थातच एकापेक्षा जास्त व्यक्ती एकत्र यायला हव्यात. एका व्यक्तीचे दुसऱ्या व्यक्तीच्या सहवासात येणे, संगतीत राहणे. म्हणजे त्यांच्यात साहचर्य निर्माण होते. Differential याचा अर्थ फरक असणे असा आहे. त्याला 'विभेदन' असे म्हणतात. एखादी व्यक्ती जेव्हा अशा ज्या दुसऱ्या व्यक्तीच्या साहचर्यामध्ये येते तेव्हा तिच्या बऱ्या-वाईट गुणांचा सवयीचा, आवडी-निवडीचा तसेच परंपरा, प्रथा मुल्ये, श्रध्दा इ. प्रभाव त्या पहिल्या व्यक्तीवर पडू शकतो. ती व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीचे वर्तन प्रकार शिकून आत्मसात करते. थोडक्यात सामाजिक नितीनियमांना अनुसरून राहणाऱ्या व्यक्तींच्या साहचर्यात एखादी व्यक्ती राहत असेल तर ती पण सामाजिक नितीनियमांप्रमाणे वर्तन करेल. तसेच जर एखाद्या व्यक्तीचे साहचर्य जुगारी अड्डे, वेश्यालये, गुंडांच्या टोळ्या इत्यादीशी प्रस्थापित झाले तर ही व्यक्ती पण हळूहळू ते वर्तनप्रकार शिकू लागते व गुन्हेगार बनते. सदरलॅड यांच्या सिध्दान्ताचा हाच गाभा आहे.

**उदा.** एखादी व्यक्ती क्षुल्लक कारणाने कारागृहात शिक्षेवर जाते. तेथे ती दारूडे, पाकीटमार, गुंड, चोर इ.संगतीत लक्षणीय काळ राहते. तिथे तिचे या गुन्हेगार प्रवृत्तीच्या लोकांशी साहचर्य प्रस्थापित होते आणि तेथेच परस्परांबद्दल आपुलकीची भावना, जिव्हाळा आणि घनिष्ट टिकाऊ संबंध निर्माण होतात. अशा समुहात गुन्हेगारी वर्तन शिकले जाते. या

शिकण्याच्या प्रक्रियेत दोन गोष्टींचा समावेश होतो. पहिला म्हणजे गुन्हेगारी विषयक तंत्रे **उदा.** बनावट कागदपत्रे किंवा चाव्या तयार करणे, कुलुप उघडणे, पाकीट मारणे इ. आणि दुसरे म्हणजे गुन्हेगारी अभिवृत्ती **उदा.** गुन्हेगारी वर्तनाचे सयुंक्तीकरण करणे याचा अर्थ कायद्याचे पालन करण्यापेक्षा कायदा मोडणेच कसे सयुक्तिक आहे हे ठरविले जाते.

थोडक्यात, आकाराने लहान, घनिष्ठ संबंध असलेल्या समुहाशी साहचर्य प्रस्थापित होवून गुन्हेगारी वर्तन शिकले जाते.

## २.२ बालगुन्हेगारीच्या संदर्भातील विविध समाजशास्त्रज्ञाचे सिध्दांत

१) **मर्टन च्या नियमनरहितता सिध्दांत** (Anomie Theory 1938, 672. 82) ः- समाजनिर्धारित साधनांच्या उपयोगाव्दारे व्यक्तींनी समाजसमर्पित उदि्ष्टे किती प्रमाणात गाठली यावर व्यक्तीच्या यशाचे मूल्यांकन होत असते. परंतु सर्वच व्यक्तींना यामध्ये यश मिळत नाही अशा वेळी व्यक्तीमध्ये तणाव व नैराश्य निर्माण होवून व्यक्तीकडून विचलित व समाजविरोधी वर्तन घडते. ही प्रक्रिया बालकांमध्ये फार लवकर घडते म्हणुन बालगुन्हेगार निर्माण होतो.

२) **फ्रैड्रिक थ्रेशर चा टोळी सिध्दांत** (Gang Theory, 1936, P. 381) ः- थ्रेशरच्या मते सुरुवातीला बाल्यावस्थेमध्ये बालक मित्रांच्या समूहात राहत असे. समूहातील काही घटक हे बालकाला आकर्षित करत असतात. कालांतराने बालक हा समुहाच्या आधीन होवून बालकांकडून सामुहिक गुन्हे घडतात. जे अयोग्य शिक्षण बालकाला त्याच्या समाजाकडून व कुटुंबातून मिळालेले असते त्यातून गुन्हे घडायला सुरुवात होते. सवंगडयांची मूल्ये, अभिवृत्ती, वर्तन इत्यादींचा प्रभाव मुलांवर पडतो आणि ती गुन्हेगार बनतात. थ्रेशर यांच्या मते, टोळी हे बालगुन्हेगारीचे प्रत्यक्ष थेट कारण नसले तरी टोळीमुळे गुन्हेगारी वर्तनाला चालना मिळते. साधारणपणे किशोरवयीन मुलांच्या माध्यमातून टोळ्या उत्स्फूर्तपणे निर्माण होतात. या टोळ्यांतून मुलांच्या मानसिक गरजा भागविल्या जातात. त्यांच्या हक्कांचे संरक्षण होते आणि

अशा टोळ्यामध्ये मुलांना सुरक्षित वाटते. ही सुरक्षितता त्यांना त्यांच्या कुटुंबात किंवा शेजार-सानिध्यात वाटत नसल्याने त्या मुलांच्या अशा टोळ्यांप्रती असलेली निष्ठा आणि संबंध दृढ होतात. हळूहळू अशा टोळ्यांमध्ये गुन्हेगारी तंत्रे, गुन्हेगारी प्रणाली, परस्पर हितसंबंधाची काळजी घेणे यासारखी प्रभिन्न वैशिष्टये विकसित होतात. कोहेन, क्वॉवर्ड आणि मिलर यांनी नंतर केलेल्या अध्ययनात या सिध्दांताला पुष्टीच मिळाली.

३) **क्लिफोर्ड शॉ आणि मैके चा सांस्कृतिक हस्तांतरणाचा सिध्दांत** (Culture transmission Threory, 1931, P. 386) :- मोठया शहरांच्या काही भागात परिणामकारक सामाजिक नियंत्रणशक्तींचा अभाव असतो. तेथील झोपडपट्टया किंवा तत्सम वस्त्यातील राहणारी बेकार, उडाणटप्पू, भटकी मुले ही आपल्या सहवासात येणा-या मुलांना पाकीटमारी, भुरटया चोऱ्या, मद्यपान, दारूची चोरटी वाहतूक इ. गोष्ट शिकवतात. अशा विभागांना 'गुन्हेगारी क्षेत्र' असे म्हणतात. अशा गुन्हेगारी क्षेत्राची ओंगळपणा, कनिष्ठ आर्थिक स्थिती, आर्थिक विवंचना इ. वैशिष्टये असतात. शॉ आणि मॅके यांना ७८ टक्के गुन्हे अशा प्रकारे गुन्हेगारी संस्कृतीचे संक्रमण होऊन झालेले आढळले. इथे संस्कृतीचे संक्रमण होते याचा अर्थ गुन्हेगारांची संस्कृती ही व्यक्तिगत आणि सामुहिक अंतरक्रियातून बिगर गुन्हेगार मुलांच्यात संक्रमित होते आणि ती गुन्हेगार बनतात. हे संस्कृती संक्रमण जसे 'गुन्हेगारी क्षेत्रात' होते.तसेच ते वसतिगृहे, शिबीरे (उदा.एन.सी.सी, एन.एस.एस चे कॅम्प्स) बोर्स्टल स्कूल्स, कारागृह येथेही होत असते.

४) **जॉर्ज हर्बर्ट मीडचा 'स्व' सिध्दांत** (Self & Role Theory 1913,pg. 577-602) :- हा सिध्दांत असे सांगतो की गुन्हेगार बनण्यामध्ये कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांची संगत कमी अधिक प्रमाणात कारणीभूत ठरत असते. म्हणूनच 'संपर्क' हा व्यक्तीच्या दृष्टीने योग्य असला पाहिजे, तसेच 'स्व' आणि 'भूमिका' यांच्या चौकटीत संपर्क बसला पाहिजे. गुन्हेगार बनण्यामागे संगत हा घटक व्यक्तीच्या दृष्टीने महत्वाचा ठरतो. व्यक्ती गुन्हेगार बनण्यामागे कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीची संगत ही कमीअधिक प्रमाणात इतर व्यक्तींच्या

बाबतीत कारणीभुत ठरत असते. व्यक्ती संगतीने जास्त गुन्हे करायला शिकते. जेवढी ती एकटी करू शकत नाही. कारण समुहात व्यक्तीला गुन्हा करताना सुरक्षित वाटत असते. म्हणूनच संपर्क हा व्यक्तीच्या दृष्टीने योग्य असला पाहिजे. तसेच तो स्व आणि भूमिका यांच्या चौकटित बसला पाहिजे. तरच व्यक्ती गुन्हेगारी मार्गाला जाण्यापासून परावृत्त होउ शकते.

५) **एलबर्ट कोहेनचा श्रमिक वर्गातील मुले व मध्यमवर्गीय मानदण्ड सिध्दांत** (Working Classboy & middle Class measuring Rod Theory, 1955, P. 119) :- हा सिध्दांत असे सांगतो की गुन्हा ही मुख्य करुन श्रमिक वर्गातील समस्या आहे. श्रमिक वर्गातील मुले जेव्हा मध्यमवर्गात पाऊल ठेवतात तेव्हा ते आचारविचारांच्या तुलनेत इतर मध्यमवर्गी यांपेक्षा कमी पडतात. तेव्हा स्वतःची असफलता त्यांच्या मनात निर्माण होवून प्रतिस्पर्धात्मक संघर्षाची निर्मिती होते व ती मुले मध्यमवर्गीय संस्कार व मूल्यांच्या विरुध्द वर्तन करतात , त्यामुळे विकृत, अनुपयोगी व विशेषात्मक मुल्यांचा बालकांकडून स्वीकार केला जातो व परिणामी समाजविरोधी वर्तन घडते.

६) **क्लोवार्ड आणि ओहलिन चा यशस्वी ध्येय आणि संधी संरचना सिध्दांत** (Success goals & opportunity structure theory, 1960, P. 86) :- हा सिध्दांत असे सांगतो की, व्यक्ती आपली ध्येये यशस्वी करण्यात अपयशी ठरल्या तर आपल्यातील असमर्थतेमुळे निम्न वर्गातील युवक नैराश्य व तणावाखाली राहतात. वैधानिक मार्गाने जर ध्येय पूर्ण करता आले नाही तर अशा वेळी ते अवैधानिक मार्गाचा अवलंब करतात त्यामुळे गुन्हेगारी वाढते.

७) **वाल्टन मिलर चा निम्नवर्गीय मुले आणि निम्नवर्गीय संरचना सिध्दांत** (Lower Class Boy & Lower Class Structure Theory, 1958, P. 6) : - हा सिध्दांत असे सांगतो की, गुन्हा हा निम्नवर्गीयामध्ये जास्त घडत असतो. निम्नवर्गातील किशोर बालके

उच्चवर्गीयांसारखे अनुकरण करतात. त्यांच्या मनात आपण निम्नवर्गातील सदस्य आहोत म्हणून घृणा निर्माण होते ही मुले लवकर श्रीमंत होवू पाहण्याचे स्वप्न बघतात. परिणामी ते स्वप्न पूर्ण करण्यासाठी वा□ मार्गाचा अवलंब करतात.

८) **डेवीड मात्जा चा गुन्हा आणि बहाव सिध्दांत** (Deliquency & Drift Theory, 1966, P. 11): - हा सिध्दांत असे सांगतो की, गुन्ह्याच्या मागे सामाजिक पर्यावरणीय घटक कारणीभुत असतात. बालक हा पूर्णपणे स्वतंत्र व पूर्णपणे नियंत्रित कधीच नसतो. जसा समाज आहे तसा तो वाहत असतो. अशा वेळी जसे बालकाला घडवले जाते त्या दिशेने बालकाचे वाहणे चालू असते. कुटुंबांप्रमाणे, समुहाप्रमाणे, समाजाप्रमाणे व पर्यावरणाप्रमाणे बालक हा स्वतःला वाहवून घेत असतो. अशा वेळीच गुन्हेगारी समाजाशी किंवा कुटुंबाशी जर त्याचा संपर्क असेल तर तो त्या दिशेने वाहत जावून गुन्हेगार बनतो.

| | प्रकरण ३<br>सिध्दांन्त कल्पना व अभ्यासपध्दती | पृष्ठ क्र |
|---|---|---|
| ३.१ | गुन्ह्यांचे कारणविषयक सिध्दांत | ७७ |
| ३.२ | सिध्दांत कल्पना | ८० |
| ३.३ | वास्तवामध्ये तपासून पाहण्यासाठी विधाने | ८० |
| ३.४ | संशोधन आराखडा | ८१ |

## ३.१ गुन्ह्याचे कारणविषयक सिध्दांत ः-

अनेक तज्ञ समाजशास्त्रज्ञ आणि विचारवंतांनी गुन्ह्याचे सखोल अध्ययन करून गुन्ह्याच्या कारणांचे विवेचन केले आहे. त्यांनी गुन्ह्याची वेगवेगळी कारणे लक्षात घेऊन आपले सिध्दांत मांडले आहेत. या सिध्दांतात गुन्ह्याच्या कारणांचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. म्हणून या सिध्दांतांना गुन्ह्याचे कारणविषयक सिध्दांत असे म्हणतात.

**१. पिशाच्चवादी सिध्दांत** ः या सिध्दांतानुसार ज्यावेळी व्यक्ती भूतप्रेत पिशाच्याने प्रभावित होते. तेव्हा ती व्यक्ती गुन्हे करण्यास प्रवृत्त होते. गुन्ह्यांसाठी पिशाच्यांचा प्रभाव हे कारण जबाबदार मानले जाते. प्राचीन काळी भूतप्रेत पिशाच्च या कल्पनांचा प्रभाव होता. म्हणून या घटकाला विशेष महत्व देण्यात आले होते. आजही आदिवासी समाजात पिशाच्च कल्पनेला विशेष महत्व दिले जाते. गुन्हेगारीला पायबंद घालण्यासाठी पिशाच्च्यांना प्रसन्न केले पाहिजे असे मानले जाते.

अलिकडील काळात मात्र भूतप्रेत पिशाच्च या गोष्टीवर विश्वास ठेवला जात नाही. म्हणून आधुनिक काळात या सिध्दांतास महत्व दिले जात नाही.

**२. अभिजात सिध्दांत** ः या सिध्दांताचे प्रवर्तक इटालियन विचारवंत बैकेरिया हे आहेत. त्यांच्यावर बेन्थम आणि जॉन हावर्ड यांच्या विचारांचा प्रभाव होता. १९ व्या शतकात 'अभिजात सिध्दांत' प्रचलित झाला. विचारवंत आणि राजकीय सुधारकांच्या प्रतिक्रियांच्या रूपात हा सिध्दांत विकसित झाला. या सिध्दांतानुसार व्यक्तीचा व्यवहार हा उद्दिष्टपूर्ण आणि तार्किक असतो. तसेच व्यक्ती विचारपूर्वक सुखाची निवड करते आणि दुःखापासून सुटका करते. म्हणून व्यक्ती सुख मिळविण्यासाठी भ्रष्टाचार, काळाबाजार, कर न देणे इत्यादी गुन्हे करतांना आढळतात. या सिध्दांतानुसार अशा गुन्ह्यासाठी कठोर अशी शिक्षा दिली पाहिजे. ज्यामुळे गुन्हा करणाऱ्यास सुखापेक्षा दुःख अधिक होईल. तरच गुन्हेगारी प्रवृत्तीस पायबंद घालता येईल.

**३ . भौगोलिक सिध्दांत ः** या सिध्दांताचे समर्थन क्वेटलेट, डेक्सटर, मोन्टेस्क्यू , क्रोपोटोकिन, चेम्पेन्फ इत्यादी विचारवंतांनी केले आहे . जल, वायू, पर्वत, नद्या, ऋतूमानानुसार होणारे बदल इत्यादी घटकांचा समावेश भौगोलिक वातावरणात होतो . ह्या भौगोलिक वातावरणाचा आणि गुन्ह्याचा एक निश्‍चित संबंध आहे . म्हणजेच भौगोलिक वातावरणाच्या अनुषंगाने गुन्ह्याचे स्वरूप व संख्या ठरते असे या विचारवंतांचे मत आहे . क्वेटलेटच्या मते, ‘‘व्यक्तींच्या विरूध्द गुन्हे दक्षिणेमध्ये अधिक घडतात . उन्हाळयात गुन्ह्यांच्या संख्येत वाढ होते . तर संपत्तीचे गुन्हे उत्तरेकडे अधिक होतात आणि थंडीच्या काळात गुन्ह्यांची संख्या वाढते ." लेकेसेन यांच्या मते, संपत्तीच्या गुन्ह्यांची अधिक संख्या डिसेंबरमध्ये होती . अमेरिकन विचारवंत डेक्सर यांना असे आढळून आले की, गुन्हे आणि भौगोलिक वातावरणामध्ये अगदी जवळचा संबंध आहे .

क्वेटलेटच्या मते, ‘‘लोकसंख्येचे घनत्व महत्तम असलेल्या भागात गुन्हेगारी प्रवृत्तीला पोषक वातावरण असते . मार्च-एप्रिल महिन्यात गुन्ह्यांची आणि त्यातल्या त्यात लैंगिक गुन्ह्यांची संख्या वाढते ."

या सिध्दांतानुसार गुन्ह्यासाठी भौगोलिक घटक हा जबाबदार मानण्यात आला आहे . या सिध्दांतावर अनेक आक्षेप घेण्यात आले आहेत . एकसारखी भौगोलिक परिस्थिती असलेल्या प्रदेशात गुन्ह्यांची संख्या सारखीच आढळत नाही ही मुख्य उणीव त्यात आहे .

**४ . मानसशास्त्रीय सिध्दांत ः** व्यक्ती गुन्हा का करते याची मीमांसा मानसशास्त्रीय आधारावर करण्यात आली आहे . हिले आणि ब्रोनर यांनी भावनात्मक क्षुब्धता आणि निराशेमुळे व्यक्ती गुन्हा करते, असे प्रतिपादन केले आहे . जीवनात आलेल्या नैराश्यावर मात करण्यासाठी व्यक्ती इतर व्यवहार करण्यास प्रवृत्त होते . इतर व्यवहारांमध्ये गुन्ह्यांचा समावेश होतो . भावनात्मक क्षुब्धतेमुळे सारासार विवेकशक्तीनुसार व्यवहार केला जात नाही . त्यामुळे व्यक्ती विचलित व्यवहार करते . आपण काय करतो ? त्याचा कोणता वाईट परिणाम होईल ? याचा

विचार व्यक्ती करीत नाही. हा सिध्दांत सर्वप्रकारच्या गुन्ह्यांचे विश्लेषण करू शकत नाही ही मुख्य उणीव त्यात आहे.

**५. जैविकीय सिध्दांत** : लोम्ब्रोसो, फैरी आणि गेरोफलो यांनी गुन्ह्यांच्या निर्मितीसाठी जैविकीय आधारावर निर्माण होणाऱ्या आनुवांशिक पैलूंवर अधिक भर दिला आहे. लोम्ब्रोसो यांनी १८७६ मध्ये विकासात्मक आनुवांशिकता सिध्दांत मांडला. ज्यास जन्मजात गुन्हेगारांचा सिध्दांत असे देखील म्हणतात. लोम्ब्रोसो यांनी असा निष्कर्ष मांडला की, गुन्हेगार हे जन्मजात गुन्हेगार असतात. गुन्हेगारांचे शारीरिक रूप आणि गुन्हेगार नसलेल्या व्यक्तींचे शारीरिक रूप यामध्ये फरक आहे.

या सिध्दांतानुसार गुन्हेगाराची शारीरिक रचना एक विशिष्ट प्रकारची आहे. विशिष्ट प्रकारच्या शारीरिक रचना असणाऱ्या व्यक्ती गुन्हेगार असतात. त्यांच्या शारिरीक लक्षणात शरीरावरील केसांचे जास्त प्रमाण, रूंद चेहरा,गालावरील हाडे वर आलेली, मोठे कान, तीक्ष्ण व भेदक दृष्टी आणि मानेची कमी उंची यांचा अंतर्भाव होतो. ही सर्व लक्षणे असलेली व्यक्ती गुन्हेगार बनत असे.

**६. आर्थिक सिध्दांत** : या सिध्दांताचे समर्थक सुप्रसिध्द जागतिक विचारवंत कार्ल मार्क्स हे आहेत. त्यांच्या मते आर्थिक विषमता गुन्ह्यांसाठी कारणीभूत आहे आर्थिक विषमतेमुळे लोक गुन्हे करतात. या सिध्दांतात आर्थिक विषमतेला विशेष प्राधान्य देण्यात आले आहे. परंतु आर्थिक परिस्थितीमुळे सर्वच लोक गुन्हे करीत नाहीत. म्हणून हा सिध्दांत सर्व प्रकारच्या गुन्ह्यांचे विश्लेषण करू शकत नाही.

**७. समाजशास्त्रीय सिध्दांत** : समाजशास्त्रीय सिध्दांतानुसार सामाजिक परिस्थितीमुळे गुन्हे घडून येतात. म्हणजे गुन्हा हा समाजोद्‌भवित आहे. गुन्हेगारांना व्यवहार हा शिकविला जातो. म्हणून गुन्हा हे एक शिक्षित वर्तन असते. व्यक्तीचे अयोग्य सामाजीकरण होते तेव्हा व्यक्ती

गुन्हे करण्यास प्रवृत्त होते. क्लोवार्ड, सदरलँड, हावर्ड बेकर इत्यादींनी या सिध्दांताचा पुरस्कार केला आहे.

**८. बहुकारकवादी सिध्दांत** ः गुन्ह्यासाठी कोणते एकच कारण आहे याचे विश्लेषण करणे कठीण आहे. म्हणून १९२५ मध्ये बर्ट यांनी बहुकारकवादी सिध्दांताची मांडणी केली आहे. या सिध्दांतानुसार गुन्हा हा कोणत्याही एका कारणाचे फलित नाही तर, आनुवंशिक कारण, सामाजिक वातावरण, शारीरिक आणि मानसिक इत्यादी अनेक कारणे जबाबदार आहेत. या सर्व कारणांच्या एकत्रित परिणामातून गुन्हा प्रवृत्ती वाढीस लागते. डोनाल्ड टॅफ्टच्या मते, गुन्हा ही सामाजिक घटना आहे असे मानून व्यक्तीच्या शारीरिक, मानसिक आणि वातावरणाच्या प्रभावाचा तो परिणाम आहे. (१५)

## ३.२ सिध्दांन्त कल्पना ः-

प्रस्तुत संशोधन पडताळणी प्रकारचे आहे. अगोदरच्या संशोधकाने निरनिराळ्या ठिकाणी व वेगवेगळ्या काळात केलेल्या संशोधनाच्या पार्श्वभूमीवर पुण्यातील बालसुधारगृहातील सध्याच्या वास्तव्य करणाऱ्यांचा अभ्यास केलेला आहे. यामध्ये पुढील सिद्धांत कल्पना पडताळणीसाठी घेत आहोत .

**“भग्न कुटूंब आणि वाईट संगत या दोन कारक घटकांमुळे बालके गुन्हेगारीकडे वळू शकतात आणि शालेय शिक्षण घेतल्याने गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा बसु शकतो”**.

## ३.३ वास्तवात तपासुन पाहण्यासाठी विधाने ः-

१. कौटुंबिक भग्नता बालकांना गुन्हेगारी क्षेत्राकडे जाण्यास प्रवृत्त करते.

२. वाईट संगतीमुळे बालके ही गुन्हा करताना दिसून येतात.

३.शाळेत जाणा-या बालकांपेक्षा शाळेत न जाणा-या बालकांकाडुन अधिक गुन्हे घडतात असे वाटते.

## ३.४ संशोधन आराखडा

### ३.४.१ अभ्यास विषय ः-

प्रस्तूत शोधप्रबंध हा पुणे शहरातील बालगुन्हेगारी समस्येची उकल करणारा असुन या समस्येचे बदलत जाणारे स्वरूप, बालगुन्हेगारीचे प्रमाण, बालगुन्हेगारीच्या कारणांचा शोध घेणे ही संशोधनाची मुख्य उद्दिष्टे आहे.

तसेच बालकांनी केलेले गुन्हे, त्यांचे कौटुंबिक वातावरण, आर्थिक स्थिती व दर्जा, बालगुन्हेगाराचे वय, शिक्षण, बालकांची मानसिक स्थिती त्यांना गुन्हा करण्यास प्रवृत्त करणारी परिस्थिती इ. बाबींचा अभ्यास करण्यात आला आहे.

### ३.४.२ अभ्यासाचे महत्व ः-

पुणे शहरातील बालगुन्हेगारांची संख्या लक्षात घेता दर वर्षी हे प्रमाण वाढत जाताना दिसते हे बालगुन्हेगार विविध वयोगटातील दिसून येतात. महाराष्ट्रात १६ वर्षाखालील मुले व १८ वर्षाखालील मुलींसाठी गुन्ह्यांच्या संदर्भात गुन्हेगार ही संज्ञा वापरली जाते.

सद्यपरिस्थितीमध्ये एकटया पुणे शहरातील वाढत्या सामाजिक समस्येचे प्रमाण लक्षात घेता बालगुन्हेगारी ही समस्या तीव्रतेने वाढत असताना दिसत आहे. विविध वर्तमानपत्रे, मसिके, प्रसारमाध्यमे इ. यामधून लहान वयातच मुलामुलींनी केलेली समाजविघातक कृत्ये प्रदर्शनास येत आहे म्हणून हा ज्वलंत विषय असल्याने यावर संशोधन करणे आवश्यक वाटले.हा अभ्यास जरी एका शहरातील बालगुन्हेगारांचा केला असला तरी यांतील निष्कर्षांची उपयुक्तता अशाच वेगाने वाढणाऱ्या अन्य शहरातील बालगुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने उपयोगात येवू शकेल.

### ३.४.३ अभ्यासाची उद्दिष्टे ः-

१.बालगुन्हेगारांचे प्रमाण, गुन्ह्याचे स्वरूप ,गुन्ह्यांला भाग पाडणरी कारणे, आर्थिक व कौटुंबिक पार्श्वभुमी , शाररीक व मानसिक विकृती इ.जाणून घेणे.

२ . बालगुन्हेगारीत गुन्हे करणाऱ्या मुलांचे प्रमाण व मुलीचे प्रमाण यातील फरकांची नोंद घेणे

३ . बालगुन्हेगारीच्या कारणामध्ये होत असलेला बदल जाणून घेणे .

४ . बालगुन्हेगारांतील बालकांचे शिक्षणाचे प्रमाण शोधणे .

५ . पुणे शहरातील ६0 वर्षातील बालगुन्हेगारीचे प्रमाण व गुन्ह्यांच्या प्रकाराचे विश्लेषण करणे .

**३ . ४ . ४ संशोधनासाठी निवड केलेल्या संस्था ः-**

१ . पंडीत जवाहरलाल नेहरू, औद्योगिक शाळा, येरवडा, पुणे (मुले)

२ . मुंलीचे शासकीय सुधार गृह, मुंढवा, पुणे .

**माहिती गोळा करण्यात आलेल्या इतर संस्था ः-**

१ . गोखले इन्सिट्युट मधील ५0 वर्षातील जनगणनेचे व गुन्हेगारीचे अहवाल (भारत, महाराष्ट्र , पुणे)

२ . ग्रंथालयातील संदर्भ ग्रंथ .

३ . शिवाजीनगर येथील मुलांचे निरिक्षक गृह, पुणे

**३ . ४ . ५ तर्कसंगती ः-**

बालगुन्हेगारांची मोठी संख्या लक्षात घेता अशा प्रकारच्या अध्ययनासाठी मर्यादीत नमुना निवडणे आवश्यक ठरते . अशा मर्यादीत नमुन्यातील बालकांचा अभ्यास करून ते निष्कर्ष व्यापक अशा स्रमगासाठी लागु करण्याची पध्दत या ठिकाणी उपयोगी पडेल असे वाटते . ही पध्दत निगमन तर्कसंगती (Induction Logic) म्हणून ओळखली जाते .

या अभ्यासविषयावर आधीही संशोधन झाले असल्यामुळे गुणवत्ता माहितीवर भर देण्यापेक्षा संख्यात्मक नमुन्यावर जास्त भर देण्यात आला आहे .

### ३.४.६ व्यष्टी अध्ययन पध्दत: अध्ययन पद्धती

समाजशास्त्रात व्यष्टी अध्ययनाचा सर्वप्रथम उपयोग हर्बट स्पेन्सर (Herbert Spencer) या इंग्रज समाजशास्त्रज्ञाने केला. हर्बट स्पेन्सर यांनी वेगवेगळ्या संस्कृतीच्या तुलनात्मक अध्ययनात व्यष्टी सामुग्रीचा सर्वप्रथम उपयोग केला. परंतु व्यष्टी अध्ययन पद्धतीचा व्यवस्थित स्वरूपात उपयोग फ्रेडरिक लेप्ले (Fredrick Lepley) यांनी केला. म्हणून सामाजिक शास्त्रात व्यष्टी पद्धती आणण्याचे श्रेय लेप्ले यांना दिले जाते. त्यांनी १९ व्या शतकात फ्रान्सच्या मजूर कुटुंबाचे अध्ययन या पद्धतीद्वारे केले. त्यानंतर विल्यम हीले (William Healey) यांनी व्यष्टी पद्धतीचा उपयोग बालगुन्हेगारीच्या अध्ययनात केला. आदिवासी व आधुनिक संस्कृतीचे वर्णनात आणि अध्ययनात मानवशास्त्रज्ञांनी व्यष्टी अध्ययन पद्धतीचा उपयोग केला. थॉमस व झनैकी (Thomas and Zanaieki) यांनी 'द पोलिश पीझंट' (The Polish Peasant in Europe and America, 1927) या अध्ययनात व्यष्टी अध्ययन पद्धतीचा उपयोग केला. थॉमस व झनैकी ह्यांच्या या अध्ययनामुळे एक व्यवस्थित क्षेत्रसंशोधन तंत्र म्हणून व्यष्टी अध्ययन पद्धतीस विशेष चालना मिळाली.

१) पॉलिन यंग (Pauline Young) "व्यष्टी अध्ययन पद्धती कोणत्या तरी सामाजिक एककाचे मग ती एक व्यक्ती, कुटुंब, संस्था, सांस्कृतिक वर्ग किंवा जाती असो त्यांच्या जीवनाचे संशोधन आणि त्याचे विवेचन करण्याची एक पद्धत आहे."

२) गुड आणि हॅट (Good and Hatt) "व्यष्टी अध्ययन पद्धती सामाजिक तथ्यांना संघटित करण्याची एक अशी पद्धत आहे की, ज्यामुळे अध्ययन केल्या जाणाऱ्या सामाजिक एककांची एकात्मक वैशिष्ट्ये पूर्णत: सुरक्षित ठेवली जातात."

#### व्यष्टी अध्ययनाचे महत्त्व

कोणत्याही प्रकारच्या संशोधनात सूक्ष्म आणि विस्तृत अध्ययनाची आवश्यकता असते. त्यामुळे कोणत्याही सूक्ष्म आणि विस्तृत अध्ययनाकरिता व्यष्टी अध्ययन पद्धती विशेष

महत्त्वपूर्ण आहे. व्यष्टी अध्ययन पद्धती ही सामाजिक वातावरणाच्या अध्ययनाचे एक मूलभूत तंत्र आहे. व्यष्टी अध्ययनाचे महत्त्व किंवा गुण हे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) **महत्त्वपूर्ण गृहितकृत्याचा स्त्रोत** ः- व्यष्टी अध्ययन पद्धतीद्वारे अनेक महत्त्वपूर्ण गृहितकृत्याची निर्मिती केली जाऊ शकते. व्यष्टी अध्ययनात अनेक एककांचे विस्तृत व सुक्ष्म अध्ययन केले जाते. आणि त्या आधारावर विशिष्ट निष्कर्ष काढले जातात. या निष्कर्षाच्या आधारावर अनेक गृहितकृत्याची निर्मिती केली जाते. म्हणून व्यष्टी अध्ययन पद्धती ही गृहितकृत्याचा एक महत्त्वाचा स्त्रोत आहे.

२) **अतिशय महत्त्वपूर्ण प्रलेखाचा स्त्रोत** ः- व्यष्टी अध्ययन पद्धतीमध्ये अनेक महत्त्वपूर्ण प्रलेखाची निर्मिती केली जाते. ज्याच्या साहाय्याने अध्ययन केले जाते. हे महत्त्वपूर्ण प्रलेख म्हणजे अनुसूची, प्रश्नावली, मुलाखत मार्गदर्शिका इत्यादी होत. कोणत्या विशेष वर्गाच्या काही विशिष्ट एककांचे अतिशय सूक्ष्म अध्ययन केल्यामुळे आपणास अनेक महत्त्वपूर्ण गोष्टींचे पुरेसे ज्ञान होते. त्यामुळे सामाजिक संशोधन संबंधित अनेक महत्त्वपूर्ण प्रलेखाची निर्मिती करण्यास विशेष अडचण जात नाही.

३) **सखोल अध्ययन** ः- व्यष्टी अध्ययनात व्यक्ती, समूह संस्था इत्यादी सामाजिक एककाचे अतिशय सखोल अध्ययन केले जाते. म्हणूनच बर्जेस (Burges) यांनी व्यष्टी अध्ययन पद्धतीस 'सामाजिक सुक्ष्मदर्शक यंत्र' असे म्हटले आहे.

४) **एककाचे वर्गीकरण व विभाजन** ः- व्यष्टी, अध्ययनामुळे विविध एककांना विविध समूहात विभाजित करणे आणि वर्गीकृत करण्यास मदत होते. व्यष्टी अध्ययनात सुक्ष्मपणे व्यक्ती विशेषाच्या वैशिष्ट्यांचे ज्ञान होते त्यामुळे नमुना निवड करणे सुलभ होते.

५) **व्यक्तिगत अनुभवाचा स्त्रोत** ः- व्यष्टी अध्ययन पद्धती ही व्यक्तिगत अनुभव प्राप्त करण्याचा एक विस्तृत स्त्रोत आहे. या पद्धतीमध्ये इतर पद्धतीपेक्षा अधिक अनुभव

संशोधनकर्त्यास प्राप्त होतात. व्यष्टी अध्ययनात एककाच्या जीवनाचे अतिशय सूक्ष्म अशा पैलूंचे अध्ययन केले जाते. म्हणून संशोधनकर्त्यास अनेक प्रकारचे अनुभव प्राप्त होतात.

६) **व्यक्तिगत भावना व मनोवृत्तीचे अध्ययन** ः- व्यष्टी अध्ययन पद्धतीमध्ये व्यक्तिगत भावना आणि मनोवृत्तीचे अतिशय सखोल अध्ययन केले जाते. इतकेच नव्हे तर व्यक्तीच्या सामाजिक धारणा आणि मूल्यांचे देखील ज्ञान होते. एका व्यक्तीचे कोणकोणत्या परिस्थितीत कोणकोणत्या भावना आणि कोणत्या प्रकारची मनोवृत्ती असते. याची माहिती या पद्धतीद्वारे होते.

७) **सामुग्रीची संपूर्णता** ः- व्यष्टी अध्ययनाद्वारे जी सामग्री संकलित केली जाते ती सामुग्री परिपूर्ण असते. इतकी संपूर्णता आणि पुरेशा प्रमाणात सामुग्री इतर कोणत्याही पद्धतीद्वारे प्राप्त करणे कठीण आहे.

**व्यष्टी अध्ययनाच्या मर्यादा**

सामाजिक संशोधनात व्यष्टी अध्ययनाचे विशेष महत्त्व आहे. परंतु त्याचबरोबर या पद्धतीच्या काही मर्यादा आहेत. व्यष्टी अध्ययनाच्या मर्यादा या पुढीलप्रमाणे आहेत.

१) **संशोधनकर्त्याचा पक्षपात** ः- संशोधनकर्ता हा बऱ्याच दीर्घ कालावधीपर्यंत सूक्ष्म व सखोल अध्ययन करीत असतो. अशावेळी संशोधनकर्त्याला त्या व्यक्तीविषयी आपुलकी, स्नेह वाटतो त्यामुळे संशोधनकर्ता हा नकळत पक्षपात करण्याची शक्यता असते.

२) **केवळ काही एककाच्या आधारावर निष्कर्ष** ः-व्यष्टी अध्ययन पद्धतीत काही विशिष्ट एककाचे सुक्ष्म अध्ययन करून त्या आधारावर निष्कर्ष काढले जातात. म्हणून काही एककावरून काढलेले निष्कर्ष सर्व एककासाठी लागू करणे योग्य नाही.

३) **अशास्त्रीय पद्धत ः-** व्यष्टी अध्ययन पद्धती ही अशास्त्रीय पद्धत आहे अशी टिका केली जाते. कारण एककाची निवड आणि माहिती संकलनावर कुणाचेही नियंत्रण नसते. त्याचप्रमाणे शास्त्रीय आणि संघटित पद्धतीचे सहाय्य घेतले जात नाही. म्हणून ही पद्धत अशास्त्रीय पद्धत मानली जाते.

४) **अधिक अशुद्धता ः-** व्यष्टी अध्ययन पद्धतीत दैनंदिनी पत्रे, जीवन इतिहास इत्यादी माहिती मिळविण्यासाठी उपयोग केला जातो. परंतु हे सर्व रेकॉर्ड आणि प्रलेख हे खरे असतातच असे नाही. ही वास्तविकता असून देखील या पद्धतीत या सर्व सामुग्रीवर विशेष भर दिला जातो. त्यामुळे अध्ययनात अनेक दोष राहण्याची शक्यता असते.

५) **परीक्षण करणे शक्य नसलेली तथ्ये ः-** व्यष्टी अध्ययनात संशोधनकर्ता ज्या तथ्यांचे संकलन करतो. त्याचे परीक्षण करणे शक्य नसते. एका व्यक्तीच्या जीवनासंबंधित जी काही माहिती संकलित केली जाते. त्या माहितीचे सत्यापन किंवा परीक्षण करणे अशक्य असते. त्यामुळे या अध्ययनातील निष्कर्ष देखील चुकीचे असू शकतात.

६) **नमुना निवड पद्धतीचा अभाव ः-** व्यष्टी अध्ययन पद्धतीत नमुना निवड पद्धतीचा अभाव आणि त्यामुळे यात प्रातिनिधिक एककाचे अध्ययन होत नाही. संशोधनकर्ता आपल्या मतानुसार काही एककाची निवड करून अध्ययन करतो. म्हणून हे निष्कर्ष प्रातिनिधिक स्वरूपाचे राहू शकत नाही.

७) **दोषपूर्ण जीवन इतिहास ः-** व्यष्टी अध्ययनात व्यक्ती इतिहासाचे विशेष महत्त्व असते. या पद्धतीत अशास्त्रीय आणि अप्रामाणिक तथ्यांचे संकलन केले जाते. जीवन इतिहास हा खरा आहे हे तपासणे कठीण असते. त्या व्यक्तीशी संशोधनकर्त्यांचा निकटचा संबंध येत असल्यामुळे त्या व्यक्तीविषयी आदर व प्रेम वाटण्याची शक्यता असते. अशावेळी दोषपूर्ण जीवन इतिहास संशोधकाला खरा वाटू शकतो.

८) **अधिक वेळ आणि अधिक खर्च ः-** व्यष्टी अध्ययन हे दीर्घकाळ पर्यंत सुरू असते. या अध्ययनास कमीत कमी तीन वर्ष लागतात. त्याकरिता बराच पैसा लागतो. अध्ययनास दीर्घकाळ लागत असल्यामुळे अनेकदा अध्ययन कार्य अपूर्ण राहण्याची देखील शक्यता असते. [१६]

व्यष्टी अध्ययन पध्दतीचा उपयोग **विल्यम हिले** यांनी बालगुन्हेगारीच्या अध्ययनात केलेला दिसुन येतो. प्रस्तुत शोधप्रबंधात पुणे शहारातील बालगुन्हेगारीची कारणे, गुन्ह्याचा प्रकार व बाल सुधारगृहातील बालकांची सविस्तर कौटुबिक, वैयक्तिक, सामाजिक व अर्थिक पार्श्वभुमी समजून घेण्यासाठी व्यष्टी अध्ययन पध्दतीची निवड करण्यात आली आहे.

तसेच अतिरिक्त माहिती प्राप्त करण्यासाठी प्रत्येक रिमांड होम मधील एका पर्यवेक्षक अधिकाऱ्याची मुलाखतीसाठी निवड करण्यात आली आहे.

### ३.४.७ माहिती मिळवण्याचे तंत्र

संशोधनकार्यात तथ्य संकलनासाठी विविध पध्दतीचा वापर करावा लागतो. प्रस्तुत अभ्यास हा ऐतिहासिक व वर्तमानकालीन तथ्यविश्लेषणात्मक स्वरूपाचा आहे त्यामुळे माहिती संकलित करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे.

**१. प्राथमिक स्त्रोत:**

पुणे शहरातील बालगुन्हेगारांची कौटुंबिक, वैयक्तिक, सामाजिक व आर्थिक पार्श्वभुमी समजून घेण्यासाठी आणि बालगुन्हेगारीच्या कारंणाचा शोध घेण्यासाठी मुलाखत पध्दतीचा वापर केला गेला आहे. तसेच थोडयाफार प्रमाणात सभोवतालच्या परिस्थितीचे आकलन करण्यासाठी निरीक्षण पध्दतीचा वापर केला गेला आहे.

**२. दुय्यम स्त्रोत :**

बालगुन्हेगारांसाठी सरकारने स्थापन केलेल्या विविध संस्था, या विषयांवर प्रसिध्द झालेली विविध पुस्तके, वर्तमानपत्रे, प्रसारमाध्यमे, शासकीय नोंदी व अहवाल, सुधारगृहातून मिळालेली आकडेवारी इ. मधुन महिती संग्रहीत केली आहे.

| | प्रकरण ४ – तथ्य संकलन व प्रत्यक्ष कामाचा अनुभव | पृष्ठ क्रं |
|---|---|---|
| ४.१ | मुलाखत मार्गदर्शिका तयार करणे | ८९ |
| ४.२ | पायलट स्टडी | ९0 |
| ४.३ | काम करताना आलेले अनुभव | ९२ |

## ४.१ मुलाखत मार्गदर्शिका तयार करणे

१. या संशोधनात मुलाखत हे तंत्र वापरण्याचा मुळ उद्देश असा होता की, सर्वसाधारणपणे बालगुन्हेगारीत बहुसंख्य मुले व मुली या वयाने लहान असल्याने प्रश्नावली भरून देण्यास हा वयोगट असमर्थ होता. तसेच इतर तंत्राचाही वापर इथे करणे अशक्य होते. बहुसंख्य बालके कमी शिकलेली व निरक्षर असल्याने काहींना लिहता – वाचता येत नव्हते. म्हणूनच मुलाखत हे तंत्र या संशोधनात वापरणे योग्य वाटले.

२. मुलाखत मार्गदर्शिकेमध्ये पहिले १ ते १0 प्रश्न हे प्रत्यक्ष बालकांना विचारण्यात येणार होते व ११ व १२ ह्या प्रश्नांची उत्तरे बालकांच्या केस फाईल्स मधून प्राप्त होणार होती. पहिले १ ते १0 प्रश्न हे सर्वसाधारण असल्याने बालकांना या प्रश्नांची उत्तरे देण्यास कोणताही त्रास होणार नाही अशी काळजी यात घेतली गेली होती.

३. बालकांना प्रश्न विचारता तुम्ही कोणता गुन्हा केला आहे ? तुम्ही इथे कसे आलात ? किंवा तुम्ही गुन्हा का केलात ? असे विचारणे योग्य व सोयीस्कर नव्हते म्हणून मुलांचे नाव विचारून नंतर त्याच्या नावानुसार केस फाईल्स मधील माहिती नमुद करण्यात आली. तसे पाहता कोणत्याही तंत्रात उत्तरदात्याचे नाव विचारले जात नाही किंवा ते नमुदही केले जात नाही. परंतु नावानुसारच त्यांच्या केस फाईल्स मधून ११ व १२ क्रमाकांच्या प्रश्नांची उत्तरे प्राप्त होणार असल्याने प्रत्येक बालकाचे नाव विचारणे अनिवार्य होते.

अशा रीतीने मुलाखत मार्गदर्शिकेचे स्वरूप हे निश्चित करण्यात आले. तसेच बालकांकडून जास्तीत – जास्त माहिती प्राप्त करण्यासाठी त्यांची मुलाखत गप्पांच्या माध्यमातून घेण्याचा उद्देश होता. त्यामुळे या मुलाखत मागदर्शिकेमध्ये आवडते छंद कोणते ? मित्र आहेत का ? खेळायला आवडेत का ? सिनेमा, टिव्ही बघतोस का ? असे बाहेरचे प्रश्न विचारून खरी व प्रत्यक्ष माहिती मिळण्याचा प्रयत्न केला गेला.

## ४.२ पायलट स्टडी

१. बालकांच्या मुलाखती घेण्यासाठी प्रथम टिळक महाराष्ट्र, विद्यापीठाकडून शिफारस मान्यता पत्र घेण्यात आले. त्यानंतर पुणे जिल्हा महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे स्टेशन, पुणे येथे जाऊन आयुक्तालयाची परवानगी घेण्यात आली.

२. पुणे विभागातील महिला व बालविकास अधिकारी पुणे यांची परवानगी घेण्यात आली.

३. परवानगी प्राप्त झाल्यानंतर पुणे शहरातील दोन सुधारगृहे निश्चित करण्यात आले. त्यातील एक सुधारगृह हे मुलांचे व एक सुधारगृह मुलींचे निवडण्यात आले.

४. प्रथम मुलांच्या पंडीत जवाहरलाल नेहरू, औदयोगिक शाळा, येरवडा, पुणे येथे जाऊन ५ मुलांच्या मुलाखती घेण्यात आल्या.

५. या पाच मुलांपैकी २ मुले ही सामान्य अधिकक्षातील होती म्हणजेच ज्यांच्यावर छोटया स्वरूपाच्या गुन्ह्याचे आरोप होते व तीन मुले ही IPC (Indian Penal Code) म्हणजेच मोठया स्वरूपाच्या गुन्ह्यातील होते.

६. तयार केलेल्या मार्गदर्शिकेप्रमाणे प्रत्येक मुलाला प्रश्न विचारण्यात आले. तेव्हा असे जाणवले की, एकदम प्रश्न विचारल्यावर मुले खूप गोंधळून जात होतो. आपल्याला असे प्रश्न का विचारत आहे? ही भीती त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होती म्हणून मग मुलाखतीच्या सुखातील त्या मुलांशी थोडया गप्पा मारून मुलाखतीला सुरवात केली. मी ही मुलाखत कशासाठी घेत आहे. त्यामागचा उद्देश काय हे मी त्यांना समजेल अशा भाषेत सांगितल्याने त्याची भिती पूर्णपणे कमी झाली होती.

७. मुलाखत मार्गदर्शिकेमधील प्रश्न साधेच असल्याने प्रश्नामध्ये बदल करावा लागला नाही. ५ मुलांच्या मुलाखती झाल्यानंतर त्यांच्या नावानुसार सुधारगृहातील परिविक्षा अधिकारीकडून त्यांच्या केस फाईल्स स्टडी करण्यात आल्या. परिविक्षा अधिकारीनींही मला हवी ती मदत देवू केली. या केस फाईल्स मधून त्यांचे गुन्हे, गुन्ह्याचे कारण, गुन्हा

कसा व कोणत्या परिस्थितीत घडला, बालकांचे मुळ गाव व कौटुंबिक माहिती, सुधारगृहात दाखल केल्याची तारीख इ. माहिती प्राप्त झाली.

८. अशा रीतीने ५ मुलांच्या मुलाखती झाल्यानंतर आलेल्या अनुभवावरून काही अडचणी लक्षात घेता माहीती घेण्याची पध्दत सुधारली व एकुण १०० मुले व १०० मुलींच्या मुलाखती याच पध्दतीने घेण्यात आल्या.

९. १०० मुलांच्या व १०० मुलींच्या मुलाखती घेवून झाल्यानंतर दोन्ही सुधारगृहातील परिविक्षा अधिकाऱ्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या.

१०. गुन्हेगारीचे व जनगणनेचे ५० वर्षातील प्रमाण प्राप्त करण्यासाठी गोखले इन्सिट्युट मधील जनगणनेचे व गुन्हेगारीचे (भारत,महाराष्ट्र ,पुणे) दरवर्षी प्रदर्शित होणारे वार्षिक अहवालाचा उपयोग झाला. (१ एप्रिल ते ३१ मार्च या आर्थिक वर्षानुसार अहवाल प्रदर्शित होतो) त्यांच्यावरून सन १९५१ पासुन २००१ पर्यंतचे प्रमाण जनगणनेचे व गुन्हेगारीचे प्रमाण समजले.

११. बालगुन्हेगारीसंबंधी अतिरिक्त स्वरूपाची माहिती ग्रंथालयातील पुस्तकांमधुन, इंटरनेटवरून वर्तमानपत्रातुन, शासकीय पुस्तके व अहवाल यातुन प्राप्त करण्यात आली. अशा रितीने संशोधनासाठी आवश्यक ती माहिती संकलित करण्यात आली.

## ४.३ संशोधन करताना आलेले अनुभव

संशोधन करताना अनेक प्रकारचे अनुभव आले. त्यातील काही अनुभव सुखात्मक तर काही दुखात्मक होते. काही अनुभव सर्वसामान्य माणसाला विचार करायला भाग पाडण्यासारखेसुध्दा होते. हे अनुभव मांडल्याशिवाय माझे संशोधन कार्य पुर्ण होवू शकणार नाही. म्हणून हे अनुभव पुढे मांडले आहेत.

१. बालकांच्या मुलाखती घेण्यासाठी प्रथम मी सुधाहरगृहात गेले असता तेथील परिविक्षा अधिका–यांची परवानगी मागितली. तेव्हा नकळत माझ्या तोंडून या बालकांविषयी बालगुन्हेगार असे संबोधन वापरले गेले तेव्हा त्यांनी सांगितले कि; 'मुले कधीच गुन्हेगार नसतात. गुन्हेगार कशाला म्हणतात हे ही त्यांना माहित नसते'. तेव्हा त्यांचे हे म्हणणे अगदी योग्य वाटले.

२. मुलांच्या मुलाखती घेत असताना बऱ्याच मुलांच्या डोळयातुन पाणी येत होते. कारण इथे राहायला कुणालाच आवडत नव्हते. त्यांना घरची आठवण येत होती. दोन – तीन मुल तर चक्क विनवण्या करीत होती की 'आम्हाला घरी न्या' आम्हाला येथे राहायचे नाही. तेव्हा असे जाणवले की इतक्या लहान वयात त्यांना स्वतःच्या आई – वडीलांपासुन, कुटुंबापासुन दुर राहावे लागत आहे. हीच खरं तर मोठी शिक्षा त्यांना भोगावी लागत आहे.

३. मुलाखती घेत असताना एका बालकांच्या हातावर ब्लेडने कापल्याचे व्रण होते. हे कसले व्रण आहे असे त्याला विचारल्यानंतर त्याने सांगितले की इथे करमत नाही. घरची आठवण येते म्हणुन मी गुपचुप व्हाईटनरने नशा करायचो. नशेच्या भरात मी काय करतो ते मला आठवत नाही. तेव्हा त्याच गुंगीत माझ्याकडुन आत्महत्येचा प्रयत्न केला गेला. अधिकाऱ्यांना हे समजल्यावर त्यांनी व्हाईटनर, ब्लेड जप्त करून खोलीत बंद केले.

४. प्रथम – प्रथम मुले मुलाखत दयायला खूप घाबरत होते परंतु नंतर मी मनमोकळया गप्पा मारायला लागले. मग त्यांनी पिच्चरविषयी, मित्रांविषयी एक–एक गमती–जमती सांगायला त्यांनी सुरवात केली.

५. सामान्य अधिकक्षातील मुलांच्या मुलाखती झाल्यावर IPC च्या अंतर्गत मुलांच्या मुलाखती घेण्यात आल्या. प्रथम असे वाटले की या मुलांनी गंभीर गुन्हे केले आहे की मुले कशी असतील. आपल्याशी कशी बोलतील. परंतु प्रत्यक्ष मुलाखत घेताना लक्षात आले की ही मुलेही सर्वसामान्य मुलांसारखीच निरागस व बालीश आहे. त्यांच्या बोलण्यातुन, वागण्यातुन कुठेही असे जाणवले नाही की ही गंभीर गुन्हे करणारी मुले आहेत. अतिशय सौम्य व सभ्य भाषेत ही मुले मुलाखत देत होती. त्यांना त्यांनी केलेल्या गुन्ह्याबद्दल मनात कुठेतरी पश्चाताप होतो आहे हे सारखे जाणवत होते व परत आपण असे करणार नाही, असेही ते म्हणत होते.

६. मुलांपेक्षा मुलींच्या मुलाखती घेताना काही मुली या जास्त आक्रमक दिसून आल्या. घाणेरडी भाषा, असभ्य वर्तन, वरिष्ठ अधिकाऱ्यांशी किंवा कर्मचाऱ्याशी उलट बोलणे असे जास्त प्रमाणात दिसून आले.

७. वेश्याव्यवसाय हया गुन्ह्यात सापडलेल्या मुलींची मुलाखत घेत असताना त्यांनी सांगितले की आम्ही स्वतःच्या मर्जीने इथे आलो नाहीत. तर काहींना दलालाने, सावत्र आईने, सावत्र बापाने किंवा नवऱ्याने पुण्यात येवुन विकले आहे. यामधील पाच–सहा जणींना मुलबाळ होते. आपल्या मुलांची आठवण काढुन त्यांच्या डोळयातून पाणी येत होते. तसेच कुंटणखान्यात त्यांना कसे वागवले, कसे अत्याचार केले गेले यासंबंधी त्यांनी आपले अनुभव सांगितले .

८. मुलाखती घेत असताना मी जेव्हा १४ वर्षाच्या एका मुलीची मुलाखत घेत होती. तेव्हा तिने सांगितले की माझ्याच वडीलांनी दारूच्या नशेत माझ्यावर बलात्कार केला म्हणून मी

त्यांना मारून टाकले. यात माझी काय चूक आहे. तिला बहीण – भाऊ कुणीही नव्हते. ती आपल्या वडीलांबरोबर राहात होती.

९. यामध्ये जसे दुखात्मक अनुभव आले तसेच काही गमतीदार अनुभवही आले. एका मुलीची मुलाखत घेत असताना ती प्रेम प्रकरणातून या संस्थेत आली होती. तिचे वय १६ होते. तर तिच्या प्रियकराचे वय २३ होते. मी तिला इतक्या लहान वयात प्रेमात का पडली असे सहज विचारले असता तिने सांगितले की "पिच्चर मध्ये असे दाखवतात की पिच्चरची हिरोईन 'सोला बरसकी' आहे. त्यांनी प्रेम केल तर चालत मग मी केल तर कुठे बिघडल".खर तरं यात तिची चूक नव्हती. चूक तिच्या वयाची व अशा चित्रपटांची होती की यामध्ये अशी कायद्यातील वयाविरूध्द प्रेमकथा दाखविली जाते.

१०. मुलांच्या व मुलींच्या मुलाखती घेतल्यानंतर त्यांच्या गुन्ह्याचे स्वरूप व गुन्ह्यांचा इतिहास बघण्यासाठी त्यांच्या केस फाईल बघण्यात आल्या त्या बघत असताना असे लक्षात आले की या केस फाईलमध्ये संबंधित मुला – मुलींची खाजगी माहीती व गुन्ह्याचा इतिहास फक्त लिहलेला होता. गुन्ह्यांचा प्रकार हा कलमांव्दारे दाखवला गेला होता. तिथल्या अधिकाऱ्यांना असे विचारले असता त्यांनी सांगितले की कुणाला त्यांनी केलेला गुन्हा समजु नये म्हणून असे केले आहे. जर लोकांना हा गुन्हा कळला तर समाजाचा त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलतो. कलमे साधारण कुणाला माहीत नसतात म्हणून जास्तीत जास्त गंभीर गुन्हा असेल तर तो कलमांव्दारे स्पष्ट केला जातो. फक्त गुन्ह्यांचे कारण व इतिहास लिखित स्वरूपात मांडला जातो.

# प्रकरण ५ – जमा केलेल्या माहितीचे सादरीकरण

**सारणी क्र. ५.१ निवडलेल्या नमुन्यातील मुलामुलींचे वयोगटानुसार विभाजन**

| वयोगट | मुले | मुली | एकुण |
|---|---|---|---|
| ७ वर्ष १ दिवस ते १३ वर्ष पूर्ण | २२ | २४ | ४६ |
| १३ वर्ष १ दिवस ते १७ वर्ष पूर्ण | ७८ | ७६ | १५४ |
| एकूण | १00 | १00 | २00 |

सुधारगृहात शिक्षेचे स्वरुप व कालावधी हा वयानुसार ठरत असतो. इंडीयन पीनल कोड कलम ८३ नुसार ७ ते १३ वर्षे वयांच्या मुलांवर कायदा सौम्य दृष्टीने पाहतो. म्हणुन वरीलप्रमाणे वयोगटाचे विभाजन करण्यात आले आहे.

वरील सारणीनुसार असे स्पष्ट होते की; मुला व मुलींमध्ये ७ वर्षे १ दिवस ते १३ वर्षे पुर्ण या वयोगटातील बालकांपेक्षा १३ वर्षे १ दिवस ते १७ वर्षे पुर्ण या बालकांचे प्रमाण बालगुन्हेगारीत जास्त दिसुन येते.

**सारणी क्र. ५.२ निवडलेल्या नमुन्यातील मुलामुलींचे शिक्षण पातळी नुसार विभाजन**

| शिक्षणाची पातळी | मुलांची संख्या | मुलींची संख्या | एकुण |
|---|---|---|---|
| शाळेत न गेलेले (निरक्षर) | २९ | १८ | ४७ |
| शाळेत न गेलेले परंतु थोडेफार लिहता –<br>वाचता येणारे | ०४ | ०३ | ०७ |
| इयत्ता १ ली ते ४ थी | २४ | २९ | ५३ |
| इयत्ता ५ वी ते ७ वी | २३ | २५ | ४८ |
| इयत्ता ८ वी ते १० वी | १४ | १८ | ३२ |
| इयत्ता १० वीच्या पुढे | ०६ | ०७ | १३ |
| एकूण | १०० | १०० | २०० |

वरील सारणी वरुन असे स्पष्ट होते की; निवडलेल्या नमुन्यात शाळेत गेलेल्या किंवा शाळा शिकत असलेल्या मुलामुलींची संख्या बालगुन्हेगारीत जास्त दिसुन येते. म्हणजेच आधुनिक समाजात बालकांकडुन गुन्हे घडु नयेत किंवा ते नियंत्रणात यावेत या दृष्टीने शाळेचा फारसा प्रभाव दिसुन येत नाही.

## सारणी क्र. ५.३ शिक्षणाची पातळी व मुलामुलींचे वयोगटानुसार विभाजन

| शिक्षणाची पातळी | मुले वयोगट | | मुली वयोगट | |
|---|---|---|---|---|
| | ७ वर्ष १ दिवस ते १३ वर्ष पूर्ण | १३ वर्ष १ दिवस ते १७ वर्ष पूर्ण | ७ वर्ष १ दिवस ते १३ वर्ष पूर्ण | १३ वर्ष १ दिवस ते १७ वर्ष पूर्ण |
| शाळेत न गेलेले (निरक्षर) | १२ | १७ | ०७ | ११ |
| शाळेत न गेलेली परंतु थोडेफार लिहता – वाचता येणारे | ०१ | ०३ | ०१ | ०२ |
| इयत्ता १ ली ते ४ थी | ०६ | १७ | ०९ | २० |
| इयत्ता ५ वी ते ७ वी | ०३ | २० | ०७ | १८ |
| इयत्ता ८ वी ते १० वी | ० | १३ | ० | १८ |
| इयत्ता १० वीच्या पुढे | ० | ०८ | ० | ०७ |
| एकूण | २२ | ७८ | २४ | ७६ |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की; मुलांमध्ये ७ वर्षे १ दिवस ते १३ वर्षे पुर्ण वयोगटात शाळेत न गेलेल्या मुलांचे प्रमाण बाल गुन्हेगारीत जास्त दिसून येते. तर १३ वर्षे १ दिवस ते १७ वर्षे पुर्ण या वयोगटात इयत्ता ५ वी ते ७ वी शाळा शिकलेल्या मुलांचे प्रमाण जास्त दिसून येते.

मुलींमध्ये ७ वर्षे १ दिवस ते १३ वर्षे पुर्ण वयोगटात इयत्ता १ ली ते ४ थी शाळा शिकलेल्या मुलींचे प्रमाण जास्त दिसून येते. तर १३ वर्षे १ दिवस ते १७ वर्षे पुर्ण या वयोगटात इयत्ता १ ली ते ४ थी शाळा शिकलेल्यांचे प्रमाण जास्त दिसून येते.

थोडक्यात मुलांपेक्षा मुली या जास्त शिकलेल्या दिसून येतात

**सारणी क्र. ५.४ मुले - वयोगटानुसार गुन्ह्याचा प्रकार**

| वयोगट | गुन्ह्याचा प्रकार | | | | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | साधी चोरी | घरफोडी | वाहनचोरी | दुकानफोडी | विनयभंग / छेडछाड | मारामारी / खुनाचा अयशस्वी प्रयत्न | अपहरण | बलात्कार | खून | एकापेक्षा अधिक गुन्हे | |
| ७ वर्ष १ दिवस ते १३ वर्ष पूर्ण | १४ | ०२ | ० | ० | ० | ०४ | ० | ० | ०१ | ०१ | २२ |
| १३ वर्ष १ दिवस ते १७ वर्ष पूर्ण | १२ | १५ | ०८ | ०५ | ०५ | ०६ | ०५ | ०७ | ०६ | ०९ | ७८ |
| **एकुण** | **२६** | **१७** | **०८** | **०५** | **०५** | **१०** | **०५** | **०७** | **०७** | **१०** | **१००** |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की; ७ वर्षे १ दिवस ते १३ वर्षे पुर्ण वयोगटातील मुलांकडून साधी चोरी जास्त प्रमाणात घडली आहे तसेच एक खुनही घडलेला दिसून येतो. १३ वर्षे १ दिवस ते १७ वर्षे पूर्ण वयोगटातील मुलांमध्ये साधी चोरी घरफोडी, वाहन चोरी व एकापेक्षा अधिक गुन्हे घडल्याचे जास्त दिसून येते.

## सारणी क्र. ५.५ मुली - वयोगटानुसार गुन्ह्याचे प्रकार

| वयोगट | गुन्ह्याचा प्रकार | | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | साधी चोरी | जबरी चोरी | वेश्याव्यवसाययातुन सोडवलेल्या अल्पवयीन मुली | प्रेमप्रकरण / गुप्त बालविवाह / पळुन जाण्याचा प्रयत्न | समलिंगी संबंध | मारामारी / आक्रमकता बंडखोरी | खुन | एकापेक्षा अधिक गुन्हे | |
| ७ वर्ष १ दिवस ते १३ वर्ष पूर्ण | १४ | ०२ | ० | ० | ० | ०६ | ० | ०२ | २४ |
| १३ वर्ष १ दिवस ते १७ वर्ष पूर्ण | १६ | ०३ | २९ | ०७ | ०४ | १० | ०३ | ०४ | ७६ |
| **एकुण** | **३०** | **०५** | **२९** | **०७** | **०४** | **१६** | **०३** | **०६** | **१००** |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की; ७ वर्षे १ दिवस ते १३ वर्षे पूर्ण वयोगटातील मुलींकडून साधी चोरी जास्त घडून आली आहे. त्याच प्रमाणे मारामारी आक्रमकता व बंडखोरीतही त्यांचे प्रमाण जास्त दिसून येते. १३ वर्षे १ दिवस ते १७ वर्षे पुर्ण वयोगटातील मुली या वेश्याव्यवसायात जास्त दिसून येतात. तर साधी चोरी मारामारी , एकापेक्षा अधिक गुन्हे व खुन या गुन्ह्यामध्येही त्यांचा सहभाग दिसून येतो.

मुलींमध्ये प्रेम प्रकरण , गुप्त बालविवाह, समलिंगी संबंध यां सारखे शारीरीक गुन्हे ही घडलेले दिसून येतात. ही बाव लक्षात घेण्याजोगी आहे.

## सारणी क्र.५.६ मुलांचे गुन्ह्याचे कारण व गुन्ह्याचा प्रकार दर्शविणारी सारणी

(फक्त एकाच कारणामुळे घडलेले गुन्हे)

| गुन्ह्याचे कारण | गुन्ह्याचा प्रकार | | | | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | साधी चोरी | घरफोडी | वाहनचोरी | दुकानफोडी | विनयभंग / छेडछाड | मारामारी / खुनाचा अयशस्वी प्रयत्न | अपहरण | बलात्कार | खुन | एकापेक्षा अधिक गुन्हे | |
| **आर्थिक कारणे** | ०६ | ०३ | ०२ | ०४ | ० | ०२ | ०१ | ० | ०१ | ०२ | २१ |
| **कौटुंबिक कारणे** | ०३ | ० | ० | ० | ० | ०४ | ० | ० | ०२ | ०१ | १० |
| **मानसशास्त्रीय कारणे** | ०३ | ० | ० | ० | ० | ०१ | ०१ | ० | ०२ | ०१ | ०८ |
| **वाईट संगत /समुह** | ०१ | ०४ | ०३ | ० | ३ | ० | ० | ०३ | ० | ०२ | १६ |
| **व्यसन/नशा घेणे** | ०२ | ० | ० | ० | ० | ० | ० | ०१ | ० | ० | ०३ |
| **चलचित्र/ नागरीकरण** | ० | ० | ० | ० | ०२ | ० | ० | ०१ | ०१ | ० | ०४ |
| **एकुण** | **१५** | **०७** | **०५** | **०४** | **०५** | **०७** | **०२** | **०५** | **०६** | **०६** | **६२** |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की; आर्थिक कारणांमुळे विविध गुन्हे घडताना दिसून येतात मात्र इतर कारणांच्या बाबतीत विशिष्ठ कारण व विशिष्ठ गुन्हा अशी संगत घडुन येते. मुलांमध्ये वा□ संगतीमधुन विनयभंग व बलात्कार यांसारखे लैंगिक गुन्हे घडल्याचे दिसून येते हि बाब लक्षात घेण्याजोगी आहे.

## सारणी क्र.५.७ मुलांचे गुन्ह्याचे कारण व गुन्ह्याचा प्रकार दर्शविणारी सारणी
## (एकापेक्षा अधिक कारणामुळे घडलेले गुन्हे)

| गुन्ह्याचे कारण | क्र | गुन्ह्याचा प्रकार | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | साधी चोरी | घरफोडी | वाहनचोरी | दुकानफोडी | मारामारी / खुनाचा अयशस्वी प्रयत्न | अपहरण | बलात्कार | खून | एकापेक्षा अधिक गुन्हे |
| एकापेक्षा अधिक कारणे | १ | अ + ब | अ +क | अ+ क | अ +क | ब +क | अ +क | ई+ क | ब +ड | अ +ब |
| | २ | अ +ब | अ +क | अ +क | | ब+ क | अ +क | ई+ क | | अ +क |
| | ३ | अ +ब | अ +क | अ +क | | ब +क | अ +क+ ब | | | क+ ड |
| | ४ | अ +ब | अ+ क | अ+ क | | | | | | अ+ ब +क |
| | ५ | अ +ब | अ +क | अ +क | | | | | | |
| | ६ | अ +ब | अ +क | अ+ क | | | | | | |
| | ७ | अ +क | अ +ब | | | | | | | |
| | ८ | क+ ब+ इ | | | | | | | | |
| | ९ | क+ ब + इ | | | | | | | | |
| | १० | अ+क +ब | | | | | | | | |
| | ११ | अ +क+ ब | | | | | | | | |
| | | ११ | ७ | ६ | १ | ३ | ३ | २ | १ | ४ |
| | | | | | | | | मुले एकुण-३८ | | |

अ) आर्थिक कारणे -२९ ब) कौटुंबिक कारणे - १८ क)वाईट संगत /समुह - २९
ड) मानसशास्त्रीय कारणे -३ इ)व्यसन/नशा घेणे-२ ई)चलचित्र /नागरीकरण -२

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की ; आर्थिक कारण व वाईट संगतीमुळे निम्यापेक्षा अधिक एकुण २० गुन्हे घडले आहेत. आर्थिक व कौटुंबिक कारणांमुळे ११ गुन्हे व कौटुंबिक व वाईट संगतीमुळे ८ गुन्हे घडल्याचे दिसून येते थोडक्यात आर्थिक, कौटुंबिक व वाईट संगत ही कारणे एकमेकांना परस्परावलंबी असल्याचे दिसून येते. गुन्हाच्या प्रकारात साधी चोरी घरफोडी व वाहन चोरी यांना इतर गुन्ह्याच्या तुलनेत एकापेक्षा अधिक कारणे जबाबदार असल्याचे दिसते.

सारणी क्र.५.८ मुलींचे गुन्ह्याचे कारण व गुन्ह्याचा प्रकार दर्शविणारी सारणी
(फक्त एकाच कारणामुळे घडलेले गुन्हे)

| गुन्ह्याचे कारण | गुन्ह्याचा प्रकार | | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | साधी चोरी | जबरी चोरी | वेश्याव्यवसाय यातुन सोडवलेल्या अल्पवयीन मुली | प्रेम प्रकरण /गुप्त बालविवाह/ पळुन जाण्याचा प्रयत्न | समलिंगी संबंध | मारामारी/ आक्रमकता बंडखोरी | खुन | एकापेक्षा अधिक गुन्हे | |
| आर्थिक कारणे | १५ | ०२ | ०४ | ० | ० | ०१ | ० | ० | २२ |
| कौटुंबिक कारणे | ०४ | ०१ | ११ | ०१ | ० | ०५ | ०१ | ०१ | २४ |
| मानसशास्त्रीय कारणे | ० | ० | ० | ० | ० | ०३ | ०१ | ०१ | ०५ |
| वाईट संगत | ०६ | ० | ०२ | ०३ | ०२ | ० | ० | ० | १३ |
| चलचित्र/ नागरीकरण | ० | ० | ० | ० | ०२ | ० | ० | ० | ०२ |
| एकुण | २५ | ०३ | १७ | ०४ | ००४ | ०९ | ०२ | ०२ | ६६ |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की; आर्थिक कारणांमुळे साधी चोरी जास्त घडली आहे. तर कौटुंबिक कारणांमुळे मुली वेश्याव्यवसायात ढकलल्याचे प्रमाण जास्त दिसून येते. मुलींमध्ये चलचित्राचा व अश्लिल साहित्याचा परिणाम यांमुळे समलिंगी संबंध दिसून आले ही एक धक्कादायक बाब येथे उघड झाली. व बालगुन्हेगारीच्या अगोदरच्या संशोधनात कोठेही याचा उल्लेख आम्हाला आढळला नाही.

## सारणी क्र.५.९ मुलींचे गुन्ह्याचे कारण व गुन्ह्याचा प्रकार दर्शविणारी सारणी
(एकापेक्षा अधिक कारणामुळे घडलेले गुन्हे)

| गुन्ह्याचे कारण | क्र | गुन्ह्याचा प्रकार | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | साधी चोरी | जबरी चोरी | वेश्याव्यवसाय यातुन सोडवलेल्या अल्पवयीन मुली | प्रेम प्रकरण / गुप्त बालविवाह/ पळुन जाण्याचा प्रयत्न | मारामारी/ आक्रमकता बंडखोरी | खुन | एकापेक्षा अधिक गुन्हे |
| एकापेक्षा अधिक कारणे | १ | अ+ ब | अ +ब | अ+ ब | ब+क+इ | ब+ क | क +ड | ब+ ड |
| | २ | अ+ क | अ +ब | अ +ब | ब+ड+इ | ब+ ड | | क +ब +इ |
| | ३ | अ +क | | अ+ ब | ब+ड+इ+क | ब +ड | | क +ब +इ |
| | ४ | अ +ब +क | | अ +ब | | ब +ड | | अ +ब +ड |
| | ५ | अ +ब +क | | अ+ ब | | ब+ ड | | |
| | ६ | | | अ +ब | | अ +ब +ड | | |
| | ७ | | | अ +ब | | अ +ब +ड | | |
| | ८ | | | अ +ब | | | | |
| | ९ | | | अ+ ब | | | | |
| | १० | | | ब +क | | | | |
| | ११ | | | ब+ क | | | | |
| | १२ | | | अ+ क | | | | |
| एकुण | | ५ | २ | १२ | ३ | ७ | १ | ४ |
| | | | | | | | | मुली एकुण – ३४ |

अ) आर्थिक कारणे -२० ब) कौटुंबिक कारणे - २९ क) वाईट संगत /समुह -१३
ड)मानसशास्त्रीय कारणे -१२ इ) चलचित्र/ नागरीकरण - ५

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की; मुलींमध्ये एकापेक्षा अधिक कारणांमुळे घडलेल्या गुन्ह्यात कौटुंबिक कारण हे प्रबळ दिसून येते. आर्थिक व कौटुंबिक या दोन्ही कारणांमुळे निम्याहून अधिक एकुण १७ गुन्हे घडल्याचे दिसून येते मुलींमध्ये वेश्या व्यवसायात ढकललेल्या व मारामारी, आक्रमकता, बंडखोरी इतर गुन्ह्याच्या तुलनेत एकापेक्षा अधिक कारणांमुळे घडलेले दिसून येते.

## सारणी क्र. ५.१० गुन्ह्याच्या प्रकारानुसार मुलामुलींचे विभाजन

| गुन्ह्याचा प्रकार | | मुलांची संख्या | मुलींची संख्या | एकुण |
|---|---|---|---|---|
| साधी चोरी | | २६ | ३० | ५६ |
| जबरी चोरी | घरफोडी, | ३० | ०५ | ३५ |
| | वाहनचोरी | | | |
| | दुकानफोडी | | | |
| वेश्याव्यवसाय यातुन सोडवलेल्या अल्पवयीन मुली | | ० | २९ | २९ |
| प्रेम प्रकरण /गुप्त बालविवाह/पळुन जाण्याचा प्रयत्न | | ० | ०७ | ०७ |
| समलिंगी संबंध | | ० | ०४ | ०४ |
| विनयभंग / छेडछाड | | ०५ | ० | ०५ |
| मारामारी / आक्रमकता बंडखोरी /खुनाचा अयशस्वी प्रयत्न | | १० | १६ | २६ |
| अपहरण | | ०५ | ० | ०५ |
| बलात्कार | | ०७ | ० | ०७ |
| खुन | | ०७ | ०३ | १० |
| एकापेक्षा अधिक गुन्हे | | १० | ०६ | १६ |
| **एकूण** | | **१००** | **१००** | **२००** |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की; मुलांची संख्या, जबरी चोरी, आक्रमकता, मारामारी अपहरण, बलात्कार, खुन व एकापेक्षा अधिक गुन्हा या गंभीर गुन्ह्यामध्ये जास्त दिसून येते. मुलींची संख्या साधी चोरी, वेश्याव्यवसाय व मारामारी, आक्रमकता यांमध्ये जास्त दिसून येते.

मुलांमध्ये प्रेमप्रकरण, बालविवाह व समलिंगी संबंध यांसारखे गुन्हे दिसून येत नाही अशा गुन्ह्यांना मुलीच बळी पडतात. हे समाजातील पुरुषप्रधानतेचे अप्रत्यक्ष परंतु दाहक सत्य समोर आले आहे.

## सारणी क्र. ५.११ मुले - शिक्षणाची पातळी व गुन्ह्याचा प्रकार दर्शविणारी सारणी.

| शिक्षणाची पातळी | गुन्ह्याचा प्रकार | | | | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | साधी चोरी | घरफोडी | वाहनचोरी | दुकानफोडी | विनयभंग / छेडछाड | मारामारी / खुनाचा अयशस्वी प्रयत्न | अपहरण | बलात्कार | खून | एकापेक्षा अधिक गुन्हे | |
| **शाळेत न गेलेली मुले** | १२ | ०६ | ०१ | ० | ० | ०४ | ०२ | ० | ०१ | ०३ | २९ |
| **शाळेत न गेलेली परंतु थोडेफार लिहता वाचता येणारी मुले** | ० | ०२ | ० | ०१ | ० | ० | ०१ | ० | ० | ० | ०४ |
| **इयत्ता १ ते ४ थी** | ०८ | ०५ | ० | ० | ०१ | ०३ | ०१ | ० | ०१ | ०५ | २४ |
| **इयत्ता ५ ते ७ वी** | ०४ | ० | ०५ | ०४ | ०३ | ० | ० | ०२ | ०३ | ०२ | २३ |
| **इयत्ता ८ ते १० वी** | ०२ | ०१ | ०२ | ० | ०१ | ०२ | ०१ | ०४ | ०१ | ० | १४ |
| **१० वी च्या पुढे** | ० | ० | ०३ | ० | ० | ०१ | ० | ०१ | ०१ | ० | ०६ |
| **एकुण** | **२६** | **१४** | **११** | **०५** | **०५** | **१०** | **०५** | **०७** | **०७** | **१०** | **१००** |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की; शाळेत न गेलेल्या मुलांकडून घरफोडी व साधी चोरी जास्त प्रमाणात घडली आहे. तर शाळेत जाणाऱ्या व शाळा शिकलेल्या मुलांकडून वाहनचोरी, खुन, एकापेक्षा अधिक गुन्हे, दुकानफोडी यांसारखे गंभीर गुन्हे व विनयभंग, छेडछाड व बलात्कार यांसारखे लैंगिक गुन्हे घडल्याचे दिसून येते ही बाब अतिशय चिंताजनक आहे.

### सारणी क्र. ५.१२ मुली – शिक्षणाची पातळी व गुन्ह्याचा प्रकार दर्शविणारी सारणी

| शिक्षणाचे पातळी | गुन्ह्याचा प्रकार | | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | साधी चोरी | जबरी चोरी | वेश्याव्यवसाययातुन सोडवलेल्या अल्पवयीन मुली | प्रेमप्रकरण /गुप्त बालविवाह/ पळुन जाण्याचा प्रयल | समलिंगी संबंध | मारामारी आक्रमकता बंडखोरी | खुन | एकापेक्षा अधिक गुन्हे | |
| शाळेत न गेलेल्या मुली | ०६ | ०२ | ०३ | ० | ० | ०४ | ०१ | ०२ | १८ |
| शाळेत न गेलेली परंतु थोडेफार लिहता वाचता येणा–या मुली | ०१ | ० | ०२ | ० | ० | ० | ० | ० | ०३ |
| इयत्ता १ ते ४ थी | ०९ | ०१ | ११ | ० | ०२ | ०४ | ० | ०२ | २९ |
| इयत्ता ५ ते ७ वी | ०८ | ०२ | ०४ | ०२ | ०२ | ०५ | ०२ | ० | २५ |
| इयत्ता ८ ते १० वी | ०४ | ० | ०६ | ०४ | ० | ०३ | ० | ०१ | १८ |
| १० वी च्या पुढे | ०२ | ० | ०३ | ०१ | ० | ० | ० | ०१ | ०७ |
| **एकुण** | **३०** | **०५** | **२९** | **०७** | **०४** | **१६** | **०३** | **०६** | **१००** |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की; शाळेत न गेलेल्या मुलींकडून साधी चोरी जास्त घडल्याचे दिसून येते. तर शाळेत गेलेल्या मुलींकडून वेश्या व्यवसाय, समलिंगी संबंध, प्रेम प्रकरण, गुप्त बालविवाह, मारामारी, आक्रमकता व खुन हे गुन्हे घडल्याचे दिसून येते. मात्र शाळेत न गेलेल्या मुलींकडून हे गुन्हे घडून न आल्याचे दिसते. ही बाब लक्षात घेण्याजोगी आहे.

## सारणी क्र. ५.१३ मुले - शिक्षणाची पातळी व गुन्ह्याचे कारण दर्शविणारी सारणी

| शिक्षणाची पातळी | गुन्ह्याचे कारण | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | आर्थिक कारणे | कौटुंबिक कारणे | मानसशास्त्रीय कारणे | वाईट संगत / समुह किंवा टोळी | व्यसन/ नशा घेणे | चलचित्र/ नागरीकरण | एकापेक्षा अधिक कारणे | |
| शाळेत न गेलेली मुले | १० | ०५ | ०३ | ०२ | ० | ०२ | ०७ | २९ |
| शाळेत न गेलेली परंतु थोडेफार लिहता वाचता येणारी मुलै | ० | ०१ | ०२ | ० | ० | ० | ०१ | ०४ |
| इयत्ता १ ते ४ थी | ०९ | ०१ | ० | ०४ | ०३ | ० | ०७ | २४ |
| इयत्ता ५ ते ७ वी | ० | ०३ | ० | ०७ | ० | ०१ | १२ | २३ |
| इयत्ता ८ ते १० वी | ०२ | ० | ०१ | ०२ | ० | ० | ०९ | १४ |
| १० वी च्या पुढे | ० | ० | ०२ | ०१ | ० | ०१ | ०२ | ०६ |
| **एकुण** | **२१** | **१०** | **०८** | **१६** | **०३** | **०४** | **३८** | **१००** |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की; शाळेत न गेलेल्या मुलांकडून आर्थिक कारणांमुळे जास्त गुन्हे घडले आहेत. तर शाळेत गेलेल्या मुलांकडून वाईट संगत, समुह व एका पेक्षा अधिक कारणांमुळे गुन्हे घडल्याचे दिसून येते. म्हणजेच मुलांना वाईट संगत लागण्यास शाळा हे प्रभावी माध्यम दिसून येते.

**सारणी क्र. ५.१४ मुली – शिक्षणाची पातळी व गुन्ह्याचे कारण दर्शविणारी सारणी.**

| शिक्षणाचे पातळी | गुन्ह्याचे कारण | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | आर्थिक कारणे | कौटुंबिक कारणे | मानसशास्त्रीय कारणे | वाईट संगत / समुह किंवा टोळी | चलचित्र/ नागरीकरण | एकापेक्षा अधिक कारणे | |
| शाळेत न गेलेल्या मुली | ०३ | ०२ | ० | ०२ | ० | ११ | १८ |
| शाळेत न गेलेली परंतु थोडेफार लिहता वाचता येणा–या मुली | ०१ | ० | ० | ०१ | ० | ०१ | ०३ |
| इयत्ता १ ते ४ थी | ०६ | १० | ०३ | ०४ | ०१ | ०५ | २९ |
| इयत्ता ५ ते ७ वी | ०८ | ०५ | ०२ | ०२ | ० | ०८ | २५ |
| इयत्ता ८ ते १० वी | ०४ | ०५ | ० | ०३ | ०१ | ०५ | १८ |
| १० वी च्या पुढे | ० | ०२ | ० | ०१ | ० | ०४ | ०७ |
| एकुण | २२ | २४ | ०५ | १३ | ०२ | ३४ | १०० |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की; शाळेत न गेलेल्या मुलींकडून एकापेक्षा अधिक कारणांमुळे जास्त गुन्हे घडले आहेत. तर शाळेत गेलेल्या मुलींकडून कौटुंबिक, वाईट संगत व आर्थिक कारणांमुळे जास्त गुन्हे घडल्याचे दिसून येते. मुलांच्या तुलनेत बालगुन्हेगारीत मुली या जास्त साक्षर दिसून येतात.

### सारणी क्र. ५.१५ कौटुंबिक पार्श्र्वभुमीनुसार मुलामुलींचे विभाजन

| कौटुंबिक पार्श्वभुमी | मुलांची संख्या | मुलींची संख्या | एकुण |
|---|---|---|---|
| आई/वडील मृत्यु | २३ | १९ | ४२ |
| घटस्फोट | ०४ | ०७ | ११ |
| दोघेही कालवश | १० | ०८ | १८ |
| वडील/आई सावत्र | १२ | २८ | ४० |
| आई/वडीलांने घर सोडले | ०४ | ०५ | ०९ |
| पुर्णपणे अनाथ (कुटुंब घराचा पत्ता माहीत नाही) | ०६ | ०२ | ०८ |
| जन्मदाते आई-वडील दोन्ही एकत्र राहतात | ४१ | २५ | ६६ |
| विवाह झालेले | ० | ०६ | ०६ |
| एकुण | १०० | १०० | २०० |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की; मुलामुलींमध्ये भग्न कुटुंबाची संख्या जास्त दिसून येते. (वडीलांचा/आईचा मृत्यु + घटस्फोट + दोघेही कालवश + सावत्रपणा + आईवडीलांनी घर सोडले) यांचे एकत्रित प्रमाण बघता ही संख्या निम्यापेक्षा जास्त दिसून येते.

बालगुन्हेगारीत मुलांपेक्षा मुली या कौटुंबिक भग्नतेला जास्त बळी पडलेल्या दिसून येतात.

## सारणी क्र. ५.१६ मुळ निवासानुसार मुलामुलींचे विभाजन

| मुळ निवास | मुलांची संख्या | मुलींची संख्या | एकूण |
|---|---|---|---|
| पुणे जिल्ह्यातील खेडेगाव | ०६ | २१ | २७ |
| पुणे शहर | ६७ | ४३ | ११० |
| इतर जिल्ह्यातील खेडेगाव | ०२ | ०३ | ५ |
| इतर शहर | १४ | ०३ | १७ |
| महाराष्ट्राव्यतिरिक्त इतर राज्ये | ११ | ३० | ४१ |
| **एकूण** | **१००** | **१००** | **२००** |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की; निवडलेल्या नमुन्यात मुलांमध्ये पुणे शहर मुळ निवास असलेल्यांचे प्रमाण जास्त आहे. तर त्या खालोखाल इतर शहरे व महाराष्ट्र व्यतिरिक्त इतर राज्यातुन आलेल्या मुलांचे प्रमाण जास्त आहे. मुलींमध्येही पुणे शहर मुळ निवास असलेल्यांचे प्रमाण जास्त आहे. त्या खालोखाल महाराष्ट्रा व्यतिरिक्त इतर राज्य व पुणे जिल्ह्यातील खेडे गावातून आलेल्या मुलींची संख्या जास्त आहे.

**सारणी क्र. ५.१७ छंदांच्या प्रकारानुसार मुलामुलींचे विभाजन**

| छंदाचे प्रकार | मुलांची संख्या | मुलींची संख्या | एकूण |
|---|---|---|---|
| अभ्यास करणे | १२ | १७ | २९ |
| अवांतर वाचन | ०६ | ०९ | १५ |
| खेळणे | १८ | १४ | ३२ |
| टि.व्ही.पाहणे | ४८ | ३९ | ८७ |
| काम करणे (घरातील व प्रशिक्षण सदर्भातील) | ०३ | १७ | २० |
| कोणतेच छंद नाही | १३ | ०४ | १७ |
| एकूण | १०० | १०० | २०० |

वरील सारणीवरुन स्पष्ट होते की; मुलामुलींमध्ये टी.व्ही. पाहणे हा छंद असलेल्या बालकांचे प्रमाण जास्त आहे. त्या खालोखाल मुलांमध्ये खेळणे व मुलींमध्ये काम करणे याचे आहे.

## सारणी क्र. ५.१८ कुटुंबांच्या वार्षिक उत्पन्नानुसार मुलामुलींचे विभाजन

| कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न | मुलांची संख्या | मुलींची संख्या | एकुण |
|---|---|---|---|
| **कोणतेच उत्पन्न नाही** | १५ | ०९ | २४ |
| **१०००० पेक्षा कमी** | २४ | ४४ | ६८ |
| **१०००१ ते २००००** | २७ | १९ | ४६ |
| **२०००१ ते ३००००** | २० | २१ | ४१ |
| **३०००१ च्या पूढे** | १४ | ०७ | २१ |
| **एकूण** | **१००** | **१००** | **२००** |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की; मुलांमध्ये १०००१ ते २०००० उत्पन्न असलेल्या कुटुंबातील बालकांची संख्या जास्त आहे. तर मुलींमध्ये १०००१ पेक्षा कमी उत्पन्न असलेल्यांची संख्या जास्त आहे. म्हणजेच बालगुन्हेगारीत कुटुंबाचे उत्पन्न सर्व साधारण असलेल्या मुलामुलींकडून जास्त गुन्हे घडले आहे.

कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ३०००१ च्या पुढे असलेल्या कुटुंबातील बालकांकडून काही गुन्हे घडले आहेत. ही बाव लक्षात घेण्याजोगी आहे.

**सारणी क्र. ५.१९ सुधारगृहातील कालावधी नुसार मुलामुलींचे विभाजन**

| कालावधी | मुलांची संख्या | मुलींची संख्या | एकूण |
|---|---|---|---|
| १ दिवस ते ३० दिवस | ०४ | १९ | २३ |
| १ महिना ते १२ महिने | १७ | १४ | ३१ |
| १ वर्षे ते ३ वर्षे | २५ | ३२ | ५७ |
| ३ वर्षे ते ५ वर्षे | ११ | १३ | २४ |
| ५ वर्षे ते ७ वर्षे | १८ | ११ | २९ |
| ७ वर्षे ते ९ वर्षे | १५ | ०९ | २४ |
| ९ वर्षापेक्षा अधिक | १० | ०२ | १२ |
| **एकूण** | **१००** | **१००** | **२००** |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की; मुलांमध्ये १ वर्षे ते ३ वर्षे वास्तव्य असणाऱ्यांची संख्या जास्त आहे. तर मुलींमध्येही १ वर्षे ते ३ वर्षे वास्तव्य असणाऱ्यांची संख्या जास्त आहे.

### सारणी क्र. ५.२० कौटुंबिक पार्श्र्वभुमीनुसार मुलामुलींच्या वयोगटाचे विभाजन

| कौटुंबिक पार्श्र्वभुमी | मुले वयोगट | | | | मुली वयोगट | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ७ वर्ष १ दिवस ते १३ वर्ष पूर्ण | १३ वर्ष १ दिवस ते १७ वर्ष पूर्ण | एकुण | | ७ वर्ष १ दिवस ते १३ वर्ष पूर्ण | १३ वर्ष १ दिवस ते १७ वर्ष पूर्ण | एकुण | |
| आई/वडील मृत्यु | ०४ | १९ | २३ | | ०३ | १६ | १९ | ४२ |
| घटस्फोट | ०३ | ०१ | ४ | | ०२ | ०५ | ०७ | ११ |
| दोघेही कालवश | ० | १० | १० | | ०२ | ०६ | ०८ | १८ |
| वडील/आई सावत्र | ०६ | ०६ | १२ | | ०१ | २७ | २८ | ४० |
| आई/वडीलांने घर सोडले | ० | ०४ | ०४ | | ०२ | ०३ | ०५ | ०९ |
| पुर्णपणे अनाथ (कुटुंब घराचा पत्ता माहीत नाही) | ०४ | ०२ | ०६ | | ० | ०२ | ०२ | ०८ |
| जन्मदाते आई-वडील दोन्ही एकत्र राहतात | ०५ | ३६ | ४१ | | १४ | ११ | २५ | ६६ |
| विवाह झालेले | ० | ० | ० | | ० | ०६ | ०६ | ०६ |
| एकुण | २२ | ७८ | १०० | | २४ | ७६ | १०० | २०० |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की; मुलांमध्ये ७ वर्षे १ दिवस ते १३ वर्षे पुर्ण वयोगटात जन्मदाते आईवडील एकत्र राहत असलेल्यांची संख्या ५ आहे तर (वडील/आईचा मृत्यु, घटस्फोट, सावत्र आईवडील) या भग्न कुटुंबातून आलेल्यांची संख्या १३ इतकी आहे. १३ वर्षे १ दिवस ते १७ वर्षे पुर्ण वयोगटात आईवडील एकत्र असलेल्यांची संख्या ३६ आहे. तर (वडील/आईचा मृत्यु, घटस्फोट, दोघेही कालवश, सावत्रता, वडील किंवा आईने घर सोडले ) या भग्न कुटुंबातून आलेल्यांची संख्या ४० इतकी आहे.

मुलींमध्ये ७ वर्षे १ दिवस ते १३ वर्षे पुर्ण वयोगटात जन्मदाते आईवडील एकत्र असलेल्यांची संख्या १४ आहे. तर भग्नकुटुंबातून आलेल्यांची संख्या १0 आहे. तर या उलट १३ वर्षे ते १७ वर्षे पुर्ण या वयोगटात आई वडील एकत्र असलेल्यांची संख्या ११ आहे तर भग्न कुटुंबातून आलेल्यांची संख्या (वडील / आईचा मृत्यु, घटस्फोट, दोघेही कालवश, सावत्रता, वडील किंवा आईने घर सोडले ) ५७ इतकी आहे. म्हणजेच बाल गुन्हेगारीत भग्न कुटुंबातून आलेल्या मुलामुलींची संख्या जास्त दिसून येते.

## सारणी क्र. ५.२१ कुटुंबाच्या वार्षिक उत्पन्नानुसार मुलामुलींच्या वयोगटाचे विभाजन

| कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न | मुले वयोगट | | | | मुली वयोगट | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ७ वर्ष १ दिवस ते १३ वर्ष पूर्ण | १३ वर्ष १ दिवस ते १७ वर्ष पूर्ण | एकुण | | ७ वर्ष १ दिवस ते १३ वर्ष पूर्ण | १३ वर्ष १ दिवस ते १७ वर्ष पूर्ण | एकुण | |
| **कोणतेच उत्पन्न नाही** | ०३ | १२ | १५ | | ०६ | ०३ | ०९ | २४ |
| **१०००० पेक्षा कमी** | १३ | ११ | २४ | | ०५ | ३९ | ४४ | ६८ |
| **१०००१ ते २००००** | ०४ | २३ | २७ | | ० | १९ | १९ | ४६ |
| **२०००१ ते ३००००** | ० | २० | २० | | ०८ | १३ | २१ | ४१ |
| **३०००१ च्या पूढे** | ०२ | १२ | १४ | | ०५ | ०२ | ०७ | २१ |
| **एकुण** | **२२** | **७८** | **१००** | | **२४** | **७६** | **१००** | २०० |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की; मुलांमध्ये ७ वर्षे १ दिवस ते १३ वर्षे पुर्ण वयोगटात दहा हजार पेक्षा कमी उत्पन्न असलेल्या मुलांची संख्या जास्त आहे. तर १३ वर्षे १ दिवस ते १७ वर्षे पुर्ण या वयोगटात १०००१ ते २०००० उत्पन्न असलेल्या मुलांची संख्या जास्त आहे.

मुलींमध्ये ७ वर्षे १ दिवस ते १३ वर्षे पुर्ण वयोगटात २०००१ ते ३०००० उत्पन्न असलेल्यांची संख्या जास्त आहे तर १३ वर्षे १ दिवस ते १७ वर्षे पुर्ण वयोगटात १०००० पेक्षा कमी उत्पन्न असलेल्यांची संख्या जास्त आहे.

## सारणी क्र. ५.२२ सुधार गृहातील कालावधी नुसार मुलामुलींच्या वयोगटाचे विभाजन

| कालावधी | मुले वयोगट | | | | मुली वयोगट | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ७ वर्ष १ दिवस ते १३ वर्ष पूर्ण | १३ वर्ष १ दिवस ते १७ वर्ष पूर्ण | एकूण | | ७ वर्ष १ दिवस ते १३ वर्ष पूर्ण | १३ वर्ष १ दिवस ते १७ वर्ष पूर्ण | एकूण | |
| १ दिवस ते ३० दिवस | ०३ | ०१ | ०४ | | ०१ | १८ | १९ | २३ |
| १ महिना ते १२ महिने | ०४ | १३ | १७ | | १२ | ०५ | १७ | ३४ |
| १ वर्षे ते ३ वर्षे | १३ | १२ | २५ | | ०४ | ३० | ३४ | ५७ |
| ३ वर्षे ते ५ वर्षे | ०२ | ०९ | ११ | | ०४ | ०९ | १३ | २४ |
| ५ वर्षे ते ७ वर्षे | ० | १८ | १८ | | ०३ | ०८ | ०९ | २७ |
| ७ वर्षे ते ९ वर्षे | ० | १५ | १५ | | ० | ०९ | ०९ | २४ |
| ९ वर्षापेक्षा अधिक | ० | १० | १० | | ० | ०२ | ०२ | १२ |
| **एकूण** | **२२** | **७८** | **१००** | | **२४** | **७६** | **१००** | **२००** |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की; मुलांमध्ये ७ वर्षे १ दिवस ते १३ वर्षे पुर्ण वयोगटात १ वर्षे ते ३ वर्षे सुधार गृहात कालावधी असलेल्यांची संख्या जास्त आहे. १३ वर्षे १ दिवस ते १७ वर्षे पुर्ण या वयोगटात ५ वर्षे ते ७ वर्षे सुधारगृहात कालावधी असलेल्यांची संख्या जास्त आहे.

मुलींमध्ये ७ वर्षे ते १३ वर्षे वयोगटात १ महिना ते १२ महिने सुधारगृहात कालावधी असलेल्यांची संख्या जास्त आहे. ते १३ वर्षे १ दिवस ते १७ वर्षे पुर्ण वयोगटात १ वर्षे ते ३ वर्षे सुधार गृहात कालावधी असलेल्यांची संख्या जास्त आहे.

यावरुन असे स्पष्ट होते की ७ वर्षे ते १३ वर्षे वयोगटातील बालकांकडे कायदा सौम्यदृष्टीने पाहतो व त्यांना मिळणाऱ्या शिक्षेचे स्वरुप हे सौम्य असते. म्हणुन त्यांना लवकर त्यांच्या घरी पाठविण्यात येते मग त्यांना केलेला गुन्हा कितीही गंभीर असो. (सारणी क्र. ५.४ मध्ये वयोगटानुसार गुन्ह्याचा प्रकार नमुद केला आहे)

### सारणी क्र.५.२३ गुन्ह्याच्या कारणांचे मुलामुलींच्या वयोगटानुसार विभाजन

| गुन्ह्यांची कारणे | मुले वयोगट | | | | मुली वयोगट | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ७ वर्ष १ दिवस ते १३ वर्ष पूर्ण | १३ वर्ष १ दिवस ते १७ वर्ष पूर्ण | एकुण | | ७ वर्ष १ दिवस ते १३ वर्ष पूर्ण | १३ वर्ष १ दिवस ते १७ वर्ष पूर्ण | एकुण | |
| आर्थिक कारणे | ०५ | १६ | २१ | | ०९ | १३ | २२ | ४३ |
| कौटुंबिक कारणे | ०३ | ०७ | १० | | ०७ | १७ | २४ | ३४ |
| मानसशास्त्रीय कारणे | ० | ०८ | ०८ | | ०१ | ०४ | ०५ | १३ |
| वाईट संगत / समुह किंवा टोळी | ०४ | १२ | १६ | | ० | १३ | १३ | २९ |
| व्यसन/नशा घेणे | ० | ०३ | ०३ | | ० | ० | ० | ०३ |
| चलचित्र/औद्यौगिकरण | ०१ | ०३ | ०४ | | ० | ०२ | ०२ | ०६ |
| एकापेक्षा अधिक कारणे | ०९ | २९ | ३८ | | ०७ | २७ | ३४ | ७२ |
| एकुण | २२ | ७८ | १०० | | २४ | ७६ | १०० | २०० |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की; मुलांमध्ये ७ वर्षे १ दिवस ते १३ वर्षे पुर्ण वयोगटात एकापेक्षा अधिक कारणांमुळे अधिक गुन्हे घडले आहेत. तर १३ वर्षे १ दिवस ते १७ वर्षे पुर्ण वयोगटातही एकापेक्षा अधिक गुन्हे घडले आहेत. मुलींमध्ये ७ वर्षे १ दिवस ते १३ वर्षे पुर्ण वयोगटात आर्थिक कारणांमुळे जास्त गुन्हे घडले आहेत तर १३ वर्षे १ दिवस ते १७ वर्षे पुर्ण वयोगटात एकापेक्षा अधिक कारणांमुळे गुन्हे घडले आहेत. म्हणजेच मुलामुलींमध्ये १३ वर्षे १ दिवस ते १७ वर्षे पुर्ण वयोगटात एकापेक्षा अधिक कारणांमुळे अधिक गुन्हे घडल्याचे दिसून येते.

## सारणी क्र. ५.२४ गुन्ह्याची कारणे व मुलामुलींचे कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न

| गुन्ह्यांची कारणे | मुले - कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न | | | | | मुली - कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | कोणतेच उत्पन्न नाही | १0000 पेक्षा कमी | १000१ ते २0000 | २000१ ते ३0000 | ३000१ च्या पूढे | कोणतेच उत्पन्न नाही | १0000 पेक्षा कमी | १000१ ते २0000 | २000१ ते ३0000 | ३000१ च्या पूढे | |
| आर्थिक कारणे | 0३ | 0८ | 0६ | 0४ | 0 | 0३ | 0२ | 0७ | 0८ | 0२ | ४३ |
| कौटुंबिक कारणे | 0 | 0 | 0२ | 0८ | 0 | 0 | १५ | 0२ | 0६ | 0१ | ३४ |
| मानसशास्त्रीय कारणे | 0 | 0३ | 0३ | 0 | 0२ | 0 | 0३ | 0 | 0२ | 0 | १३ |
| वाईट संगत / समुह किंवा टोळी | 0४ | 0३ | 0५ | 0 | 0४ | 0१ | 0९ | 0१ | 0 | 0२ | २९ |
| व्यसन/नशा घेणे | 0२ | 0 | 0 | 0 | 0१ | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0३ |
| चलचित्र/नागरीकरण | 0 | 0 | 0 | 0२ | 0२ | 0 | 0 | 0 | 0२ | 0 | 0६ |
| एकापेक्षा अधिक कारणे | 0६ | १0 | ११ | 0६ | 0५ | 0५ | १५ | 0९ | 0३ | 0२ | ७२ |
| एकूण | १५ | २४ | २७ | २0 | १४ | 0९ | ४४ | १९ | २१ | 0७ | २00 |

वरील सारणीवरुन स्पष्ट होते की; मुलांमध्ये आर्थिक कारणांमुळे घडलेल्या गुन्ह्यात १000१ पेक्षा कमी उत्पन्न असलेले कौटुंबिक कारणांमुळे घडलेल्या गुन्ह्यात २000१ ते ३0000 उत्पन्न असलेले तर एकापेक्षा अधिक कारणांमुळे घडलेल्या गुन्ह्यात १000१ पेक्षा कमी व १000१ ते २0000 उत्पन्न असलेल्या बालकांची संख्या जास्त आहे.

मुलींमध्ये आर्थिक कारणांमुळे घडलेल्या गुन्ह्यात २000१ ते ३0000 उत्पन्न असलेल्या मुलींची संख्या जास्त आहे. तर कौटुंबिक व वाईट संगतीमुळे घडलेल्या गुन्ह्यात १000१ पेक्षा कमी उत्पन्न असलेल्या मुलींची संख्या जास्त आहे.

थोडक्यात अनेक मुलामुलींची कुटुंबाची आर्थिक स्थिती चांगली असुनही त्यांच्याकडुन आर्थिक कारणांमुळे गुन्हे घडल्याचे दिसून येते.

### सारणी क्र. ५.२५ मुळ निवासानुसार मुलामुलींचे कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न दर्शविणारी सारणी

| मुळ निवास | मुले- कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न | | | | | | मुली- कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | कोणतेच उत्पन्न नाही | १0000 पेक्षा कमी | १000१ ते २0000 | २000१ ते ३0000 | ३000१ च्या पूढे | | कोणतेच उत्पन्न नाही | १0000 पेक्षा कमी | १000१ ते २0000 | २000१ ते ३0000 | ३000१ च्या पूढे | |
| पुणे जिल्ह्यातील खेडेगाव | 0 | 0५ | 0 | 0१ | 0 | | 0८ | १0 | 0 | 0१ | 0२ | २७ |
| पुणे शहर | 0२ | १७ | २२ | १६ | १0 | | 0१ | १३ | 0९ | २0 | 0 | ११0 |
| इतर जिल्ह्यातील खेडेगाव | 0 | 0२ | 0 | 0 | 0 | | 0 | 0 | 0 | 0 | 0३ | 0५ |
| इतर शहर | १३ | 0 | 0१ | 0 | 0 | | 0 | 0२ | 0 | 0 | 0१ | १७ |
| महाराष्ट्राव्यतिरिक्त इतर राज्ये | 0 | 0 | 0४ | 0३ | 0४ | | 0 | १९ | १0 | 0 | 0१ | ४१ |
| एकुण | १५ | २४ | २७ | २0 | १४ | | 0९ | ४४ | १९ | २१ | 0७ | २00 |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की; मुलांमध्ये पुणे जिल्ह्यातील खेडे गावातून आलेल्यांमध्ये १000१ पेक्षा कमी उत्पन्न असलेल्या बालकांची संख्या जास्त आहे. तर पुणे शहरातील बालकांमध्ये कुटुंबाचे वेगवेगळे वार्षिक उत्पन्न असलेल्या कुटुंबामधुन आलेल्यांची संख्या जास्त आहे. सर्वात लक्ष वेधण्याजोगी बाब म्हणजे इतर शहरातून आलेल्या बालकांचे कुटुंबाचे कोणतेच उत्पन्न आढळत नाही. याचा अर्थ ही बालके अपुऱ्या आर्थिक गरजा पुर्ण करण्यासाठी पुण्यात येत असल्याचे स्पष्ट होते व यातुनच पुढे बालगुन्हेगार बनल्याचे दिसते.

मुलींमध्ये पुणे जिल्ह्यातील खेडेगावातून आलेल्या मुलींचे कुटुंबाचे कोणतेच उत्पन्न नसलेल्या मुलींची संख्या जास्त आहे तर पुणे शहरात वास्तव्य असलेल्यांमध्ये विविध उत्पन्न गट असणाऱ्या कुटुंबाचा समावेश दिसून येतो. महाराष्ट्रा व्यतिरिक्त इतर राज्यातून आलेल्या मुलींमध्ये १०००१ पेक्षा कमी कौटुंबिक उत्पन्न असलेल्या मुलींचा समावेश दिसून येतो म्हणजेच या मुली आपल्या आर्थिक गरजांपोटी पुण्यात आलेल्या दिसून येतात.

## सारणी क्र. ५.२६ कौटुंबिक पार्श्र्वभुमीनुसार मुलामुलींचे कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न दर्शविणारी सारणी.

| कौटुंबिक पाश्वभुमी | मुले- कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न | | | | | मुली- कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | कोणतेच उत्पन्न नाही | १0000 पेक्षा कमी | १000१ ते २0000 | २000१ ते ३0000 | ३000१ च्या पूढे | कोणतेच उत्पन्न नाही | १0000 पेक्षा कमी | १000१ ते २0000 | २000१ ते ३0000 | ३000१ च्या पूढे | |
| आई/वडील मृत्यु | 0३ | १२ | 0५ | 0३ | 0 | 0४ | 0२ | १३ | 0 | 0 | ४२ |
| घटस्फोट | 0 | 0 | 0 | 0 | 0४ | 0 | 0५ | 0२ | 0 | 0 | ११ |
| दोघेही कालवश | 0५ | 0५ | 0 | 0 | 0 | 0३ | 0२ | 0३ | 0 | 0 | १८ |
| वडील/आई सावत्र | 0१ | 0६ | 0४ | 0१ | 0 | 0 | १४ | 0१ | १२ | 0१ | ४0 |
| आई/वडीलांने घर सोडले | 0 | 0 | 0४ | 0 | 0 | 0 | 0२ | 0 | 0३ | 0 | 0९ |
| पुर्णपणे अनाथ (कुटुंब घराचा पत्ता माहीत नाही) | 0६ | 0 | 0 | 0 | 0 | 0२ | 0 | 0 | 0 | 0 | 0८ |
| जन्मदाते आई-वडील दोन्ही एकत्र राहतात | 0 | 0१ | १४ | १६ | १0 | 0 | १९ | 0 | 0 | 0६ | ६६ |
| विवाह झालेले | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0६ | 0 | 0६ |
| एकुण | १५ | २४ | २७ | २0 | १४ | 0९ | ४४ | १९ | २१ | 0७ | २00 |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की; २00 पैकी ६६ बालके ही जन्मदाते आईवडील एकत्र राहत असलेली व काहीतरी उत्पन्न गट असलेली आहेत. तर पहिल्या ५ गटात बघता एकुण बालकांची संख्या १२0 म्हणजे निम्माहून अधिक आहे. तर त्यांचा उत्पन्न गट २0000 च्या आतील दिसून येतो म्हणजेच कौटुंबिक भग्नता व त्याला लागून आर्थिक कमतरता हे कारण एकमेकांशी संलग्न असल्याचे दिसून येते.

## सारणी क्र. ५.२७ गुन्ह्याच्या प्रकारानुसार मुलामुलींचे कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न

| गुन्हयाचा प्रकार | | मुले- कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न | | | | | मुली- कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कोणतेच उत्पन्न नाही | १०००० पेक्षा कमी | १०००१ ते २०००० | २०००१ ते ३०००० | ३०००१ च्या पूढे | कोणतेच उत्पन्न नाही | १०००० पेक्षा कमी | १०००१ ते २०००० | २०००१ ते ३०००० | ३०००१ च्या पूढे | |
| साधी चोरी | | ०९ | ११ | ०३ | ०२ | ०१ | ०१ | ०८ | १४ | ०७ | ० | ५६ |
| जबरी चोरी | घरफोडी | ०३ | ०६ | ०५ | ० | ० | | | | | | |
| | वाहनचोरी | ० | ०४ | ०२ | ०३ | ०२ | ०१ | ०४ | ० | ० | ० | ३५ |
| | दुकानफोडी | ०१ | ० | ०४ | ० | ० | | | | | | |
| वेश्याव्यवसाय | | ० | ० | ० | ० | ० | ० | २६ | ०३ | ० | ० | २९ |
| प्रेम प्रकरण /गुप्त बालविवाह/ पळुन जाण्याचा प्रयत्न | | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ०५ | ०२ | ०७ |
| समलिंगी संबंध | | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ०३ | ०१ | ०४ |
| विनयभंग / छेडछाड | | ० | ० | ० | ०२ | ०३ | ० | ० | ० | ० | ० | ०५ |
| मारामारी / आक्रमकता बंडखोरी / खुनाचा अयशस्वी प्रयत्न | | ० | ० | ०४ | ०६ | ० | ०७ | ०३ | ०२ | ०४ | ० | २६ |
| अपहरण | | ० | ०१ | ० | ० | ०४ | ० | ० | ० | ० | ० | ०५ |
| बलात्कार | | ० | ० | ०२ | ०१ | ०४ | ० | ० | ० | ० | ० | ०७ |
| खुन | | ० | ०२ | ०१ | ०४ | ० | ० | ०१ | ० | ०२ | ० | १० |
| एकापेक्षा अधिक गुन्हे | | ०२ | ० | ०६ | ०२ | ० | ० | ०२ | ० | ० | ०४ | १६ |
| **एकूण** | | **१५** | **२४** | **२७** | **२०** | **१४** | **०९** | **४४** | **१९** | **२१** | **०७** | **२००** |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की; मुलांमध्ये साधी चोरी व जबरी चोरी हे गुन्हे कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न साधारण असलेल्या मुलांकडून घडले आहे. मात्र यात कोणतेच उत्पन्न नसलेल्या कुटुंबातील मुले जास्त दिसून येत नाहीत ही बाब लक्षात घेण्याजोगी आहे याचा अर्थ एकतर या मुलांनी चैनीसाठी किंवा

पैशाच्या हव्यासापोटी चोरी केल्याचे दिसून येते तसेच मारामारी, आक्रमकता, खुनाचा प्रयत्न, खुन, बलात्कार व अपहरण यांसारखे गंभीर गुन्हे हे चांगले उत्पन्न असलेल्यांनी केलेले आहेत.

तसेच मुलींमध्ये वेश्याव्यवसायात ढकललेल्यांमध्ये १0000 पेक्षा कमी व १000१ ते २0000 उत्पन्न गट असलेल्या मुली दिसुन आल्या आहेत. म्हणजेच कुटुंबाचे उत्पन्न बऱ्यापैकी असुनही या मुली वेश्याव्यवसायात ढकललेल्या दिसुन येतात.

### सारणी क्र.५.२८ मुले - सुधारगृहातील कालावधी व गुन्ह्याचा प्रकार

| कालावधी | गुन्ह्यांचा प्रकार | | | | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | साधी चोरी | घरफोडी | वाहनचोरी | दुकानफोडी | विनयभंग / छेडछाड | मारामारी / खुनाचा अयशस्वी प्रयत्न | अपहरण | बलात्कार | खून | एकापेक्षा अधिक गुन्हे | |
| १ दिवस ते ३० दिवस | ०२ | ० | ० | ० | ० | ० | ०२ | ० | ० | ० | ०४ |
| १ महिना ते १२ महिने | १४ | ० | ० | ० | ० | ०२ | ० | ०१ | ० | ० | १७ |
| १ वर्षे ते ३ वर्षे | ०१ | ० | ०४ | ०२ | ०५ | ०६ | ० | ० | ०३ | ०४ | २५ |
| ३ वर्षे ते ५ वर्षे | ०९ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ०२ | ० | ११ |
| ५ वर्षे ते ७ वर्षे | ० | ०८ | ०३ | ०३ | ० | ०२ | ०२ | ० | ० | ० | १८ |
| ७ वर्षे ते ९ वर्षे | ० | ०३ | ०१ | ० | ० | ० | ०१ | ०४ | ० | ०६ | १५ |
| ९ वर्षापेक्षा अधिक | ० | ०६ | ० | ० | ० | ० | ० | ०२ | ०२ | ० | १० |
| **एकूण** | **२६** | **१७** | **०८** | **०५** | **०५** | **१०** | **०५** | **०७** | **०७** | **१०** | **१००** |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की; साधी चोरी, घरफोडी, वाहनचोरी या गुन्ह्यांमध्ये असलेल्या बालकांचा सुधारगृहातील कालावधी जास्त असल्याची कारणे म्हणजे त्यांना लवकर जामीन मिळत नाही किंवा त्यांच्या कुटुंबाची तेवढी आर्थिक स्थिती नसेल किंवा ते पुर्णपणे अनाथ असतील किंवा भग्न कुटुंबातील असतील जेणेकरुन त्यांचे पालक त्यांना सुधारगृहातुन घरी न्यायला येत नाहीत ही सांगता येतील. तसेच गंभीर गुन्ह्यामध्ये असलेल्या बालकांचा उदा. बलात्कार, अपहरण, मारामारी, खुनाचा प्रयत्न इत्यादींचा कालावधी कमी दिसतो. याचे कारण त्यामागे कुटुंबाचे आर्थिक पाठबळ असते. त्यामुळे त्यांची शिक्षा कमी करुन घेतली जाते व त्यांना लवकर जामीन मिळते.

## सारणी क्र. ५.२९ मुली - सुधारगृहातील कालावधी व गुन्ह्याचा प्रकार

| कालावधी | गुन्ह्यांचा प्रकार | | | | | | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | साधी चोरी | जबरी चोरी | वेश्याव्यवसाय यातुन सोडवलेल्या अल्पवयीन मुली | प्रेमप्रकरण /गुप्त बालविवाह/ पळुन जाण्याचा प्रयत्न | समलिंगी संबंध | मारामारी/ आक्रमकता बंडखोरी | खुन | एकापेक्षा अधिक गुन्हे | |
| १ ते ३० दिवस | ०२ | ० | ० | ० | ० | ० | ०२ | ० | ०४ |
| १ ते १२ महिने | १४ | ० | ० | ० | ० | ०२ | ० | ०१ | १७ |
| १ वर्षे ते ३ वर्षे | ०१ | ० | ०४ | ०२ | ०५ | ०६ | ० | ० | २५ |
| ३ वर्षे ते ५ वर्षे | ०९ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ११ |
| ५ वर्षे ते ७ वर्षे | ० | ०८ | ०३ | ०३ | ० | ०२ | ०२ | ० | १८ |
| ७ वर्षे ते ९ वर्षे | ० | ०३ | ०१ | ० | ० | ० | ०१ | ०४ | १५ |
| ९ वर्षापेक्षा अधिक | ० | ०६ | ० | ० | ० | ० | ० | ०२ | १० |
| **एकूण** | **२६** | **१७** | **०८** | **०५** | **०५** | **१०** | **०५** | **०७** | **१००** |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की; मुलींमध्ये सर्व गुन्ह्यात जास्त कालावधी असल्याचे प्रमाण दिसुन येत नाही. कारण मुलींना कायद्याने सौम्य शिक्षा दिली जाते. त्यांना जास्त काळ सुधार गृहात ठेवले जात नाही. एकतर त्यांचा सुधारगृहातुन विवाह लावुन दिला जातो. किंवा त्यांचे पुर्नवसन केले जाते.

वेश्याव्यवसायात ढकललेल्या मुली या जास्त कालावधीसाठी सुधारगृहात दिसून येत नाहीत कारण या मुलींना ज्या ज्या ठिकाणहून पुण्यात आणले आहे त्या त्या ठिकाणांना सुधारगृहातून पत्र पाठवून तिथे त्यांना परत पाठविले जाते.

## सारणी क्र. ५.३० मुले गुन्ह्याचा प्रकार व कौटुंबिक पार्श्र्वभुमी दर्शविणारी सारणी

| कौटुंबिक पार्श्र्वभुमी | गुन्ह्यांचा प्रकार | | | | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | साधी चोरी | घरफोडी | वाहनचोरी | दुकानफोडी | विनयभंग / छेडछाड | मारामारी / खुनाचा अयशस्वी प्रयत्न | अपहरण | बलात्कार | खून | एकापेक्षा अधिक गुन्हे | |
| आई/वडील मृत्यु | ०६ | ०५ | ०२ | ०३ | ० | ० | ० | ० | ०१ | ०६ | २३ |
| घटस्फोट | ० | ०३ | ० | ० | ० | ० | ० | ०१ | ० | ० | ०४ |
| दोघेही कालवश | ०५ | ०१ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ०४ | १० |
| वडील/आई सावत्र | ० | ० | ०४ | ०२ | ० | ०५ | ० | ०१ | ० | ० | १२ |
| आई/वडीलांने घर सोडले | ० | ० | ० | ० | ० | ०३ | ०१ | ० | ० | ० | ०४ |
| पुर्णपणे अनाथ (कुटुंब घराचा पत्ता माहीत नाही) | ०४ | ० | ० | ० | ०२ | ० | ० | ० | ० | ० | ०६ |
| जन्मदाते आई-वडील दोन्ही एकत्र राहतात | ११ | ०८ | ०२ | ० | ०३ | ०२ | ०४ | ०५ | ०६ | ० | ४१ |
| विवाह झालेले | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| एकुण | २६ | १७ | ०८ | ०५ | ०५ | १० | ०५ | ०७ | ०७ | १० | १०० |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की; जन्मदाते आईवडील एकत्र राहत असलेल्या कुटुंबातील बालकांकडून घरफोडी, खुनाचा प्रयत्न, विनयभंग, बलात्कार व खुन हे गंभीर गुन्हे घडलेले दिसून येतात ही बाब आश्र्चर्य करण्याजोगी आहे. तसेच सावत्र आई किंवा वडील असलेल्या व आईवडिल यापैकी एकाचा मृत्यु झालेल्या कुटुंबातील मुलांकडून जास्त गुन्हे घडल्याचे दिसून येते. एकापेक्षा अधिक गुन्हे हे भग्न कुटुंबातून आलेल्या बालकांकडून घडलेले दिसून येते. ( एकापेक्षा अधिक गुन्हे असलेल्या बालकांची सारणी वेगळी दिलेली आहे.)

## सारणी क्र. ५.३१ मुली - कौटुंबिक पार्श्र्वभुमी व गुन्ह्याचा प्रकार दर्शविणारी सारणी

| कौटुंबिक पार्श्वभुमी | गुन्ह्यांचा प्रकार | | | | | | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | साधी चोरी | जबरी चोरी | वेश्याव्यवसाय यातुन सोडवलेल्या अल्पवयीन मुली | प्रेमप्रकरण /गुप्त बालविवाह/ पळुन जाण्याचा प्रयत्न | समलिंगी संबंध | मारामारी/ आक्रमकता बंडखोरी | खुन | एकापेक्षा अधिक गुन्हे | |
| आई/वडील मृत्यु | १२ | ०१ | ० | ० | ० | ०६ | ० | ० | १९ |
| घटस्फोट | ०६ | ० | ० | ० | ० | ० | ० | ०१ | ०७ |
| दोघेही कालवश | ०४ | ०४ | | ० | ० | ० | ० | ० | ०८ |
| वडील/आई सावत्र | ० | ० | २२ | ०२ | ० | ० | ०२ | ०२ | २८ |
| आई/वडीलांने घर सोडले | ० | ० | ० | ० | ० | ०४ | ० | ०१ | ०५ |
| पुर्णपणे अनाथ (कुटुंब घराचा पत्ता माहीत नाही) | ०१ | ० | ०१ | ० | ० | ० | ० | ० | ०२ |
| जन्मदाते आई-वडील दोन्ही एकत्र राहतात | ०७ | ० | ० | ०५ | ०४ | ०६ | ०१ | ०२ | २५ |
| विवाह झालेले | ० | ० | ०६ | ० | ० | ० | ० | ० | ०६ |
| एकुण | ३० | ०५ | २९ | ०७ | ०४ | १६ | ०३ | ०६ | १०० |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की; मुलींमध्ये सावत्र आईवडील असलेल्या कुटुंबातील मुली या वेश्याव्यवसायात जास्त दिसून आल्या आहेत म्हणजेच कुटुंबातील सावत्रपणा मुलींना वेश्याव्यवसायात ढकलण्यास कारणीभुत ठरलेला दिसून येतो तसेच विवाह झालेल्या सर्वच मूली या वेश्याव्यवसायात

दिसून आल्या आहेत याचे कारण या मुलींना फसवुन त्यांना प्रेमाच्या जाळ्यात अडकवून त्यांच्याशी विवाह केला जातो. व त्यांना त्यांच्या राज्यापासून दूर म्हणजेच पुण्यात येऊन विकले असल्याचे दिसून आले आहे. आ□वडील एकत्र राहत असलेल्या कुटुंबातील मुलींना समलिंगी संबंध , मारामारी, आक्रमकता, प्रेम प्रकरण, या गुन्ह्यात सहभाग दिसून आला आहे. ही गोष्ट लक्षात घेण्याजोगी आहे. म्हणजेच आ□वडीलांचे नियंत्रण असुन ही या मुली प्रेमप्रकरणात व समलिंगी संबंधात अडकल्याचे दिसून येते.

### सारणी क्र. ५.३२ मुले कौटुंबिक पार्श्र्वभुमी व गुन्ह्याची कारणे दर्शविणारी सारणी

| कौटुंबिक पार्श्र्वभुमी | गुन्ह्यांचा प्रकार | | | | | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | आर्थिक कारणे | कौटुंबिक कारणे | मानसशास्त्रीय कारणे | वाईट संगत / समुह किंवा टोळी | व्यसन/नशा घेणे | चलचित्र/नागरीकरण | एकापेक्षा अधिक कारणे | |
| आई/वडील मृत्यु | ०५ | ०५ | ०४ | ०२ | ० | ० | ०७ | २३ |
| घटस्फोट | ०३ | ० | ० | ०१ | ० | ० | ०३ | ०४ |
| दोघेही कालवश | | ० | ० | ०१ | ०१ | ०१ | ०४ | १० |
| वडील/आई सावत्र | ० | ०४ | ० | ०३ | ० | ० | ०५ | १२ |
| आई/वडीलांने घर सोडले | ० | ० | ० | ०१ | ० | ०१ | ०२ | ०४ |
| पुर्णपणे अनाथ (कुटुंब घराचा पत्ता माहीत नाही) | ०२ | ० | ० | ० | ० | ० | ४ | ०६ |
| जन्मदाते आई-वडील दोन्ही एकत्र राहतात | ११ | ०१ | ०४ | ०८ | ०२ | ०२ | १३ | ४१ |
| विवाह झालेले | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| एकुण | २१ | १० | ०८ | १६ | ०३ | ०४ | ३८ | १०० |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की; भग्न कुटुंबातील मुलांकडून एकापेक्षा अधिक कारणांमुळे गुन्हे घडल्याचे दिसून येते. तर जन्मदाते आ[illegible]वडील एकत्र राहत असलेल्या मुलांकडून आर्थिक कारणांमुळे गुन्हे घडल्याचे दिसून येते. म्हणजेच आ[illegible]वडील एकत्र राहत असुन मुले हे आर्थिक कारणामुळे गुन्हे करताना दिसून येतात.

**सारणी क्र. ५.३३ मुली कौटुंबिक पार्श्र्वभुमी व गुन्ह्याचे कारण दर्शविणारी सारणी**

| कौटुंबिक पार्श्वभुमी | गुन्ह्यांची कारणे | | | | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | आर्थिक कारणे | कौटुंबिक कारणे | मानसशास्त्रीय कारणे | वाईट संगत / समुह किंवा टोळी | चलचित्र/नागरीकरण | एकापेक्षा अधिक कारणे | |
| आई/वडील मृत्यु | ०४ | ०३ | ० | ०१ | ० | ११ | १९ |
| घटस्फोट | ०२ | ० | ०१ | ० | ० | ०४ | ०७ |
| दोघेही कालवश | ० | ० | ० | ०७ | ० | ०१ | ०८ |
| वडील/आई सावत्र | ०३ | ११ | ०१ | ०१ | ० | १२ | २८ |
| आई/वडीलांने घर सोडले | ०२ | ०१ | ०१ | ० | ० | ०१ | ०५ |
| पुर्णपणे अनाथ (कुटुंब घराचा पत्ता माहीत नाही) | ०२ | ० | ० | ० | ० | ० | ०२ |
| जन्मदाते आई-वडील दोन्ही एकत्र राहतात | ०९ | ०४ | ०२ | ०२ | ०२ | ०४ | २५ |
| विवाह झालेले | ० | ०३ | ० | ०२ | ० | ०१ | ०६ |
| एकुण | २२ | २४ | ०५ | १३ | ०२ | ३४ | १०० |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की; भग्न कुटुंबातील मुलींकडून कौटुंबिक कारणांमुळे व वाईट संगतीमुळे व एकापेक्षा अधिक कारणांमुळे गुन्हे घडल्याचे दिसून येते. तर आ□वडील एकत्र राहत असलेल्या मुलींकडून आर्थिक कारणांमुळे गुन्हे घडल्याचे दिसून येते.

एकापेक्षा अधिक कारणांमुळे घडलेल्या गुन्ह्यात भग्न कुटुंबातून आलेल्या मुलींची संख्या जास्त दिसून येते.

## सारणी क्र. ५.३४ मुले मुळ निवास व गुन्ह्याचा प्रकार दर्शविणारी सारणी.

| मुळ निवास | गुन्ह्यांचा प्रकार | | | | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | साधी चोरी | घरफोडी | वाहनचोरी | दुकानफोडी | विनयभंग / छेडछाड | मारामारी / खुनाचा अयशस्वी प्रयत्न | अपहरण | बलात्कार | खून | एकापेक्षा अधिक गुन्हे | |
| पुणे जिल्ह्यातील खेडेगाव | ०२ | ० | ० | ०२ | ० | ० | ० | ० | ०२ | ० | ०६ |
| पुणे शहर | २३ | १० | ०७ | ० | ०२ | ०७ | ०४ | ०१ | ०५ | ०८ | ६७ |
| इतर जिल्ह्यातील खेडेगाव | ० | ० | ०१ | ० | ० | ० | ०१ | ० | ० | ० | ०२ |
| इतर शहर | ०१ | ०४ | ० | ० | ० | ०३ | ० | ०५ | ० | ०१ | १४ |
| महाराष्ट्राव्यतिरिक्त इतर राज्ये | ० | ०३ | ० | ०३ | ०३ | ० | ० | ०१ | ० | ०१ | ११ |
| **एकुण** | **२६** | **१७** | **०८** | **०५** | **०५** | **१०** | **०५** | **०७** | **०७** | **१०** | **१००** |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की; मुलांमध्ये साधी चोरी पासुन जबरी चोरी केलेले पुणे शहरातील दिसुन येतात तर अपहरण, विनयभंग, एकापेक्षा अधिक गुन्हे व बलात्कार यांसारखे गंभीर गुन्हे केलेले इतर शहरातील महाराष्ट्रा व्यतिरिक्त इतर राज्यातील बालकांकडून घडले आहेत. बलात्कार, विनयभंग, यांसारखे लैगिंक गुन्हे पुणे शहरापेक्षा बाहेरुन येणाऱ्या बालकांमध्ये जास्त दिसून येतात.

## सारणी क्र. ५.३५ मुली मुळनिवास व गुन्ह्याचा प्रकार दर्शविणारी सारणी

| मुळ निवास | गुन्ह्यांचा प्रकार | | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | साधी चोरी | जबरी चोरी | वेश्याव्यवसाय यातुन सोडवलेल्या अल्पवयीन मुली | प्रेमप्रकरण /गुप्त बालविवाह/ पळुन जाण्याचा प्रयत्न | समलिंगी संबंध | मारामारी/ आक्रमकता बंडखोरी | खुन | एकापेक्षा अधिक गुन्हे | |
| पुणे जिल्ह्यातील खेडेगाव | १४ | ० | ० | ०२ | ० | ०२ | ०३ | ० | २१ |
| पुणे शहर | १३ | ०३ | ० | ०३ | ०४ | १४ | ० | ०६ | ४३ |
| इतर जिल्ह्यातील खेडेगाव | ०३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ०३ |
| इतर शहर | ० | ०२ | ०१ | ० | ० | ० | ० | ० | ०३ |
| महाराष्ट्राव्यतिरिक्त इतर राज्ये | ० | ० | २८ | ०२ | ० | ० | ० | ० | ३० |
| **एकुण** | **३०** | **०५** | **२९** | **०७** | **०४** | **१६** | **०३** | **०६** | **१००** |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की; मुलींमध्ये वेश्याव्यवसायात ढकललेल्या मुली महाराष्ट्राच्या इतर राज्यातून आलेल्या दिसून येतात. याचे कारण सारणी क्र.५.३० मध्ये मांडले आहे. मारामारी, आक्रमकता, बंडखोरी मध्ये आढळणाऱ्या मुली या पुणे शहरातील दिसून येतात. तसेच प्रेमप्रकरण बाल विवाह झालेल्या मुली बाहेरील राज्यातील दिसून येतात.

### सारणी क्र. ५.३६ मुले मुळ निवास व गुन्ह्याची कारणे दर्शविणारी सारणी

| मुळ निवास | गुन्ह्यांचा प्रकार | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | आर्थिक कारणे | कौटुंबिक कारणे | मानसशास्त्रीय कारणे | वाईट संगत / समुह किंवा टोळी | व्यसन/नशा घेणे | चलचित्र/ नागरीकरण | एकापेक्षा अधिक कारणे | |
| पुणे जिल्ह्यातील खेडेगाव | ०२ | ०१ | ० | ०१ | ० | ० | ०३ | ०६ |
| पुणे शहर | १० | ०८ | ०६ | ०७ | ०३ | ० | ३३ | ६७ |
| इतर जिल्ह्यातील खेडेगाव | ०२ | ० | ० | ० | ० | ० | ० | ०२ |
| इतर शहर | ०५ | ० | ०२ | ०५ | ० | ०२ | ०३ | १४ |
| महाराष्ट्राव्यतिरिक्त इतर राज्ये | ०२ | ०१ | ० | ०३ | ० | ०२ | ०३ | ११ |
| **एकुण** | **२१** | **१०** | **०८** | **१६** | **०३** | **०४** | **३८** | **१००** |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की; पुणे शहरात आर्थिक कारणांमुळे व एकापेक्षा आधिक कारणांमुळे घडलेल्या गुन्ह्याचे प्रमाण जास्त दिसून येते. तसेच इतर शङरातून आलेल्या व महाराष्ट्रा व्यतिरिक्त इतर राज्यातून आलेल्या मुलांमध्ये वाईट संगत व समुहातुन घडलेल्या गुन्ह्याचे प्रमाण जास्त दिसून येते. म्हणजेच पुणे शहरात वा[illegible] संगतीमुळे बालके येऊन गुन्हा करताना दिसून येतात.

**सारणी क्र. ५.३७ मुली मुळ निवास व गुन्ह्याची कारणे दर्शविणारी कारणे**

| मुळ निवास | गुन्ह्यांचा प्रकार | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | आर्थिक कारणे | कौटुंबिक कारणे | मानसशास्त्रीय कारणे | वाईट संगत / समुह किंवा टोळी | चलचित्र/नागरीकरण | एकापेक्षा अधिक कारणे | |
| पुणे जिल्ह्यातील खेडेगाव | ०६ | ०३ | ० | ०८ | ० | ०४ | २१ |
| पुणे शहर | ०७ | ११ | ०२ | ० | ०१ | २२ | ४३ |
| इतर जिल्ह्यातील खेडेगाव | ० | ० | ०२ | ०१ | ० | ० | ०३ |
| इतर शहर | ० | ० | ०१ | ०२ | ० | ० | ०३ |
| महाराष्ट्राव्यतिरिक्त इतर राज्ये | ०९ | १० | ० | ०२ | ०१ | ०८ | ३० |
| **एकुण** | **२२** | **२४** | **०५** | **१३** | **०२** | **३२** | **१००** |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की; पुणे शहरातील मुलींकडून कौटुंबिक कारणांमुळे व एकापेक्षा अधिक कारणांमुळे गुन्हे घडलेले आहेत. तसेच महाराष्ट्रा व्यतिरिक्त इतर राज्यांतून आलेल्यामध्ये आर्थिक व कौटुंबिक या दोन्ही कारणांमुळे गुन्हे घडलेले दिसून येतात. वाईट संगतीमुळे घडलेल्या गुन्ह्यात पुणे शहरापेक्षा इतर ठिकाणाहुन पुण्यात आलेल्या मुलींची संख्या जास्त दिसून येते.

## सारणी क्र. ५.३८ मुले - कौटुंबिक पार्श्वभूमी व मूळ निवास दर्शविणारी सारणी

| कौटुंबिक पार्श्वभूमी | पुणे जिल्ह्यातील खेडेगाव | पुणे शहर | इतर जिल्ह्यातील खेडेगाव | इतर शहर | महाराष्ट्रा व्यतिरिक्त इतर राज्ये | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| आई/वडील मृत्यु | **0२** | १५ | 0१ | 0४ | 0१ | २३ |
| घटस्फोट | **0** | 0३ | 0 | 0 | 0१ | 0४ |
| दोघेही कालवश | **0** | 0५ | 0 | 0२ | 0३ | १0 |
| वडील/आई सावत्र | **0२** | 0४ | 0१ | 0२ | 0३ | १२ |
| आई/वडीलांने घर सोडले | **0** | 0३ | 0 | 0१ | 0 | 0४ |
| पुर्णपणे अनाथ (कुटुंब घराचा पत्ता माहीत नाही) | 0२ | 0२ | 0 | 0१ | 0१ | 0६ |
| जन्मदाते आई-वडील दोन्ही एकत्र राहतात | 0 | ३५ | 0 | 0४ | 0२ | ४१ |
| विवाह झालेले | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **एकुण** | **0६** | ६७ | **0२** | १४ | ११ | **१00** |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की; अभ्यासलेल्या नमुन्यात पुणे शहरातील मुले ही जन्मदाते आई-वडील दोन्ही एकत्र राहत असलेल्या कुटुंबातील जास्त दिसुन येतात तर इतर ठिकाणांहुन पुणे शहरात आलेली मुले भग्न कुटुंबातून आलेली दिसुन येतात.

### सारणी क्र. ५.३९ मुली - कौटुंबिक पार्श्वभूमी व मूळ निवास दर्शविणारी सारणी

| कौटुंबिक पार्श्वभूमी | पुणे जिल्ह्यातील खेडेगाव | पुणे शहर | इतर जिल्ह्यातील खेडेगाव | इतर शहर | महाराष्ट्रा व्यतिरिक्त इतर राज्ये | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| आई/वडील मृत्यु | ११ | ०४ | ०२ | ० | ०२ | १९ |
| घटस्फोट | ० | ०३ | ० | ०१ | ०३ | ०७ |
| दोघेही कालवश | ०३ | ०२ | ०१ | ० | ०२ | ०८ |
| वडील/आई सावत्र | ०६ | ०९ | ० | ०२ | ११ | २८ |
| आई/वडीलांने घर सोडले | ० | ०५ | ० | ० | ० | ०५ |
| पुर्णपणे अनाथ (कुटुंब घराचा पत्ता माहीत नाही) | ० | ०२ | ० | ० | ० | ०२ |
| जन्मदाते आई-वडील दोन्ही एकत्र राहतात | ०१ | १८ | ० | ० | ०६ | २५ |
| विवाह झालेले | ० | ० | ० | ० | ०६ | ०६ |
| एकुण | २१ | ४३ | ०३ | ०३ | ३० | १०० |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की; अभ्यासलेल्या नमुन्यात पुणे शहरातील मुली ह्या भग्न कुटुंबातील जास्त दिसुन येतात. तर इतर ठिकाणांहुन पुणे शहरात आलेली मुलीही भग्न कुटुंबातून आलेल्या दिसुन येतात. म्हणजेच यातही मुलांपेक्षा मुली ह्या कौटुंबिक भग्नतेला जास्त बळी पडलेल्या दिसुन येतात.

## सारणी क्र. ५.४0 मुले एकापेक्षा अधिक गुन्ह्यांचे विश्लेषण

| केस क्र. | गुन्हे | वयोगट | शिक्षण | कौटुंबिक पार्श्वभूमी | मूळ निवास | उत्पन्न | शिक्षेचा कालावधी | कारणे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | साधी चोरी + मारामारी/आक्रमकता | ७ वर्ष ते १३ वर्ष | शाळेत न गेलेला | आई /वडिल एकाचा मृत्यु | पुणे शहर | कोणतेच उत्पन्न नाही | १ वर्ष ते ३ वर्ष | आर्थिक |
| २. | साधी चोरी + मारामारी/आक्रमकता | १३ वर्ष ते १७ वर्ष | १ ली ते ४ थी | आई /वडिल एकाचा मृत्यु | पुणे शहर | १000१ ते २0000 | १ वर्ष ते ३ वर्ष | कौटुंबिक |
| ३. | साधी चोरी + मारामारी/आक्रमकता | १३ वर्ष ते १७ वर्ष | १ ली ते ४ थी | दोघेही कालवश | पुणे शहर | १000१ ते २0000 | १ वर्ष ते ३ वर्ष | आर्थिक+कौटुंबिक |
| ४. | अपहरण + खून | १३ वर्ष ते १७ वर्ष | १ ली ते ४ थी | दोघेही कालवश | पुणे शहर | १000१ ते २0000 | ७ वर्ष ते ९ वर्ष | मानसशास्त्रीय |
| ५. | अपहरण + वाहनचोरी | १३ वर्ष ते १७ वर्ष | १ ली ते ४ थी | आई /वडिल एकाचा मृत्यु | पुणे शहर | १000१ ते २0000 | १ वर्ष ते ३ वर्ष | आर्थिक |
| ६. | अपहरण + वाहनचोरी | १३ वर्ष ते १७ वर्ष | १ ली ते ४ थी | आई /वडिल एकाचा मृत्यु | पुणे शहर | १000१ पेक्षा कमी | ७ वर्ष ते ९ वर्ष | आर्थिक+वाईट संगत |
| ७. | विनयभंग + बलात्कार | १३ वर्ष ते १७ वर्ष | शाळेत न गेलेला | आई /वडिलांनी घर सोडले | इतर शहर | १000१ पेक्षा कमी | ७ वर्ष ते ९ वर्ष | वाईट संगत+चलचित्र |
| ८. | विनयभंग + बलात्कार | १३ वर्ष ते १७ वर्ष | शाळेत न गेलेला | दोघेही कालवश | इतर शहर | १000१ पेक्षा कमी | ७ वर्ष ते ९ वर्ष | वाईट संगत+चलचित्र |
| ९. | साधी चोरी + खूनाचा प्रयत्न + जबरी चोरी | १३ वर्ष ते १७ वर्ष | ५ वी ते ७ वी | आई /वडिल एकाचा मृत्यु | इतर शहर | कोणतेच उत्पन्न नाही | ७ वर्ष ते ९ वर्ष | वाईट संगत+मानसशास्त्रीय |
| १0 | अपहरण + बलात्कार + खून | १३ वर्ष ते १७ वर्ष | ५ वी ते ७ वी | दोघेही कालवश | महाराष्ट्राबाहेर (बिहार) | कोणतेच उत्पन्न नाही | ७ वर्ष ते ९ वर्ष | आर्थिक+वाईट संगत+ कौटुंबिक |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की; साधी चोरी + मारामारी, अपहरण + खुन, अपहरण + वाहन चोरी यांमध्ये १ ली ते ४ थी शाळा शिकत असलेल्या व भग्न कुटुंबातील बालकांचा समावेश होतो. यांचे कुटुंबाचे उत्पन्न हे १000१ ते २000१ पर्यंत दिसुन येते. तर यांचे वास्तव्य ठिकाण पुणे शहर दिसून येते. विनयभंग + बलात्कार घडलेल्या बालकांमध्ये शाळेत न गेलेले व भग्न कुटुंबातील मुले दिसून येतात. तसेच ही मुले इतर शहरातील दिसून येतात. त्यांच्याकडून वाईट संगत व चलचित्र यांमुळे गुन्हे घडल्याचे दिसून आले आहे. दोन पेक्षा अधिक घडलेल्या गुन्ह्यांमध्ये पाचवी ते सातवी शिकलेल्या मुलांचा सहभाग दिसून येतो तसेच त्यांच्यामध्ये एकापेक्षा अधिक कारणांमुळेही गुन्हे घडलेले दिसून येतात.

## सारणी क्र. ५.४१ मुली एकापेक्षा अधिक गुन्ह्याचे विश्लेषण

| केस क्र. | गुन्हे | वयोगट | शिक्षण | कौटुंबिक पार्श्वभूमी | मूळ निवास | उत्पन्न | शिक्षेचा कालावधी | कारणे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | साधी चोरी + मारामारी / आक्रमकता | ७ वर्ष ते १३ वर्ष | शाळेत न गेलेली | आई /वडिलांनी घर सोडले | पुणे शहर | १०००१ पेक्षा कमी | १ ते १२ महिने | कौटुंबिक |
| २. | प्रेमप्रकरण + समलैंगिक संबंध | ७ वर्ष ते १३ वर्ष | १ ली ते ४ थी | आई /वडिल एकत्र | पुणे शहर | १०००१ ते २०००० | ५ वर्ष ते ७ वर्ष | कौटुंबिक+मानसशास्त्रीय + चलचित्र |
| ३. | प्रेमप्रकरण + समलैंगिक संबंध | १३ वर्ष ते १७ वर्ष | १ ली ते ४ थी | आई /वडिल एकत्र | पुणे शहर | २०००१ ते ३०००० | ७ वर्ष ते १०वर्ष | कौटुंबिक+वाईट संगत+चलचित्र |
| ४. | प्रेमप्रकरण + वेश्याव्यवसाय | १३ वर्ष ते १७ वर्ष | शाळेत न गेलेली | सावत्रपणा | महाराष्ट्राबाहेर | कोणतेच उत्पन्न नाही | १ ते १२ महिने | आर्थिक |
| ५. | प्रेमप्रकरण + वेश्याव्यवसाय | १३ वर्ष ते १७ वर्ष | १० वी च्या पुढे | विवाह झालेली (घटस्फोटीत) | महाराष्ट्राबाहेर | ३०००१ च्या पुढे | १ ते १२ महिने | कौटुंबिक+वाईट संगत |
| ६. | गुप्त बालविवाह + मारामारी + बंडखोरी+ प्रेमप्रकरण | १३ वर्ष ते १७ वर्ष | ८ वी ते १० वी | सावत्रपणा | पुणे जिल्हयातील खेडेगांव | २०००१ ते ३०००० | ५ वर्ष ते ७ वर्ष | कौटुंबिक+ मानसशास्त्रीय+वाईट संगत +चलचित्र |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की; प्रेमप्रकरण व समलिंगी संबंध हा गुन्हा असलेल्या मुलींचा वयोगट भिन्न आढळतो याचे कारण वरच्या वयोगटातील मुलीने खालच्या वयोगटातील मुलीला समलिंगी संबंधात ओढले ले होते विशेष म्हणजे या दोन्ही मुली प्रेमप्रकरणातून सुधार गृहात आलेल्या होत्या त्यांचे शिक्षणही पहिली ते चौथी दिसून येते व आ□वडील एकत्र राहत असलेल्या कुटुंबातील या मुली आहेत. तसेच वेश्याव्यवसायात ढकलण्यात आलेली एक मुलगी ही दहावीच्या पुढे शिक्षण असलेली आहे. व उत्पन्न गटही चांगले असणारी आहे. तसेच विवाहित असुन तिच्याकडून कौटुंबिक व वा□ट संगतीमुळे गुन्हा घडलेला दिसून येतो. यावरून असे दिसते की शिक्षणामुळे मुलींच्या वर्तनावर व कृतीवर कोणताही प्रभाव पडलेला दिसुन येत नाही.

| | प्रकरण ६ – निष्कर्ष व सूचना | पृष्ठ क्र |
|---|---|---|
| ६.१ | वास्तवात तपासुन पाहिलेली विधाने | १४६ |
| ६.२ | निष्कर्ष | १५५ |
| ६.३ | उपाय व सूचना | १५८ |

## ६.१ वास्तवात तपासून पाहिलेले विधाने क्र.१ ः-

### १) कौटुंबिक भग्नता बालकांना गुन्हेगारी क्षेत्राकडे जाण्यास प्रवृत्त करते.

तांत्रिकदृष्ट्या कौटुंबिक भग्नतेच्या व्याख्येवर फारसा अभ्यास झालेला आढळुन येत नाही. कौटुंबिक भग्नतेची व्याख्या ही समाजशास्त्रज्ञांनी स्वतःच्या दृष्टीकोनातून केलेली दिसते. परंतु यामध्ये बालकांच्या दृष्टीकोनाचा व मानसिकतेचा विचार केलेला दिसून येत नाही. “ज्या कुटुंबाचा बालकांना आधार वाटत नाही व त्यामुळे ते मानसिकदृष्ट्या कुटुंबापासून दूर जावू लागतात अशा कुटुंबांना भग्न कुटुंब म्हणू शकतो.” जेव्हा बालकाला कुटुंबाकडून मिळणारे प्रेम, आधार व मानसिक पाठींबा कमी होवू लागतो. तेव्हा बालक कुटुंबाबाहेरील घटकांच्या संपर्क क्षेत्रात येतो तेव्हा कुटुंबाचे बालकावर असणारे नियंत्रण धोक्यात येते व यातूनच पुढे तो बालगुन्हेगारीकडे ढकलला जातो.

सर्वसाधारणतः कुटुंबातील आ□-वडिलांचे सतत होणारी भांडणे हे भग्न कुटुंबाचे एक लक्षण सांगता ये□ल. तांत्रिकदृष्ट्या दोघेही कालवश, आई किंवा वडीलांपैकी एकाचा मृत्यु, सावत्र आई किंवा वडिल, आई किंवा वडिलांपैकी एकाने घर सोडले असेल तर किंवा घटस्फोटीत आई किंवा वडिल ही विसंगत कुटुंबाची लक्षणे सांगता येईल.

**प्रकरण २ संदर्भ क्र. क) कौटुंबिक घटकांमध्ये** अनेक संशोधकांनी कौटुंबिक भग्नतेचा उल्लेख केलेला आढळतो. त्यांच्या अभ्यासानुसार बालकांना कुटुंब हा घटक सर्वात जवळचा असतो. कुटुंबातील भांडणे, विभक्त कुटुंब, घटस्फोटीत माता-पिता, सावत्रपणा यामुळे बालकांच्या कोवळ्या मनावर परीणाम होवून ही बालके स्वतःचे सुख शोधण्याच्या निमित्ताने कुटुंबापासून दूर होवून वाममार्गाला लागतात.

**अ) सारणी क्र. ५.१५ -** अभ्यासलेल्या नमुन्याच्या प्राथमिक पाहणीतच आढळले की, मुलांमध्ये केवळ ४१% बालके अशा कुटुंबामधून आली आहेत की जेथे मातापिता एकत्र राहत आहेत. उर्वरीत ५९% बालके भग्न कुटुंबामधून आली आहेत.तर मुलींमध्ये केवळ २५% मुली अशा कुटुंबामधून आल्या आहेत की जेथे मातापिता एकत्र राहत आहेत. उर्वरीत ६९%

मुली भग्न कुटुंबामधून आल्या आहेत व ६% मुली या विवाह झालेल्या आहेत. तथापि अशा प्राथमिक आणि ढोबळ आकडेवारीवर विसंबून न राहता विविध अंगांनी विश्लेषण केले असता पुढील बाबी आढळतात.

कौटुंबिक पार्श्वभूमीचा गुन्ह्यांच्या गंभीरतेशी असणारा संबंध आपणास सारणी क्र. ५.३० व ५.३१ मध्ये दिसतो.

**ब) सारणी क्र. ५.३० व ५.३१ -** अभ्यासलेल्या नमुन्याच्या पाहणीत असे दिसून आले की; मुलांमध्ये भग्न कुटुंबातुन आलेल्यांमध्ये साधी चोरी, घरफोडी, वाहनचोरी, दूकानफोडी हे आर्थि क गुन्हे १०० पैकीं एकुण ३५ (३५%), विनयभंग व बलात्कार यांसारखे लैगिंक गुन्हे १०० पैकीं एकुण ४ (४%) व मारामारी/खूनाचा प्रयत्न, खुन व एकापेक्षा अधिक गुन्हे हे गंभीर गुन्हे १०० पैकीं एकुण २० (२०%) घडून आले आहेत. तर जन्मदाते आ□वडिल एकत्र राहत असलेल्या मुलांमधून साधी चोरी, घरफोडी, वाहनचोरी, दूकानफोडी हे आर्थिक गुन्हे १०० पैकीं एकुण २१ (२१%), विनयभंग व बलात्कार यांसारखे लैगिंक गुन्हे १०० पैकीं एकुण ८ (८%) व मारामारी/खूनाचा प्रयत्न व खुन हे गंभीर गुन्हे १०० पैकीं एकुण १२ (१२%) घडून आले आहेत. जन्मदाते आ□वडिल एकत्र राहत असलेल्या मुलांकडून एकापेक्षा अधिक गुन्हे घडून आलेले दिसत नाही.

मुलींमध्ये भग्न कुटुंबातून आलेल्यांमध्ये साधी व जबरी चोरी हे आर्थिक गुन्हे १०० पैकीं एकुण २८ (२८%), वेश्याव्यवसाय व प्रेमप्रकरण यांसारखे लैगिंक गुन्हे १०० पैकीं एकुण २५ (२५%) व मारामारी, खून व एकापेक्षा अधिक गुन्हे हे गंभीर गुन्हे १०० पैकीं एकुण १६ (१६%) घडून आले आहेत. तर जन्मदाते आ□वडिल एकत्र राहात असलेल्या मुलींमधून साधी व जबरी चोरी हे आर्थिक गुन्हे १०० पैकीं एकुण ७ (७%), वेश्याव्यवसाय, समलिंगी संबंध व प्रेमप्रकरण यांसारखे लैगिंक गुन्हे १०० पैकीं एकुण ९ (९%) व मारामारी, खून व एकापेक्षा अधिक गुन्हे हे गंभीर गुन्हे १०० पैकीं एकुण ९ (९%) घडून आले आहेत.

म्हणजेच भग्न कुटुंबातुन आलेली बालके अ-भग्न कुटुंबातुन आलेल्या बालकांच्या तुलनेत संख्या व प्रमाण या दोन्ही दृष्टीने आर्थिक व गंभीर गुन्ह्यांमध्ये अधिक आढळतात याकडे आम्ही लक्ष वेधू इच्छितो. या मुद्यांबाबत सखोल संशोधन होणे गरजेचे वाटते आणि आतापर्यंत याकडे लक्ष वेधले गेल्याचे आढळत नाही. तसेच कौटुंबिक वातावरणात वाढणारी मुले -मुली लैंगिक गुन्ह्यांकडे वळण्याची कारणे, खूनासारखे गुन्हे करण्याची कारणे ही काहीशी नव्याने समोर आलेली बाब वाटते.

**क) सारणी क्र. ५.३२ व ५.३३ -** अभ्यासलेल्या नमुन्याच्या पाहणीत असे दिसून आले की; गुन्ह्यांच्या कारणांचा विचार करता असे दिसते की एकाच कारणाने गुन्ह्याकडे वळणाऱ्या मुलांमध्ये कौटुंबिक पार्श्वभूमीचा प्रभाव जाणवत नाही. परंतु एकापेक्षा अधिक कारणांनी गुन्हे करणारी ३८ पैकी एकुण १३ (३४%) मुले भग्न कुटुंबातील आहेत तर ३२ पैकी एकुण २८ मुली (८७%) भग्न कुटुंबांमधून आलेल्या आहेत. म्हणजे भग्न कुटुंबातील मुलामुलींवर कुटुंबाबाहेरच्या अनेक घटकांचा एकत्रित प्रभाव पडू शकतो. त्यामानाने भग्न नसलेल्या कुटुंबातील मुलामुलींवर कमी पडतो असे म्हणता येईल.

भग्न नसलेल्या कुटुंबातील २५ पैकी एकुण ९ (३६%) मुली व ४१ पैकी एकुण ११ (२७%) मुले आर्थिक कारणांमुळे केवळ गुन्हेगारीकडे वळल्याचे दिसते. अन्य घटकांचा प्रभाव रोखण्यास कुटुंबाची मदत झाली असावी असे दिसते.

**क) सारणी क्र. ५.३९ व ५.४० -** अभ्यासलेल्या नमुन्याच्या प्राथमिक पाहणीत असे दिसून आले की; मुलांमध्ये पुणे शहराव्यतिरिक्त इतर ठिकाणांहून पुणे शहरात आलेली एकूण ३३ पैकी एकुण २७ (८१%) मुले भग्न कुटुंबातून आलेली दिसून येतात. तर मुलींमध्ये पुणे शहराव्यतिरिक्त इतर ठिकाणाहून पुणे शहरात आलेल्या ५७ पैकी एकुण ४५ (७९%) मुली भग्न कुटुंबातील दिसून येतात. यावरून असे दिसते की भग्न कुटुंबातील मुले मुली

स्थलांतराला व भटकेगिरीला प्रवृत्त होतात. जे 'बालगुन्हेगारीच्या वाटेवरचे पहिले पाऊल' असे अनेक विचारवंतांनी म्हटलेले आहे.

**ड) सारणी क्र.५.४१ व ५.४२ -** अभ्यासलेल्या नमुन्याच्या पाहणीत असे दिसून आले की; मुलांमध्ये एकापेक्षा अधिक गुन्हे घडलेली १0 पैकी एकुण १0 बालके भग्न कुटुंबातील दिसून येतात. तर मुलींमध्ये एकापेक्षा अधिक गुन्हे घडलेली ६ पैकी एकुण ४ मुली या भग्न कुटुंबातून आलेल्या दिसुन येतात. याचा अर्थ असा सांगता येईल की कौटुंबिक भग्नता ही बालकांना एकापेक्षा अधिक गुन्हे करण्यास प्रवृत्त करते. बालक जेव्हा कुटुंबाचे नियंत्रण झुगारून बाहेरील घटकांच्या सीमा कक्षात येतो तेव्हा त्याच्यावरील सर्व बंधने शिथिल होतात व तो एकापेक्षा अधिक गुन्हे करायला धजावतो असे म्हणता येईल.

वरील सर्व निरीक्षणांचा एकत्रित विचार केल्यास असे निश्चितपणे म्हणता येईल, कौटुंबिक भग्नतेचा बालगुन्हेगारीच्या विविध पैलुंशी असणारा संबंध तपासुन पाहिला असता अभ्यासलेल्या नमुन्याच्या बाबतीत तरी आमचे पहिले तपासून पाहण्याचे विधान "**.कौटुंबिक भग्नता बालकांना गुन्हेगारी क्षेत्राकडे जाण्यास प्रवृत्त करते.**" निश्चितपणे सिद्ध झाल्याचे आढळून येते. यामध्ये पूर्वीच्या अभ्यासकांनी केलेल्या संशोधनाला पुष्टी मिळते. त्याचबरोबर भग्न नसलेल्या कुटुंबाची पार्श्वभूमी आणि लैंगिक गुन्हे व गंभीर गुन्हे याकडे मुलामुलींचा कल, यातील संबंध, पुणे शहरातील गुन्हेगारीच्या बदलत्या कारणांवर पुरेसा प्रकाशझोत टाकतो असे आम्हाला वाटते.

## वास्तवात तपासून पाहिलेले विधाने क्र.२

## २) वा□ट संगतीमुळे बालके गुन्हा करताना दिसून येतात.

बालक जेव्हा कुटुंबापासून दूर जातो तेव्हा त्याच्यावर कुटुंबाबाहेरील घटकाचा प्रभाव पडतो. तो लवकर वाईट संगतीचा शिकार होतो.

**प्रकरण २ संदर्भ साहित्याच्या आढाव्यामध्ये इ)कुटुंबाबाहेरील घटकांमध्ये** सांगितल्याप्रमाणे औद्योगिकीकरण, नागरीकरण, झोपडपट्टी, वाईट शेजार, व्यसन, लैंगिक व्यवहार इ. गोष्टींमुळे बालक संगतीत लवकर अडकतो. तसेच शहरातील गजबजलेले वातावरण, आरामदायी जीवन, मनोरंजनाची साधने इ. गोष्टी या बालकांना आकर्षित करत असतात. **(प्रकरण २ संदर्भ क्र.इ कुटुंबाबाहेरील घटक ४) जी. सी. दत्त ५) सदरलॅन्ड)** यांमुळे बालके शहरात येतात व शहरांमध्ये त्यांचा संपर्क इतर गुन्हेगारी समुहाशी येवून ही बालकेही त्यांच्याबरोबर गुन्हा करायला शिकतात. दाट गर्दीच्या ठिकाणी अशा वाईट समुहाचा उदय होत असतो.

**अ) सारणी क्र.५.६ व ५.८ -** अभ्यासलेल्या नमुन्याच्या प्राथमिक पाहणीत असे दिसून आले की; मुलांमध्ये फक्त एकाच कारण कारणीभुत असलेल्या वाईट संगतीमुळे घरफोडी, वाहनचोरी हे १६ पैकीं एकुण ७(४४%) आर्थिक गुन्हे, व विनयभंग, बलात्कार हे १६ पैकी एकुण ६ (३७%) लैगिंक गुन्हे व एकापेक्षा अधिक गुन्हे १६ पैकी एकुण २(१२%) घडलेले दिसून आले.

मुलींमध्ये वाईट संगतीमुळे प्रेमप्रकरण, गुप्त बालविवाह, समलिंगी संबंध व वेश्याव्यवसाय यांसारखे १३ पैकी एकुण ७ (५४%) लैंगिक गुन्हे घडलेले दिसून आले.

**ब) सारणी क्र.५.७ व ५.९ -** अभ्यासलेल्या नमुन्याच्या पाहणीत असे दिसून आले की; एकापेक्षा अधिक कारणांमुळे घडलेल्या गुन्ह्यांमध्ये ३० पैकी एकुण २८ मुलांमध्ये (७६%) वाईट संगत हा एक घटक आढळतो. तसेच त्यांच्यात वाईट संगती घटकाबरोबर आर्थिक कारण हा घटक जास्तीत जास्त ३८ पैकी एकुण २१ (५५%) वेळा बरोबर आढळतो.

मुलींमध्ये एकापेक्षा अधिक कारणांमुळे घडलेल्या गुन्ह्यांमध्ये ३४ पैकी एकुण १३(३८%) मुलींनी वा□ संगतीमुळे गुन्हे केल्याचे दिसून येते. तसेच त्यांच्यात वाईट संगती घटकाबरोबर

कौटुंबिक कारण हा घटक जास्तीत जास्त १३ पैकी एकुण ८ (६२%) वेळा बरोबर आढळतो.

**क) सारणी क्र.५.६,५.७,५.८ व ५.९ -** अभ्यासलेल्या नमुन्याच्या पाहणीत असे दिसून आले की; फक्त एकाच कारण व एकापेक्षा अधिक कारणे कारणीभुत असलेल्यांचा एकत्रित विचार करता मुलांमध्ये १०० पैकी एकुण ४५(४५%) व मुलींमध्ये १०० पैकी एकुण २६(२६%) गुन्हे वाईट संगतीमुळे घडले आहेत.

**ड) सारणी क्र.५.१३ व ५.१४ -** अभ्यासलेल्या नमुन्याच्या पाहणीत असे दिसून आले की; मुलांमध्ये शाळेत गेलेल्या किंवा शाळेत जाणाऱ्यांमध्ये १६ पैकी एकुण १४(८७.५०%) बालके तर शाळेत न गेलेल्यांमध्ये १६ पैकी एकुण २(१२.५०%) वाईट संगतीचा बळी पडलेली दिसून येतात. मुलींमध्ये शाळेत गेलेल्या किंवा शाळेत जाणाऱ्यांमध्ये १३ पैकी एकुण १०(७७%) मुली तर शाळेत न गेलेल्यांमध्ये १३ पैकी एकुण ३(२३%) वाईट संगतीला बळी पडल्याचे दिसते. म्हणजेच शाळा हा घटक वा□ट संगतीचे व समुहाचे केंद्र बनल्याचे दिसुन येते.

**इ) सारणी क्र.५.३२ व ५.३३ -** अभ्यासलेल्या नमुन्याच्या पाहणीत असे दिसून आले की; मुलांमध्ये भग्न कुटुंबातील १६ पैकी एकुण ८(८%) बालके वाईट संगतीला बळी पडल्याचे दिसते. जर जन्मदाते आ□वडिल एकत्र राहत असलेलेही १६ पैकी एकुण ८(८%) मुले वाईट संगतीला बळी पडलेली दिसून येतात.

मुलींमध्ये भग्न कुटुंबातील १३ पैकी एकुण ९(६९%) मुली वाईट संगतीला बळी पडल्याचे दिसते. तर जन्मदाते आ□वडिल एकत्र राहत असणाऱ्यामध्ये १३ पैकी एकुण २(१५%)व विवाह झालेल्यांमध्ये १३ पैकी एकुण २(१५%) मुली वाईट संगतीला बळी पडल्याचे दिसते.

म्हणजेच कुटुंबाचे स्वरूप कोणत्याही प्रकारचे असो बालके ही वाईट संगतीला बळी पडल्याचे दिसते.

**ई) सारणी क्र.५.३६ व ५.३७ -** अभ्यासलेल्या नमुन्याच्या प्राथमिक पाहणीत असे दिसून आले की; मुलांमध्ये पुणे शहरातील १६ पैकी एकुण ७(४४%) बालके व पुणे शहराव्यतिरिक्त इतर ठिकाणाहून आलेली १६ पैकी एकुण ९ (५६%) बालके वाईट संगतीला बळी पडल्याचे दिसते.

मुलींमध्ये पुणे शहरातील वाईट संगतीला एकही मुलगी बळी पडल्याचे दिसून येत नाही. तर इतर ठिकाणाहून आलेल्यांमध्ये १३ पैकी एकुण १३ (१00%) मुली वाईट संगतीला बळी पडल्याचे दिसते. ही एक आश्चर्यजनक बाब आहे व यावर अधिक संशोधन होणे आवश्यक आहे.

**फ) सारणी क्र.५.४0 व ५.४१ -** अभ्यासलेल्या नमुन्याच्या पाहणीत असे दिसून आले की; मुलांमध्ये एकापेक्षा अधिक गुन्ह्यामध्ये वाईट संगतीमुळे १0 पैकी एकूण ५ मुलांनी गुन्हे केल्याचे दिसते. त्यांच्यात वाईट संगतीमुळे अपहरण, वाहनचोरी, विनयभंग, खून, बलात्कार इ. गंभीर गुन्हे घडल्याचे दिसते.

मुलींमध्ये एकापेक्षा अधिक गुन्हे केलेल्यामध्ये एकूण ६ पैकी एकुण ३ मुलींनी वाईट संगतीमुळे गुन्हे केल्याचे दिसते. त्यांच्याकडून प्रेमप्रकरण, समलिंगी संबंध, वेश्याव्यवसाय, बालविवाह इ. लैंगिक स्वरुपाचे गुन्हे घडले आहेत.

वरील सर्व निरीक्षणांचा एकत्रित विचार केल्यास असे निश्चितपणे म्हणता येईल,वाईट संगतीचा बालगुन्हेगारीच्या कारणांशी असणारा संबंध तपासुन पाहिला असता अभ्यासलेल्या नमुन्याच्या बाबतीत आमचे दुसरे तपासून पाहण्याचे विधान "**वाईट संगतीमुळे बालके गुन्हा करताना दिसून येतात.**" निश्चितपणे सिद्ध झाल्याचे आढळून येते. यामध्ये पूर्वीच्या अभ्यासकांनी केलेल्या संशोधनाला पुष्टी मिळते. त्याचबरोबर वाईट संगतीमुळे घडलेले आर्थि

क गुन्हे, लैंगिक गुन्हे व गंभीर गुन्हे पुणे शहरातील गुन्हेगारीच्या बदलत्या कारणांवर पुरेसा प्रकाशझोत टाकतात असे आम्हाला वाटते.

**वास्तवात तपासून पाहिलेले विधाने क्र.३**

**३) शाळेत जाणाऱ्या बालकांपेक्षा शाळेत न जाणाऱ्या बालकांकडून अधिक गुन्हे घडतात असे वाटते.**

**प्रकरण २ संदर्भ क्र. क) बहुकारकवादी घटक संदर्भ १०) एम.एस.श्रीवास्तव** यांच्या संशोधनानुसार शाळेत न गेलेल्या निरक्षर बालकांना अनेक वाईट सवयी जडल्या होत्या. त्यांच्या मते, सुशिक्षित बालकांपेक्षा निरक्षर बालके गुन्हेगारीत जास्त दिसून येतात. कारण शाळा या घटकामधून बालकांना संस्कार व आदर्श नागरीक बनण्याचे धडे मिळत असतात. परंतु प्रस्ततु संशोधनानुसार एक वेगळीच माहिती समोर आली आहे.

**अ) सारणी क्र.५.२ व ५.३ -** अभ्यासलेल्या नमुन्याच्या प्राथमिक पाहणीत असे दिसून आले की; बालगुन्हेगारीत मुलांमध्ये १00 पैकी एकुण ६७ मुले (६७%) हे शाळेत जाणारी किंवा शाळेत गेलेली मुलींमध्ये १00 पैकी एकुण ५९ मुली (५९%) हे शाळेत जाणाऱ्या किंवा शाळेत गेलेल्या आढळून आल्या आहेत.एम.एस.श्रीवास्तव आणि इतर अनेकांच्या प्रकाशित निरीक्षणापेक्षा वेगळेच तथ्य समोर आले आहे.शाळेत गेलेल्या मुला-मुलींचे प्रमाण शाळेत न गेलेल्यांपेक्षा निर्विवादपणे जास्त आढळते.

**ब) सारणी क्र.५.११ व ५.१२ -** अभ्यासलेल्या नमुन्याच्या पाहणीत असे दिसून आले की; मुलांमध्ये शाळेत गेलेल्या किंवा शाळेत जाणाऱ्यामधून साधी चोरी, वाहनचोरी, घरफोडी, विनयभंग,बलात्कार व एकापेक्षा अधिक गुन्हे अशा विविध प्रकारचे गुन्हे घडल्याचे दिसते. परंतु शाळेत न गेलेल्यांकडून विनयभंग, व बलात्कार हे लैगिंक गुन्हे घडलेले नाहीत.

मुलींमध्ये शाळेत गेलेल्यांकडून साधी चोरी, प्रेमप्रकरण, बालविवाह, समलिंगी संबंध, वेश्याव्यवसाय हे गुन्हे घडल्याचे दिसते. मात्र विशेष म्हणजे शाळेत न गेलेल्या मुलींकडून प्रेमप्रकरण,गुप्त बालविवाह व समलिंगी संबंध हे लैगिंक गुन्हे घडलेले दिसून येत नाहीत याची दखल घेतली पाहीजे.

**क) सारणी क्र.५.१३ व ५.१४ -** अभ्यासलेल्या नमुन्याच्य पाहणीत असे दिसून आले की; मुलांमध्ये शाळेत गेलेल्यांकडून जास्त करून आर्थिक कारणामुळे ,वाईट संगतीमुळे व एकापेक्षा अधिक कारणामुळे १00 पैकी एकुण ५८ (५८%) गुन्हे घडले आहेत.

तर मुलींकडून शाळेत गेलेल्याकडून सर्वच कारणांमुळे १00 पैकी एकुण ७९ ( ७९%) गुन्हे समप्रमाणात घडून आले आहेत.

**ड) सारणी क्र.५.४0 व ५.४१ -** अभ्यासलेल्या नमुन्याच्या पाहणीत असे दिसून आले की; मुलांमध्ये शाळेत गेलेल्यांकडून १0 पैकी एकुण ७ एकापेक्षा अधिक गुन्हे घडून आले आहे. तर मुलींमध्ये शाळेत गेलेल्याकडून ६ पैकी एकुण ४ एकापेक्षा अधिक गुन्हे घडून आलेले दिसतात.

वरील सर्व निरीक्षणांचा एकत्रित विचार केल्यास असे दिसुन येते की, निरक्षर बालकांपेक्षा जास्त साक्षर व शाळेत गेलेली बालके बालगुन्हेगारीत दिसून आली.तसेच त्याच्याकडून गंभीर गुन्हे ही घडल्याचे दिसते. म्हणुन अभ्यासलेल्या नमुन्याच्या बाबतीत आमचे दुसरे तपासून पाहण्याचे विधान "**शाळेत जाणाऱ्या बालकांपेक्षा शाळेत न जाणाऱ्या बालकांकडून अधिक गुन्हे घडतात असे वाटते.**" सिद्ध होत नसल्याचे आढळून येते. यामध्ये पूर्वीच्या अभ्यासकांनी केलेल्या संशोधनाला तडा गेल्याचे दिसते. म्हणुन यावर अधिक संशोधन होणे आवश्यक आहे असे सांगावेसे वाटते कारण आम्ही अभ्यासलेला नमुना केवळ २00 बालकांचा आहे त्यामुळे तो अपुरा आहे याची जाणीव आम्हांला आहे.

## ६.२ इतर निष्कर्ष :-

**१) सारणी क्र.५.१७ -** अभ्यासलेल्या नमुन्याच्या प्राथमिक पाहणीत असे दिसून आले की; बालकांच्या आवडत्या छंदप्रकारात मुलांमध्ये १00 पैकी एकुण ४८ (४८%) व मुलींमध्ये १00 पैकी एकुण ३९ (३९%) बालकांचा टी.व्ही. पाहणे हा छंदप्रकार जास्त दिसून आला. म्हणजेच या बालकांवर टी. व्ही. या माध्यमाचा अप्रत्यक्ष प्रभाव पडतो असे म्हणता येईल.

**२) सारणी क्र.५.७, ५.९, ५.१८, ५.२४ -**अभ्यासलेल्या नमुन्याच्या पाहणीत असे दिसून आले की; मुलांमध्ये कुटुंबाचे आर्थिक उत्पन्न १000१ च्या पुढे असून १00 पैकीं एकूण १८ (१८%) मुलांनी आर्थिक या एकाच कारणांमुळे गुन्हे केलेले दिसतात. तर आणखी ३८ पैकीं एकूण २९ (७६%) मुलांनी एकापेक्षा अधिक कारणांमुळे केलेल्या गुन्ह्यात आर्थिक हे एक कारण सामाविष्ट असलेले दिसते.

मुलींमध्ये कुटुंबाचे आर्थिक उत्पन्न १000१ च्या पुढे असून १00 पैकीं एकूण १९ (१९%)मुलींनी आर्थिक या एकाच कारणांमुळे गुन्हे केलेले दिसतात. तर आणखी ३४ पैकीं एकूण २२ (६५%) मुलींनी एकापेक्षा अधिक कारणांमुळे केलेल्या गुन्ह्यात आर्थिक हे एक कारण सामाविष्ट असलेले दिसते.

म्हणजेच कुटुंबाचे आर्थिक उत्पन्न १0000 च्या अधिक असूनही आर्थिक कारणांमुळे बालकांकडून गुन्हे घडल्याचे प्रमाण उच्च आढळते ही बाब धक्कादायक आहे.

## मुलामुलींचे तुलनात्मक निष्कर्ष

**१) सारणी क्र.१0 -** अभ्यासलेल्या नमुन्याच्या पाहणीत असे दिसून आले की; मुलींमध्ये घडलेले समलिंगी संबंध, प्रेमसंबंध, गुप्तबालविवाह हे गुन्हे मुलांमध्ये घडलेले आढळून आले नाहीत.

२) **सारणी क्र.५.३३ -** अभ्यासलेल्या नमुन्याच्या पाहणीत असे दिसून आले की; मुली या जास्त प्रमाणात भग्न कुटुंबातून आलेल्या दिसून येतात. म्हणजेच मुली या कौटुंबिक भग्नतेला मुलांपेक्षा जास्त प्रमाणात बळी पडतात असे दिसते.

३) **सारणी क्र.५.१६,५.३९ व ५.४०-** अभ्यासलेल्या नमुन्याच्या प्राथमिक पाहणीत असे दिसून आले की; पुणे शहरात इतर ठिकाणाहून आलेल्यांमध्ये मुली १०० पैकी एकुण ५७(५७%)दिसतात तर मुले इतर ठिकाणाहून आलेल्यांमध्ये १०० पैकी एकुण ३३(३३%)दिसुन येतात.तसेच या मुलींमध्ये भग्न कुटुंबातून आलेल्या मुलींचे प्रमाणही १०० पैकी एकुण ६९(६९%) जास्त दिसून येते. म्हणजेच बालगुन्हेगारीत स्थलांतरीत मुलांच्या तुलनेत स्थलांतरीत मुलींचा सहभाग अधिक दिसून येतो.

४) **सारणी क्र.५.३२ व ५.३३ -** अभ्यासलेल्या नमुन्याच्या प्राथमिक पाहणीत असे दिसून आले की; कौटुंबिक भग्नतेतुन आलेली मुले वाईट संगतीला १६पैकी एकुण ८ बळी पडलेली दिसुन येतात. तर जन्मदाते आईवडिल असलेली मुले वाईट संगतीला १६पैकी एकुण ८ बळी पडलेली दिसुन येतात.म्हणजेच मुलांमध्ये कौटुंबिक पार्श्वभुमीचा व वाईट संगतीचा फारसा संबंध दिसुन येत नाही.तर कौटुंबिक भग्नतेतुन आलेल्या मुली वाईट संगतीला १३पैकी एकुण ९ बळी पडलेल्या दिसुन येतात. तर जन्मदाते आईवडिल असलेल्या मुली वाईट संगतीला १३पैकी एकुण २ बळी पडलेल्या दिसुन येतात.म्हणजेच मुलींमध्ये कौटुंबिक भग्नतेचा व वाईट संगतीचा संबंध दिसुन येतो.

५) **सारणी क्र.५.३६ व ५.३७ -** अभ्यासलेल्या नमुन्याच्या प्राथमिक पाहणीत असे दिसून आले की; पुणे शहरातील मुलांमध्ये ७% बालके वाईट संगतीमुळे गुन्हे केल्याचे दिसून येते. मात्र मुलींमध्ये एकही मुलगी पुणे शहरात वाईट संगतीमुळे गुन्हा करताना दिसून आली नाही ही बाब लक्षात घेण्यासारखी आहे व यावर नव्याने संशोधन होणे आवश्यक आहे असे वाटते.

**६) सारणी क्र. ५.९, ५.१३ व ५.१४ -** अभ्यासलेल्या नमुन्याच्या प्राथमिक पाहणीत असे दिसून आले की; मुलांपेक्षा मुलींमध्ये गुन्हे करण्यास भाग पाडणारे मानसशास्त्रीय कारण जास्त प्रबळ दिसून येते. एकूण १६% मुली या मानसशास्त्रीय कारणामुळे गुन्हा करताना दिसून आल्या. याचा अर्थ मुली या मानसिकदृष्ट्या लवकर खचतात. मुलांच्या तुलनेत मुलींची मानसिकता लवकर ढासळते व त्या मानसिक अस्वास्थ्यता किंवा मानसिक विकृती यामुळे गुन्हा करताना दिसून येतात असे वाटते.

## ६.३ उपाय व सुचना

बालगुन्हेगारांसाठी सरकारने विविध प्रतिबंधात्मक उपाय सुचविले असले तरी काही उपाय यामध्ये सुचवावेसे वाटतात.

१) पालकांनी आपल्या बालकांवर शक्यतो लक्ष ठेवले पाहिजे. आपली मुले शाळेत जातात की नाही ती कोणत्या मित्र मैत्रिणीबरोबर वावरतात या गोष्टीवर लक्ष देणे आवश्यक आहे. त्यांना वाईट संगतीपासून दूर ठेवले पाहिजे.

२) कुटुंबातील वातावरण कुटुंबातील प्रत्येक सदस्यांनी शांततापूर्व व आनंदमय ठेवले पाहिजे. सदस्यांची भांडणे व तणाव यांमुळे बालकांच्या मनावर फार लवकर परिणाम होतो. व ती कंटाळून घरातून पळुन जातात किंवा आक्रमक होतात.

३) दिवसेंदिवस चित्रपट व सिरीयल ज्याप्रकारे दाखविल्या जात आहे. त्याचा बालकांवर फार लवकर प्रभाव पडत आहे. चित्रपटातील हिंसक दृश्ये, अश्लीश बोलणे, अश्लीश दाखविणे थांबविले पाहिजे. नाही तर बालकांनी हे चित्रपट बघु नये याची दक्षता घेतली पाहिजे.

४) बालकांना लहानपणीच मुल्यशिक्षण हा विषय शिकविला पाहिजे. जेणेकरुन कोणते वर्तन करावे, कोणते वर्तन करु नये. ठराविक वर्तन केले असता कोणती शिक्षा होते व ज्याचे परिणाम भविष्यात कसे भोगावे लागतात इ.संबंधीचे ज्ञान त्यांना लहानपणीच दिले पाहिजे.

५) पालकांनी बालकांवर जास्त कडक शिक्षेचा वापर करता कामा नये. त्यांच्याकडून चुकले तर त्यांना प्रेमाने समजावणे आवश्यक आहे. तसेच बालकांना जास्त सुट ही देता कामा नये.

६) मुला मुलींची लग्ने योग्य वय झाल्यानंतरच लावली पाहिजे. कारण ती जबाबदारी यायला ठराविक वयाची गरज असते. तसेच मुलींची लग्ने ही योग्य मुलांशी लावुन देणे आवश्यक आहे. जेणेकरुन नवऱ्याकडून त्यांना वाईट वागणुक मिळणार नाही.

७) लहानपणीच मुलांना कुटुंबातील परिस्थितीची जाणीव करुन देणे आवश्यक आहे जर कुटुंबातील आर्थिक परिस्थिती हालाखीची असेल तर त्याची जाणीव मुंलाना लहाणपणीच झाली पाहिजे. तसेच पैसे मिळविण्यासाठी कोणत्याही वाईट मार्गाचा वापर करु नये हे ही मुलांना सांगितले पाहिजे.

८) घरातील मुलांसमोर वडीलांनी कधीही मादक द्रव्यांचे सेवन करू नये. जेणेकरून मुलेही त्याचे अनुकरण करणार नाही. तसेच मादक द्रव्यांचे सेवन करून घरातील वातावरण खराब करू नये.

९) समाजाने अशा मुलांना हीन व अपमानास्पद वागणुक न देता सामान्य मुलांसारखेच त्यांना समजले पाहिजे जेणेकरुन भविष्यात ही मुले प्रौढ गुन्हेगार बनणार नाही.

१0) बाल सुधारगृहातुन बाहेर पडल्यावर त्यांचा पुर्नवसनासाठी सरकारने काही तरतुदी केल्या पाहिजे जेणेकरुन ही मुले पैशासाठी परत गुन्हेगारीकडे वळणार नाही व प्रौढ गुन्हेगार बनणार नाही.

# संदर्भ सूची


१) प्रा. माणिक माने, (१९९९) 'गुन्हेगारशास्र', फडके प्रकाशन ,कोल्हापूर ...

पृष्ठ.क्र १ ते ३.

२) डॉ. प्रदीप आगलावे, (२००१) 'आधुनिक भारतातीय सामाजिक समस्या',

विद्या प्रकाशन, नागपूर .... पृष्ठ क्र. ८६ ते ८७

३) डॉ. दा. धो. काचोळे, (२०००) 'भारताच्या विघटनात्मक समस्या',

कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद .... पृष्ठ क्र. २४० व २४१

५) राम आहुजा व मुकेश आहुजा (१९९८), 'विवेचनात्मक अपराधशास्त्र' रावत प्रकाशन, जयपूर.... पृष्ठ क्र. २२ ते २४.

६) **G.R MADAN (1976), 'INDIAN SOCIAL PROBLEMS ' ALLIED PUBLISHERS , NEW DELIHI....** पृष्ठ क्र. २५३ ते २७१.

७) डॉ.भा.कि. खडसे, (२००४) 'भारतीय समाज आणि सामाजिक समस्या', हिमालया प्रकाशन, मुंबई ... पृष्ठ क्र. २०६ ते २०९.

८) राम आहुजा व मुकेश आहुजा (१९९८), 'विवेचनात्मक अपराधशास्त्र,' रावत प्रकाशन, जयपूर ... पृष्ठ क्र. २०६ ते २०९.

९) प्रा.माणिक माने, (१९९९) 'गुन्हेगारशास्र', फडके प्रकाशन,कोल्हापूर ... पृष्ठ क्र. ९९.

११) प्रा. पी के. कु लकर्णी , (१९९८) 'भारतातील सामाजिक समस्या', विद्या प्रकाशन, नागपूर पृष्ठ क्र. १०८

१२) डॉ. भा.कि. खडसे, (२००४) 'भारतीय समाज आणि सामाजिक समस्या',

हिमालया प्रकाशन, मुंबई ... पृष्ठ क्र. २०६ ते २०९.

१३) **G.R MADAN (1976), 'INDIAN SOCIAL PROBLEMS ' ALLIED PUBLISHERS , NEW DELIHI**.... पृष्ठ क्र. २५३ ते २७१.

१४) डॉ. विलास आ. संगवे (१९९१) 'भारतातील सामाजिक समस्या', पॉप्युलर प्रकाशन, मुंब□पृष्ठ क्र. ८० ते ८९.

१५) **C.B. MAMORIA (1965), ''INDIAN SOCIAL PROBLEMS AND SOCIAL DISORGANISTION IN INDIA ' KITAB MAHAL Pvt. Ltd. , Udaipur**.... पृष्ठ क्र. २७६ ते २८५.

१६) डॉ. प्रदीप आगलावे, (२०००) 'संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे',

विद्या प्रकाशन, नागपूर .... पृष्ठ क्र. ३०१ ते ३१०

# परिशिष्टि

## मुलाखत मार्गदर्शिका

## (बालकांसाठी)

१. नाव

२. बालकाचे वय

३. बालकाचे शिक्षण / इयत्ता

४. बालकाची आधीची शाळा

५. बालक घेत असलेले प्रशिक्षण

६. बालकाचे आवडते छंद

७. सुधारगृहात राहायला कसे वाटते.

८. किती कालावधीपासून इथे आहात

९. राहण्याचे मुळ ठिकाण

१0. कुटुंबाची माहिती-उत्पन्न, कुटुंबातील सदस्य,आई वडीलांचे परस्परांशी असणारे संबध इ.

११. गुन्ह्याचा प्रकार

१२. गुन्ह्याचा इतिहास (गुन्हा कसा घडला, गुन्ह्याचे कारण इ.)

## (परिविक्षा अधिका–यासाठी मुलाखत मार्गदर्शिका)

१. आपण इथे कोणत्या पदावर आहात.

२. इथे एकूण किती बालके आहेत ? (मुला – मुलींचे प्रमाण)

३. आपण इथे किती वर्षापासून आहात.

४. इथे मुलांसाठी कोणते कार्यक्रम राबविले जातात.

५. बालकांच्या पूर्नवसनासाठी काय उपाय केले जातात.

६. बालकांना कुटुंबाचे प्रेम मिळावे म्हणून आपण काय करता.

७. आपल्या मते बालगुन्हेगारी निर्माण होण्याची कारणे कोणती.

८. कुठल्या विशिष्ठ वयोगटातील मुले गुन्हेगार आढळतात ?

९. प्रत्यक्ष पुण्यात राहणारी कि पुण्यात बाहेरून आलेली मुले इथे जास्त दिसून येतात.

१0. बालगुन्हेगारी कमी होण्यासाठी आपण कोणते उपाय सुचवाल ?

## सुधारगृहातील अधिक्षकाकडून मिळालेली माहिती

## मुलाखत (मुलांचे निरीक्षक गृह)

**१. आपण इथे कोणत्या पदावर आहात ?**

- परिविक्षा अधिकारी

**२. आपण इथे किती वर्षापासुन आहात ?**

- १५ वर्ष

**३. या सुधारगृहात एकुण किती बालके आहेत ?**

- सध्या इथे एकुण १४0 बालके आहे. परंतु सुधारगृहाची मर्यादा २00 इतकी आहे. महाराष्ट्र राज्याबाहेरील मुले असतील तर त्यांच्या राज्यांना पत्र पाठवुन या मुलांना त्यांच्या राज्यात परत पाठवले जाते व महाराष्ट्रातील मुले असतील तर त्यांना जामीन मिळेपर्यंत किंवा १८ वर्ष पूर्ण होईपर्यंत त्यांना इथे ठेवले जाते व त्यांच्या कुटुंबाना तसे पत्र पाठवण्यात येते.

**४. इथे मुलांसाठी कोणते कार्यक्रम राबविले जातात.**

- इथे मुलांसाठी सामुहिक नाटक स्पर्धा, चित्रकला स्पर्धा आयोजित केल्या जातात. तसेच चांगले वर्तन असलेल्या मुलांना पारितोषिक दिले जाते. क्रिकेट, खोखो मैदानी खेळ ही मुलांना शिकवले जातात.

**५. बालकांच्या पूर्नवसनासाठी काय उपाय केले जातात**

- बालकांचे पूर्नवसन व्हावे म्हणून त्यांना शाळेत घातले जाते जर शाळेतच न जाणारी मुले असतील तर त्यांना गवंडीकाम, पेंटींग, शेतीकाम, टर्नर फिटींग , सुतारकाम, विणकाम,

वायर इलेक्ट्रिक, विविध वस्तु बनवणे इ. कामाचे प्रशिक्षण दिले जाते. तसेच सुधारगृहात बाहेर पडताना शासकीय पूर्नवसन गृहामार्फत त्यांचे पूर्नवसन केले जाते.

६. **बालकांना कुटुंबाचे प्रेम मिळावे म्हणुन आपण काय करता ?**

- बालकांना कुटुंबाचे प्रेम मिळावे म्हणुन आम्ही एका स्त्री आयाची नेमणुक करतो जी त्यांच्या अडचणी जाणून घेते. तसेच बालकांशी सहकार्याने व मिसळून वागते. जेणेकरुन त्यांना कुटुंबाची आठवण येणार नाही. दर शनिवार व रविवार त्यांना कुटुंबातील माणसांची भेट घेण्यासाठी ठेवलेले आहेत.

७. **आपल्या मते, बालगुन्हेगार निर्माण होण्याची कारणे कोणती**

- साधारण बालके ही आर्थिक व कौटुंबिक कारणामुळे गुन्हेगार बनतात. तसेच काही वेळा या मुलांना शाळेत किंवा घराशेजारी वा☐ मित्र भेटले की ही मुले गुन्हेगारी मार्गा ला लागतात.

८. **कुठल्या विशिष्ट वयोगटातील मुले गुन्हेगार आढळतात ?**

- साधारणतः १२ ते १८ वयोगटातील मुले गुन्हेगार आढळतात.

९. **प्रत्यक्ष पुण्यात राहणारी की पुण्यातल्या बाहेरुन आलेली मुले जास्त दिसतात.**

- पुण्यातील मुले जास्त आहे त्याच बरोबर पुण्याच्या बाहेरील शहरातुन , खेडेगावातुन व इतर राज्यातून सुध्दा मुले येतात.

१०. **बालगुन्हेगारी कमी होण्यासाठी आपण कोणते उपाय सुचवाल?**

- बालगुन्हेगारी कमी होण्यासाठी घरातील संस्कार सर्वात महत्वाचे आहे. भग्न कुटुंब असेल किंवा रोजच घरात भांडणे होत असतील तर बालकांवर याचा खुप प्रभाव पडतो. त्याचे मानसिक अस्वस्थता खालावते. म्हणुन कुटुंबातील वातावरण चांगले पाहिजे. आ☐ वडिलांचे, शिक्षकांचे मुलांवर लक्ष पाहिजे. वाईट संगतीपासुन मुलांना दुर ठेवले पाहिजे व कोणत्या परिस्थितीत बालक गुन्हा करतो ते कारण शोधुन दुर केले पाहिजे मुलांना घरातुन जर प्रेम मिळाले तर तो वाईट मार्गाला सहसा जात नाही.

## मुलाखत (मुलीचे सुधारगृह)

**१. आपण इथे कोणत्या पदावर आहात**

- अधिक्षक अधिकारी

**२. आपण इथे किती वर्षापासुन आहात ?**

- १० वर्ष

**३. या सुधारगृहात एकुण किती मुली आहे?**

- सध्या इथे एकुण १०२ मुली आहेत. सुधारगृहाची मर्यादा १५० इतकी आहे. वेश्या व्यवसायातील साधारणतः बाहेरील राज्यातील मुली इथे येतात तेव्हा त्यांच्या राज्यांना पत्र पाठवुन या मुली परत त्यांच्या राज्यात पाठविले जाते.

**४. इथे मुलीसाठी कोणते कार्यक्रम राबविले जातात.**

- इथे मुलींना शाळेत पाठविले जाते. ब्युटी पार्लर, सोफ बनविणे, शिवणकाम, विविध वस्तु हाताने बनविणे, पेंटींग, हस्तकला व कलाकुसरीच्या बनविणे इ. चे प्रशिक्षण मुलींना दिले जाते. तसेच या मुलींच्या मनोरंजनासाठी बाहेरील काही व्यक्तींचे कार्य कम सुध्दा इथे ठेवले जातात.

**५. मुलींच्या पुर्नवसनासाठी काय केले जाते ?**

- इथे जर मुली १८ वर्षाच्या झाल्या व त्यांच्या कुटुंबाची परिस्थिती चांगली नसेल तर अशा मुलींचे आम्ही लग्न लावून देतो अनेक मारवाडी व गुजराती मुले आमच्याकडे लग्नासाठी मुलगी पाहिजे आहे म्हणुन येतात. अशा मुलांचे कुटुंब, नोकरी धंदा व स्वभाव पाहुन आम्ही त्यांचे लग्न सुधारगृहातील मुलींशी लावुन देत असतो. संस्थेतर्फे अशा मुलांना आम्ही १५०००/ रुपयांचे बक्षीसही देत असतो. आजपर्यंत आम्ही अनेक मुलीची लग्न लावून दिली आहे व त्यांचे संसार आज सुखी झाले आहे. तसेच या मुलींना आम्ही विविध गोष्टींचे प्रशिक्षण देवून पुढे त्या आपल्या पायावर उभ्या राहतील यासाठी त्यांना आर्थिक साहाय्य देत असतो.

**६. मुलींना कुटुंबाचे प्रेम मिळावे म्हणुन आपण काय करता ?**

- मुलींना कुटुंबाचे प्रेम मिळावे म्हणुन आम्ही स्वतः त्यांच्याकडे लक्ष देत असतो. त्यांच्या काही खाजगी समस्या असेल तर तिथे असलेल्या स्त्री कर्मचारीकडे त्या जावून सांगतात. सुधारगृहातील वातावरण एकदम खेळीमेळीचे आहे. मुलींना इथे कसलाही त्रास होणार नाही. याची दक्षता आम्ही घेत असतो.

**७. आपल्या मते मुली या बालगुन्हेगार होण्याची कारणे कोणते ?**

- साधारणतः जास्तीत जास्त मुली या कौटुंबिक कारणांमुळेच गुन्हेगार बनतात. तसेच चित्रपट, प्रेमकथा यांमुळे त्या वाईट मार्गाला व वा□ट संगतीला लागतात. मुलींचे हे वय खुप नाजुक असते व अशा वयातच त्यांना जर वा□ट संगतीचे मित्र भेटले तर त्यांचा फायदा घेवुन ही मुले त्यांना सोडून देतात. व अशा मुली नंतर खुप खचतात व आत्महत्येचा विचार करतात.

**८. कुठल्या विशिष्ट वयोगटातील मुली गुन्हेगार आढळतात ?**

- साधारणतः १५ ते १८ वयोगटातील मुली गुन्हेगार आढळतात.

**९. प्रत्यक्ष पुण्यात राहणाऱ्या कि पुण्याच्या बाहेरुन आलेल्या मुली जास्त असतात.**

- पुण्यात राहणाऱ्या मुली जास्त असतात पंरतु बाहेरील राज्यातील मुली या वेश्याव्यवसायात आढळुन येतात.

**१०. बालगुन्हेगारी कमी होण्यासाठी आपण कोणते उपाय सुचवाल ?**

- बालगुन्हेगारी कमी होण्यासाठी पहिले अश्लील चित्रपट दाखवणे बंद केले पाहिजे. ती वा□ट संगतीला लागली आहे की नाही हे पाहणे गरजेचे आहे. तसेच मुलींना भावी आयुष्यासाठी मुल्यशिक्षण देणे जास्त गरजेचे आहे.जेणेकरुन या मुली वाईट मार्गाला जाणार नाही व पुढे संसार चांगल्या करु शकतील.मुलीच्या कुटुंबातील वातावरणही चांगले हवे.मुलीचे लग्न लावून देताना तिचे १८ वर्ष पुर्ण आहे का नाही हे पाहणे महत्वाचे आहे. तसेच मुलगा तिच्यासाठी योग्य आहे का नाही याची दक्षता घेतली पाहिजे.